मार पडला. नंतर मी त्या लोकांना विचारले की झालं काय? तुम्ही काय असे केले? साधा सत्यनारायणाचा प्रसाद हा गडी घेत नाही, काय करायचे त्याला. त्याच्या पाठीमागे तत्वज्ञान असेल, विचार असेल पण थोडंबहुत आमच्यातील अंतर मुद्दाम तुम्हाला सांगितले. व्यवहाराच्या पातळीवर आमच्यात अंतर होते.

संसदेच्या राजकारणात भाई, बापू बाजुला राहिले. येथे गोविंदभाईंनी जबरदस्त संस्था उभी करून ठेवली. त्याची जबाबदारी बापू पाहू लागले. मला सांगायला आनंद होतो, मी काही कोणावर टिका करत नाही पण आज महाराष्ट्रात बोटावर मोजण्याजोग्या ज्या संस्था आहेत, ज्याच्यामध्ये भरती आणि प्रवेशासाठी पैसे मागितले जात नाहीत, त्यामध्ये या संस्थेचा उल्लेख होतो. रावसाहेब आणि मी रयत शिक्षण संस्थेत काम करतो. बारामतीला अशीच एक शिक्षणसंस्था आम्ही लोक चालवितो. सरस्वतीची जबाबदारी शिरावर घेतली आहे. मी कधी कोणाकडून एक वावगा शब्दसुध्दा या संस्थांच्या संबंधाने ऐकला नाही. त्या लक्ष्याच्या दृष्टीने जाण्याचा प्रयत्न ते करतात. मराठवाड्यातही काही लोक, अंकुशराव असतील, ते या पध्दतीने पुढे जाण्याचा प्रयत्न करत आहेत. अस्वस्थता आहे, पण एखादी जबाबदारी आपण घेतल्याच्यानंतर नि:पक्षपणाने ती पार पाडावी. स्वच्छ आणि पारदर्शक कारभार कसा असावा यासंबंधीचा गोविंदभाईंनी घालून दिलेला आदर्श जतन करण्याची कामगिरी बापूसाहेब करत आहेत. सरकारच्या नियमाबाबत त्यांची मते तीव्र असतात. पण नाऊमेद होऊन त्याच्यापासून बाजुला जाण्याची भूमिका कधी घेता कामा नये. मला तुमच्याबद्दल आकर्षण आणि आस्था आहे की तुम्ही या सुत्रापासून कधी तसूभर मागे गेला नाही. अस्वस्थता व्यक्त केली, टिकाटिप्पणी केली, पण घेतलेल्या जबाबदारीतून तुम्ही पलायन कधी केले नाही. ते काम तुम्ही समर्थपणाने, उत्तमरितीने करत आहात. इतरांसमोर आदर्श ठेवेलेला आहे. त्याचा अभिमान आम्हा सगळ्यांना आहे.

बापूंनी, त्यांच्या सहकाऱ्यांनी समाजकारणामध्ये नवीन पिढी तयार करण्यासाठी काम अखंडपणाने केले. सुदैवाने एस.एम. यांच्यासारखे नेतृत्व, विचारधारा त्यांनी लाभली. ते काम त्यांनी पुढे चालू ठेवले आहे. ते करताना त्यांनी कधी स्वत:च्या भविष्यासंबंधी विचार केला नाही. कोणीतरी सांगितले की ते कदाचित मंत्री झाले असते. लोकांना फारसे माहिती नाही पण १९७७ मध्ये त्यावेळेला सरकार बदलायचा निर्णय आम्ही काही लोकांनी घेतला. तेव्हा राज्याच्या बदलणाऱ्या सरकारचे नेतृत्व कोणी करावे याची चर्चा जेव्हा झाली, तेव्हा बापूंनी नेतृत्व करावे यासंबंधीचा विचार मांडला गेला होता. त्याचा स्वीकार त्यांनी केला नाही. एस.एम. यांची भूमिका स्वच्छ होती की ती जबाबदारी

*निर्मळ आणि खळाळते हास्य ओसंडून वाहताना.*



मी घ्यावी. ती जबाबदारी मला घ्यावी लागली. सांगायचे तात्पर्य असे की त्यांच्या आयुष्यामध्ये अशी कधी संधी आली नव्हती असे नाही. पण त्या रस्त्याने जायचे नाही हा निर्णय त्यांनी घेतला. मी संसदेमध्ये गेलो आहे, माझे संसदेचे काम त्याठिकाणी करत आहे. राज्य विधीमंडळाचा रस्ता मी सोडला आहे, त्या मार्गाने जायचे नाही. म्हणून त्यांनी सत्तेचा विचार केला नाही. एक आदर्श सगळ्या नव्या पिढीसमोर त्यांनी कायम ठेवला आहे. ते भाग्यवान होते त्यांना एसएम जोशींचे प्रेम मिळाले. मी त्यांच्यापेक्षा जरा अधिक भाग्यवान, कारण मला यशवंतराव चव्हाणांचा आशिर्वाद मिळालाच, पण एसेएमचेही प्रेम मिळाले. व्यक्तिगत जीवनात त्या विचाराची, मार्गदर्शनाची उपयुक्तता मी सांगायची गरज नाही. पण आनंदाची गोष्ट ही आहे की बापूंनी एसएम यांनी दिलेले संस्कार, विचार, स्वच्छ निर्मळ आयुष्यपध्दती आपल्या आयुष्यात कायम जपली. ती पुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

सुदैवाने सुधाताईंची त्यांना भक्कमपणाने साथ मिळाली. घर त्यांनी उत्तमरितीने सांभाळले. वेळप्रसंगी बापूंनासुध्दा कठोरपणाने सांगुन नियंत्रित करण्यासंबंधीची शक्ती त्यांनी दाखविली. त्यामुळेच जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत बापूंना यशस्वितता प्राप्त झाली. माझी खात्री आहे की तुम्हा सगळ्यांचे प्रेम, नव्या पिढीची साथ यातून चांगले घडतेय. नवीन उभारले




*बापूंचा गौरवग्रंथ वाचण्यात रममाण झालेले साहेब.*

जातेय, यातून समाजामध्ये बदल होत आहेत. देश काही क्षेत्रांमध्ये पुढे जात आहे. ही सगळी प्रगती बापूंना प्रकृती चांगली ठेवण्यासाठी आणि नंतरचा कालखंड आनंदाने जगण्यासाठी उपयोगी पडणार आहे. जे काही चुकीचे घडते आहे, अस्वस्था आहे ती मधून-मधून त्यांना प्रकृतीच्या यातना सहन कराव्या लागतात, त्यासाठी कारणीभूत आहे.

बापूंना वयाने लहान असणारा मित्र म्हणून सांगेन की आपण चांगल्या प्रवृत्तींना शक्ती देत राहायचे. चांगल्या विचारांना हातभार लावत राहायचे. नवं घडत असेल तर नवे घडविणाऱ्या लोकांना पूर्णपणाने ताकद द्यायची. त्या माध्यमातून समाजात काही बदल होत असतील, लोकांच्या जीवनात स्थिरता आणि परिवर्तन येत असेल, तर त्या सगळ्या गोष्टींना आपण हातभार लावायचा हे काम आपण शेवटपर्यंत करायचे. हेच आपल्या आयुष्याचे उर्वरित काळात राहिलेले सुत्र आहे. या सुत्राच्या पाठीमागे आपण जात आहात आणि आम्ही सर्व तुमच्या बरोबर आहोत. माझी खात्री आहे की या सुत्राने आयुष्य तर चांगले लाभेलच पण आपल्याला जे अपेक्षित आहे त्यासंबंधीचे बदल घडण्यासंदर्भात स्थिती पाहायला मिळेल. मी निराशवादाचा पुरस्कर्ता नाही. आलेल्या संकटावर मात करून पुढे जाण्याची भूमिका घेऊन तशी पावले टाकायची याच भूमिकेचा पुरस्कर्ता आहे. बापूही त्याच विचाराचे आहेत. कदाचित ते हळवे असतील, पण जेथे निर्णय घ्यायचा असतो, विचारांचे अधिष्ठान स्पष्ट पाहिजे, त्याठिकाणी ते कठोर असतात. त्यामुळे उर्वरित जीवनात त्यांना तशा पध्दतीचे यश पाहायला मिळेल, याची मला पूर्ण खात्री आहे. या गौरव समितीचे मी अभिनंदन करतो.आत्तापर्यंत मराठवाड्यात कोणताही कार्यक्रम असेल तर बापू असतच. बापूंचे संपूर्ण आयुष्य इतरांबद्दल चांगले बोलण्यात गेले. त्यांच्यासाठी मात्र असा सोहळा झाला नव्हता. तो झाला याबद्दल मी अभिनंदन करतो. याप्रसंगी झालेली इतर काही मान्यवरांची भाषणे थोडक्यात पुढील प्रमाणे :

## बापू ध्येय व तत्त्वनिष्ठ : भाई वैद्य

६७ वर्षांचा प्रदीर्घ कालखंड आमच्या स्नेहबंधाचा आहे. त्यामुळे अशा प्रसंगी काय सांगावे अशा तऱ्हेचा मनामध्ये संभ्रम निर्माण होतो, अशा आठवणी मनात उचंबळून येतात. आज बापूसाहेबांचे किर्तीमान किती उंचावले आहे




*बापूंच्या गौरवग्रंथाचे शरद पवार प्रकाशन करीत असून व्यासपीठावर (डावीकडून) चंद्रकांत खैरे, सुधाताई काळदाते, प्रतिभाताई पवार, बापू कागलीवाल, मधुकरराव पिचड, राधाकृष्ण विखे-पाटील, मधुकर मुळे.*

हे आपण पाहिले. पण अनेक वेळेला असे होते की मंदिराच्या चकाकणाऱ्या शिखराकडे आपण पाहतो, पण त्याचा पाया मात्र आपण विसरतो. बापूसाहेबांच्या कामाची सुरूवात ज्या पध्दतीने झाली त्या काळामध्ये समाजवादी विचाराच्या प्रसारासाठी त्यांनी जे अफाट कष्ट घेतले ते मात्र लोकांच्या लक्षात अनेक वेळेला येत नाहीत. मला त्याबद्दल या ठिकाणी आवर्जून सांगायचे आहे.

मला आठवते की राष्ट्रसेवादलाचे पहिले शिबिर वसमतनगरला झाले तेव्हा मी बापूंच्या बरोबर आलो होतो. त्यावेळी पासून बापूंनी मराठवाड्याची समाजवादी विचाराच्या दृष्टीने बांधणी करण्यासाठी जे अफाट प्रयत्न केले ते आज आपण लक्षात घेतले पाहिजेत. विशेषत: नवीन कार्यकर्त्यांनी त्याकडे पाहिले पाहिजे. त्या काळामध्ये औरंगाबाद शहर छोटे होते. बापू शहागंजजवळ एका खोलीत राहत होते. नुकतेच लग्न झाले होते. मी आलो तेव्हा माझ्यासाठी सुधाताईंनी खास गुलाबजाम केले होते. अनंतराव भालेराव जेवायला होते. त्यांनी अशी स्तुती केली की काय गुलाबलड्डू झाले आहेत.

नवीन लग्न झालेले, नवीन पाककला शिकत, प्रयोग करत बापूंना अशा तऱ्हेचे खाद्यसंस्कृतीचा अनुभव देत संसार चालला होता. त्या काळामध्ये संबंध महाराष्ट्रभर, मराठवाडाभर ज्या पध्दतीने त्यांनी पायपीट केली, सायकल असो कोणतेही वाहन. मी माझ्या लेखामध्ये म्हटले आहे की ते हत्तीवर गेले की नाही हे मला माहित नाही. पण अनेकवेळा उंटावर त्यांना प्रवास करावा लागला. पण ज्या ज्या खेड्यामध्ये सेवादलाचा काही गट आहे अशाठिकाणी जायचे, त्यांची बांधणी करायची, विचाराचे दान त्यांना करायचे, वैचारिक दृष्टीने त्यांना तयार करायचे हे काम बापूंनी ज्या पध्दतीने केले. ते तुम्हा-आम्हाला कधी विसरून चालणार नाही. आज बापू ज्या अवस्थेत आहेत, ती कशामुळे आली?

आज त्यांना संबंध मराठवाडाभर, महाराष्ट्रभर जी मान्यता आहे ती कशामुळे आली, त्याचा पाया कसा रचला, त्याच्यासाठी बापूंनी काय कष्ट घेतले याचा विचार करायला पाहिजे. आज अशापध्दतीची बांधणी करणे, कार्यकर्त्यांना विचारांनी बांधणे, तयार करणे, त्याच्यासाठी वाट्टेल तेवढे कष्ट करणे ही गोष्ट कार्यकर्त्यांच्या अंगी बाणत नाही. एसएम जोशींनी बापूंना सांगितले की जा मराठवाड्यात. तुझे काम मराठवाड्यात आहे. समाजवादाची पेरणी तू मराठवाड्यात कर. सेवादलाची बांधणी तेथे करायची आहे. एसएमनी सांगितल्याबरोबर एक क्षणाचाही विलंब न लावता बापू तडक पुण्यातून निघाले आणि मराठवाड्यात आले. येथे ज्या पध्दतीने बांधणी केली, लोकसंग्रह केला, माणसांची मने जिंकली, समाजवादाची पेरणी केली ती गोष्ट अतुलनिय आहे, असे मला वाटते. बापूंकडे वक्तृत्व आहे.

नानासाहेब गोरे थोर साहित्यिक-राजकारणी.

झेबुन्निसाचे स्वप्न वाचल्यावर नानासाहेबांच्या शब्द लालित्याची, शब्द सौष्टवाची कल्पना आपल्याला येते. त्या नानासाहेबांनी बापूंचे वक्तृत्व ऐकल्यावर सांगितले की काय या माणसाकडे नैसर्गिक देणगी आहे. काय शब्द सामर्थ्य आहे. असे शब्द सामर्थ्य मला लाभले असते तर काय बहार आली असती. नानासाहेबांनी असे म्हणायचे हे सामान्य नाही. वक्तृत्वाच्या पाठीशी जी भावनेची उत्कटता आहे ती कधी विसरता कामा नये. समाजवादी म्हणजे रुक्ष माणूस, शुष्क माणूस, नास्तिक माणूस, त्याला श्रध्दा वगैरे काय कळते आहे? असे अनेक लोकांना का वाटते मला माहिती नाही. कदाचित माझ्यासारखे कारणीभूत असतील. पण बापूंच्याकडे पाहिल्यावर या समाजवादाचा पाया कसा भावनासिध्द आहे याची जाणीव होते. बापू वैचारिक दृष्टीने प्रखर आहेत. पक्के आहेत.

अनेक पक्षांमध्ये त्यांचा मित्रपरिवार आहे, यात तिळमात्र शंका नाही. शरदरावांबरोबरच्या दोस्तीची तर संबंध देशात ख्याती आहे. ती दोस्ती आहेच, पण वैचारिक दृष्टीने बापू अत्यंत खंबीर आहेत. विचाराचा पाया मात्र भावनेचा आहे. भावनेचा झुळझुळ झरा त्यांच्या अंत:करणामध्ये ज्या पध्दतीने वाहतो ते अत्यंत विलोभनीय आहे. बापूंचे वैशिष्ट्य व्यक्तित्व ते आहे. बापू आपल्या गुरुंबद्दल म्हणजे एस.एम. जोशींबद्दल बोललेत आणि बापूंचे डोळे पाझरले नाहीत, आसवे गळली नाहीत असे कधी होणेच शक्य नाही. आपल्या कार्यकर्त्याबद्दल, सहकार्याबद्दल, मित्राबद्दल बोलताना बापूंचा कंठ कधी रुध्द झाला नाही, असे कधी होणेच शक्य नाही. भावनेने अत्यंत स्निग्ध, वैचारिक दृष्टीने पक्का, वक्तृत्वामध्ये कर्तृत्ववान पण भावनेचा पुरेपुर ओलावा असणारा हा मित्र लाभणे खरोखर भाग्य आहे. बापूंच्या स्नेहामुळे माझे जीवन बहरले. त्यांना मी धन्यवाद देतो. सुधाने ज्या पध्दतीने बापूंच्या संसाराला आधार लावला ती काही सामान्य गोष्ट नव्हती. पुणे शहरातील, मध्यमवर्गातील, कवी मायदेवांची मुलगी तेथे सर्व जीवन गेलेले. २०-२५ गाजलेली पुस्तके लिहिली, बापूंच्या संसाराला ज्या पध्दतीने फुलवले, साथ दिली ती अमौलिक साथ आहे. ही साथ कायम राहावी, त्यांचे जीवन सुखी, समृध्द आणि समाधानी राहावे, उदंड आरोग्य त्यांना मिळावे, अशा तऱ्हेचे आयुष्य त्यांना मिळावे हीच सदिच्छा.

# मनुष्यजात जिवंत ठेवण्यासाठी बापूंचे समर्पण : रावसाहेब शिंदे

बापूंनी वयाची ८० वर्षे पूर्ण केली तरी सुधाताई म्हणतात ते अजून स्वप्नेच पाहत आहेत. खरं आहे, माणूस वयाने म्हातारा होत नसतो. पण तो जोपर्यंत वर्धिष्णु असतो तोपर्यंत तरुण असतो. बापू हे तसे तरुण आहेत. त्यांचे ८० वर्षांचे वय झाले म्हणण्यापेक्षा या वयाला ते संजीवनी देत आहेत. याचा प्रत्यय मला येतो. शिक्षणसंस्थेचे ते काम पाहतात. त्यांचा फोन येतो की रावसाहेब तुम्ही झोपलात का? मी जागा आहे म्हटल्यावर म्हणतात, अहो काय जागे आहात? पाहिले का शासनाचे जीआर काय निघालेत? वाचलेत का सगळे?शिक्षण चालू ठेवायचे का बंद करायचे. एखाद्या बंडखोराचे वक्तव्य असावे तसे बापूंचे व्यक्तिमत्व असते. तरुणांचे उत्साही वक्तव्य असते. एक प्रकारचा संतापही असतो, आवेशही असतो. शिक्षणातल्या अनेक समस्या, अनेक घोटाळे वर्णन करण्याची ही वेळ नाही. पण बापू त्या सगळ्या घोटाळ्याविरुध्द संतापून उठतात. त्यांचा तरुणाचा आवेश आजही दिसतो. एक दिवस मला फोन आला की अहो मला शरदरावांनी सांगितले की तुम्ही संगणकाचे काहीतरी रयत शिक्षण संस्थेत करत आहात. त्यासाठी मला चर्चा करायला यायचे आहे. म्हटलं तुम्ही या किंवा मला बोलवा. म्हणाले तुम्हाला कशाला बोलावू?



तुमच्याकडे मला जेवायला यायचे आहे. पण शिक्षणाची खरोखर शोकांतिका आहे. आमचे अध्यक्ष मा. शरदरावजी पवार यांच्या प्रेरणेने आम्ही संगणकाचा खेड्यापाड्यातील साडेचारशे हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन केले. एकूण अकरा कोटी रुपये लागत होते. अगदी जनरेटरही त्यात धरला. कारण विजेचे आपल्याला माहित आहे. गरजा वाढत चालल्या आहेत. बापूंना सगळी माहिती दिली. सांगितले की पैशामुळे आमचं नडलं. पवारसाहेबांनी विचारले की एवढी तयारी केली पुढे काय? कधी अंमलबजावणी? मी म्हटलं साहेब पैसे. पवारसाहेबांनी रात्रभर विचार केला.

दुसऱ्या दिवशी कर्मवीर पुण्यतिथीनिमित्त मोठा समारंभ साताऱ्यात होता. पवारसाहेबांनी तेथे सांगितले. तेथे जी काय दोन-चार मंडळी होती त्यांना सांगुन तू एक कोटी, तू पन्नास लाख असे म्हणून पाच कोटी रुपये तेथेच जमा करून दिले. सांगायला आनंद वाटतो की रयतच्या सगळ्या हायस्कूलच्या शाखांमध्ये संगणक आहे. अद्ययावत संगणक शिक्षण दिले जाते. पवारसाहेबांसारखे आम्हाला नेतृत्व आहे. समाजाविषयी कळकळ, जाण आहे. आम्ही नशीबवान आहोत. पण खरा प्रश्न हा आहे की ज्या इतर चांगल्या शिक्षणसंस्था आहेत त्यांनी पैसे उभारायचे कोठून? वेगळ्या अर्थाने पैसे ही गरज. पण बापूंचे म्हणणे शिक्षण म्हणजे पैसा आणि पैशावाल्यांचे शिक्षण. शिक्षण कशासाठी पैशासाठी.

राधाकृष्ण विखे-पाटील शिक्षणमंत्री होते. तुमचा कायदा असा की इतके स्केल दिलेच पाहिजे. देणगी घेता उपयोगी नाही. फी वाढवायची नाही. हा कायदा कोणाला मदत करतो? म्हणजे बाप भिक मागू देईना आणि आई जेवायला घालेना. ही अवस्था शिक्षणाची झाली. म्हणून तुमचा शिक्षणाचा कायदा खिशे भरणाऱ्यांसाठीचाच कायदा आहे. तो कशा अर्थाचा की मेडीकलला, इंजिनिअरिंगला ॲडमिशन पाहिजे तर इतके लाख द्यावे लागतील. पण पावती देता येणार नाही. तू गुन्हेगार मी गुन्हेगार. मग बिनपावतीचे माझ्या खिशात घाल. कोठल्या देणगीदाराच्या देणग्या उकळणाऱ्याविरुध्द अँटीकॅपीटेशन ॲक्टने काय कृती केली आहे? ते सांगावे. दुसरी अडचणीची बाब अशी की साहेबांनी पाच-साडेपाच कोटी रुपये दिले. पण आम्हाला सहा कोटी अजून पाहिजेत. कोठून आणायचे? प्रत्येक विद्यार्थ्यामागे शंभर रुपये घेऊ, देणगी घेऊ. पण कायद्यामुळे बंदी आहे. गुन्हेगार व्हाल. अशावेळेला बापूंसारखे लढवय्ये हे खऱ्या अर्थाने प्रकाश दाखविणारे असतात. चेतना देणारे, चैतन्य पेटविणारे असतात. बापूंचे जीवन हे खरोखरच त्यागाचे जीवन आहे. त्याग आणि समर्पणावर जग चालले आहे. अन्याय, अत्याचार सगळा अंधार असूनही जग का टिकले आहे तर बापूंसारख्यांनी जे जीवनाचे समर्पण दिले आहे त्याच्यामुळे. विनोबा भावे म्हणतात की, जो देतो तो देव, राखतो तो राक्षस. समर्पणाविषयी कुसुमाग्रजांची एक चार ओळींची कविता आहे.

असा एक याचक ज्याचा कटोरा
कशानेच भरत नव्हता.
नृपाळाने टाकली सिंहासने,
कुबेराने टाकली सुवर्णभांडारे
तरी तो रिकामा
पंडीतांनी शब्द टाकले,
पुरोहितांनी धर्म टाकले,
साधूंनी सत्व टाकले,
वीरांनी कर्म टाकले,
तरी तो रिकामा.
शेवटी याचक एका भिकारणीकडे आला.
म्हटला माई भिक वाढ, माई भिक वाढ
भिकारीण उघड्या स्तनाने
पाजत होती आपल्या तान्ह्या बाळाला
भिकारणीने स्तनावरचे मूल बाजुला केले,
स्तनावरचे दोन दुधाचे थेंब त्या कटोऱ्यात टाकले.
आता तो कटोरा भरभरून वाहू लागला,
अथांग सागरासारखा
तो याचक आता याचक राहिला नसून
दुधाचे थेंब वाटतोय सगळ्या दुनियेला
म्हणूनच एवढेच काही असून,
इतकं काही होऊन
मनुष्य जात अजूनही जीवंत आहे,
अजूनही जीवंत आहे

बापूंचे हे समर्पण मनुष्यजात जीवंत ठेवण्याचे समर्पण आहे. त्या उभयतांना मी शुभेच्छा देतो.

# एक संवाद बापूंशी



**नागरी गौरव समारंभाच्या निमित्ताने श्री. बापूसाहेब काळदाते यांची एक जाहीर प्रकट मुलाखत प्रा. गोपीनाथ बोरकर यांनी घेतली. ती या ठिकाणी उद्घृत करीत आहोत. आपल्या मनातील अनेक प्रश्नांना या मुलाखतीतून उत्तरे मिळतील, अशी आशा आहे.**

**प्रश्न : तुमचा जन्म कोठे आणि केव्हा झाला?**

माझा जन्म मांजरा नदीच्या काठावरती एका छोट्या गावात झाला. माझे सर्व शिक्षण पंढरपुरला झाले.

**प्रश्न : तुम्हाला आई-वडीलांचे छत्र किती काळ लाभले?**

संस्काराच्या दृष्टीने म्हणावे तसे आईचे छत्र लाभले नाही. कारण वयाच्या सहाव्या वर्षी मी गाव सोडून पंढरपूरला राहायला गेलो. वडीलांचे छत्र मिळाले, पण फार प्रभावीपणे नाही. त्यांचा करारीपणा, अध्ययनाचा त्यांचा व्यासंग, समाजाशी असलेले त्यांचे संबंध आणि अन्यायाच्या विरोधात त्यांच्या अवतीभोवती असलेल्या समाजात त्यांनी दिलेले लढे याचा माझ्या जीवनावर पुष्कळ संस्कार झाले. ते सर्व वाऱ्यांना आणि श्रावण महिन्यात किर्तनासाठी आल्यावर आमच्याबरोबर राहत असत.

**प्रश्न : आई नावाच्या संस्थेचा तुमच्यावर काय परिणाम झाला?**

पंढरपूरला आम्ही दोन कारणांसाठी गेलो. वडील वारकरी संप्रदायाचे होते. निजामी राज्याचा संस्कृतीवर परिणाम होतो, हे त्यांना कळले होते. त्यामुळे बाहेर शिकविता येईल, का हा विचार त्यांनी केला. माझ्या सावत्र आई म्हणाल्या की मी मुले घेऊन पंढरपूरला राहिले तर ते मराठीत शिकतील. मला रोज पांडुरंगाचे दर्शन घडेल. म्हणून त्या आम्हाला घेऊन आल्या.

**प्रश्न : तुमचे शालेय शिक्षण कोठे झाले?**

पंढरपूरची शाळा नंबर २ ही चोखोबांची समाधी होती त्याच्या शेजारी होती.

**प्रश्न : शाळेतील एखादा शिक्षक आठवतो का? ज्याने तुम्हाला प्रभावित केले?**

काणे गुरुजी नावाचे संस्कृतचे शिक्षक होते. मुलांशी अत्यंत प्रेमाचा संवाद साधणारे ते होते. इतर कोणी शिक्षक आठवत नाहीत की ज्यांचा माझ्या जीवनावर परिणाम झाला.

**प्रश्न : शालेय जीवनात असताना शालाबाह्य उपक्रम सहभागी होत होता का?**

शाळेत असतानाच मी सेवादलात गेला. १९३६ साली फैजपूरला काँग्रेस अधिवेशन झाले. ती ग्रामीण भागातील पहिली काँग्रेस. त्याच्या स्वयंसेवक दलाचे नाव राष्ट्र सेवादल होते. पुढे पाच वर्षांनी जेव्हा जाणीव व्हायला लागली की तरुणांचे संघटन वाढवून स्वातंत्र्यलढ्याला मदत करणाऱ्या विचारप्रवण तरुणांची संघटना उभी करण्याच्या संकल्पनेतून सेवा दलाचा जन्म झाला.

**प्रश्न : तुमचे उच्च शिक्षण कोठे झाला?**

माझ्यापुढे दोन पर्याय होते. बडोद्याला गायकवाडांच्या संस्थेत मोफत शिक्षण मिळायचे. वडीलांची तेथे शिकायला जावे अशी इच्छा होती. माझी वैद्य होण्याची इच्छा होती. त्यामुळे मी पुण्याला स.प. कॉलेजमध्ये सायन्सला प्रवेश घेतला. आमचे सेवादलाचे काही मित्र प्राध्यापक होते. सेवादलाच्या कचेरीच्या जवळ हे कॉलेज होते. पण माझा पुष्कळ वेळ सेवादलाच्या कामात फिरण्यात जात होता. काँग्रेस वर्कींग कमिटीची जेव्हा पुण्याला बैठक १९४५ साली बैठक झाली तेव्हा सर्व नेते जवळून पाहिले. स. प. कॉलेजवर सभा व्हायच्या. पंडीत नेहरू, वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत त्यात होते.

मला त्यामध्ये सर्वात उत्कृष्ठ नेते मौलाना अबुल कलाम आझाद वाटले. मी गांधींच्या प्रार्थनासभेलाही गेलो होतो. त्यांनाही जवळून पाहिले. तेथील एक स्वयंसेवक मी होतो. त्यावेळी हरिजन सेवक संघ होता. त्यांना कोणी सही मागितली की चार आणे घेऊन ते द्यायचे. आमचे काम असे होते की कोणाला सह्या पाहिजे असतील तर त्यांच्या वह्या घेऊन सह्या द्यायच्या.

जवाहरलाल नेहरू आणि खान अब्दुल गफार खान यांच्यासाठी पुण्यातील सेवादलाचा मेळावा बोलावला. त्यावेळी सेवादल म्हणजे स्वातंत्र्यलढ्यातील तरुण माणसांचे प्रातिनिधीक संघटन होते. पंडीतजी म्हणाले की तुम्ही स्वत:ला महाराष्ट्रात बांधून का ठेवले? तुम्ही महाराष्ट्राच्या बाहेर जा आणि देशभर या स्वातंत्र्याच्या कल्पनेचा प्रचार तरुणांमध्ये करण्यासाठी प्रयत्न करा. असा विचार सेवादलामध्ये झाला की त्यासाठी एक महिन्याचे शिबिर घ्यावे. त्यात कॉलेज कसे करायचे. मग परीक्षेच्या वेळी मी कॉलेजात जाऊ लागलो. बिनपुस्तकाचा, बिनकॉलेजात जाणारा मी होतो. मामासाहेब दांडेकर आमचे प्रिन्सिपॉल होते. ते वारकरी संप्रदायातील मोठे गृहस्थ होते. मी कॉलेजमध्ये काही शिकलो नाही.

आमच्या कॉलेजमधील सेवादलाचे प्राध्यापक घरी येऊन मला अख्खा पेपर सुध्दा देऊन जायचे. परंतु, मी काहीच वाचलेले नसायचे. त्यांनी मला एवढेही सांगितले की तु पत्र लिही मला नुसती. तरीही तुला पास करीन. पण या भानगडीत मी पडलो नाही. मी सर्व विषयांत पूर्णपणे नापास झालो आणि कॉलेज सुटले. त्याचवेळेला राष्ट्रसेवादलाने जे लोक परप्रांतात पाठविले त्यामध्ये मी आणि माझे मित्र अण्णा पवार यांचा समावेश झाला. आम्हाला सिंध प्रांतात पाठविले.

हा १९४७ चा काळ आहे. फाळणी झाली होती. सिंध हा अल्पसंख्यांक हिंदूंचा प्रांत आहे. पंजाबच्या सरहद्दीवर असलेल्या गावात शिबिर घेण्यासाठी तेथील काँग्रेसच्या मदतीने ५० लोक गोळा केले. अण्णा पवार निवृत्त लष्करी अधिकारी आहेत हे कळल्यामुळे आम्ही सशस्त्र आहोत की काय अशीही भीती व्यक्त केली. पण आमच्याकडे सुतकताईचे शिक्षण होते. सिंधमधल्या विविध भागांत मी गेलो. मी नित्यनेमाने पांढरी टोपी वापरत असे. सेवादलाचा नियम होता की तुमचा स्वत:चा ड्रेस हा तुम्ही कातलेल्या सुताचा असला पाहिजे. तेवढे सुत आम्ही कातलेले असायचे. गांधी टोपी घालून मी फिरायचो. गैरविश्वासाचे वातावरण जाणवेल इतके या भागात मला दिसले. हैद्राबादला मी आलो तेव्हा आमचे जे प्रमुख होते त्यांच्यावर हल्ला झाला. त्यामुळे असा निर्णय झाला की आपण आता थांबले पाहिजे.

३ जून १९४७ ला फाळणीचा निर्णय जाहीर झाला. तेथील सर्व लोकांनी मला उचलून धरणाच्या बांधाच्या पलीकडे मुसलमानाच्या शेतात काही दिवस ठेवून दिले.

तणाव वाढलेले होते. पण सामुहिक जात्यंधांची मस्तीचे प्रदर्शन होऊ लागले. त्यांनी तीन दिवसांनी तेथून उचलून मला कराचीला आणले. आम्ही सेवादलाला विचारले की येथे राहण्यासारखी परिस्थिती नाही. त्यामुळे आम्हाला कळविण्यात आले की तुम्ही शक्यतो लवकर परत या. सिंध हा असा प्रांत आहे की जेथे हत्या, जाळपोळ कमी झाली. सिंधी माणूस हा व्यापारी असल्याने सर्व शांततेच्या मार्गाने चालले होते. आमच्यापुढे प्रश्न होता की निघायचे कसे? आमच्यावर पोलीसांची नजर होती. मग सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे समुद्राचा.

आम्ही ठरविले की कराची ते मुंबई बोटीने जायचे. शेवटची बोट होती. तिचे नाव नेत्रावती होते. या बोटीने प्रवास करायचे ठरविले. पण त्यापूर्वीच पोलीसांनी पकडले. पण अण्णा फार हुशार होते. त्यांनी सांगितले की मी एका कंपनीचा प्रतिनिधी आहे. हे पोलीसांना पटल्यामुळे त्यांनी आम्हाला सोडले. पण आमच्या दुदैवाने त्या दिवशी वादळ झाल्यामुळे बोट निघालीच नाही. रात्री कोठेतरी झोपलो. दुसऱ्या दिवशी बोट निघाली. कराची ते मुंबई चार तासांत पूर्ण होते असे आम्ही ऐकून होतो. पण आम्हाला बारा ते चौदा तास लागले. बोट हेलकावे खात होती, माणसे ओकत होती. एकदाचे आम्ही मुंबईला आलो. पण डोक्यातून वैद्यकीय शिक्षणाचे गेले नव्हते. म्हणून मी प्रधान आणि एसएम यांना विचारले की मला आयुर्वेद कॉलेजमध्ये शिकायची परवानगी देतील का?



*महात्मा गांधी*

पुण्यातील आयुर्वेद कॉलेज हे स्वातंत्र्यसैनिकांचे. डॉ. बा.सी. लागु आणि अन्य स्वातंत्र्यप्रेमी लोकांनी ही संस्था स्थापन केली असल्याने त्यांचे प्रिन्सिपॉल सुध्दा चळवळीतील होते, सर्जन चळवळीतील होते.प्रधानांचा आणि गोखले या प्राचार्यांचा चांगला संबंध होतो. ते मला त्यांच्याकडे घेऊन गेले. विद्यार्थी म्हणून मला प्रवेश मिळाला. हे कॉलेज इतके कौटुंबिक होते की आम्ही प्राचार्यांना सर कधी म्हटलेच नाही. त्यांना आम्ही मामा म्हणायचो. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या जवळ यदुनाथ थत्ते, मी असे राहत होतो. मला वाचनाची मोठी आवड होती. त्या काळातील सर्व प्रसिध्द लेखकांचे सर्व लेखन मी वाचले होते.

**प्रश्न : सेवादल हीच तुमची शाळा होती म्हणायला हरकत नाही?**

सेवादल हीच शाळा आहे, ज्याचे माझ्यावर संस्कार आहेत.

**प्रश्न : त्या काळात इतरही युवक संघटना असतील. तिकडे तुम्ही आकर्षित कसे नाही झालात?**

माझा जाफर नावाचा मित्र होतो. त्याचे वडील आणि माझे वडील 'शेजारी' चित्रपट होता, तसे होते. एके दिवशी कोठे खेळायला जावे म्हणून आम्ही गेलो तर संघाची शाखा होती. संघशाखेवर आम्ही गेलो. त्यांनी नावे विचारली. मग शाखेच्या मुख्यांनी मला बाजुला घेऊन सांगितले की तू, नियमितपणे यावेस. पण तो मुसलमान आमच्याकडे चालणार नाही. मी त्यांना सांगितले की मुसलमान तुम्हाला चालणार नसेल तर मला संघ चालणार नाही. कारण तो मैत्रीचा भाग आहे. त्यामुळे आरएसएसबद्दल पहिल्यापासूनच मला ते अयोग्य संघटन आहे, असे जाणवले. सेवादलात जाण्याचे दुसरे कारण साने गुरुजी स्वत: आहेत. मी त्यावेळी किर्तनाला जायचो. त्यामुळे भाषेचा संस्कार चांगला झाला.

**प्रश्न : बापू तुम्ही सेवादलात गेलात? डाव्या विचारसरणीकडे म्हणजे समाजवादाकडे वळलात. मग तुम्ही कम्युनिझकडे कसे नाही वळलात?**

त्याचे कारण संपर्क आहे. साम्यवादी चळवळ महाराष्ट्रात फारसी कोठेच रुजलेली नव्हती. मुंबईपुरती मर्यादित होती. डांगेंचा संपूर्ण भर कामगारांवर होता, कारण मार्क्सने कामगारांबाबतच सांगितले होते. या डावेपणामध्ये महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्षाचा प्रभाव होता. त्यांनी एका अधिवेशनात मार्क्सवादाचा स्वीकार केला होता. पण तो केवळ कागदावर राहिला. प्रत्यक्षात बहुजन समाजाची चळवळ असे तिचे रुप राहिले. मला स्वत:ला जाती, धर्म यांचे कधी आकर्षण नव्हते. त्याचे कारण पंढरपूरला राहिल्यामुळे. कारण मी तुकारामांचा भक्त होतो. तुकारामांची

तीन वचने माझ्या जीवनात पुष्कळ बदल करून गेली. 'तुका म्हणे जो जो भेटे, तो तो वाटे मज जैसा' हे तुकारामांनी शिकविले. माणूस हाच मुख्य आहे, हे सांगणारे तत्वज्ञान मी तुकारामांकडून शिकलो. तुकारामांचा एक अभंग असा आहे - जाळीन मी ते भेद वेद ते प्रमाण' त्यांनी सांगितले आहे की वेदाचा तो अर्थ आम्हासीची घ्यावा, इतरांनी वाहवा भार माझा. ही दोन वचने सहजपणे तुमच्या जीवनात मानवधर्माचा प्रचार करतात. अन्याय स्वीकारून काही करायचे नाही. उदार झालो तर सर्वस्व तुला अर्पण करू. लढीन असे म्हणण्याचे बळ त्यांनी दिले. याचा प्रभाव माझ्यावरती झाला. त्याचे रुप समाजवादात सापडले. समतेचे आणि माणुसकीचे रुप सापडले.

**प्रश्न : बापू, बौध्दिक क्षेत्रामध्ये गोंधळ आहे. तुम्ही स्वत:ला लोकशाही समाजवादी म्हणतात. काही जण म्हणतात की लोकशाही म्हणजे व्यक्ती स्वातंत्र्य आणि समाजवाद म्हणजे शासनाचे नियंत्रण. स्वतांत्र्य आणि नियंत्रण एकत्र आणून समाजाची रचना कशी करू पाहता तुम्ही?**

हा विचार याचमुळे आला की एका बाजुला भांडवलशाहीच्या मार्फत शोषण होते. व्यापार वाढले, उद्योगधंदे वाढले, पण भांडवलाच्या जोरावर नफेबाजी करणे हे भांडवलशाहीचे मुख्य सुत्र मानले जाते. त्याच्याबरोबर उलट रशियात चालले आहे. जे काही होणार आहे ते समाजामार्फतच होणार आहे, असे ते मानत होते. लोकशाही समाजवाद्यांशी ही भूमिका होती की जसा पाण्याचा बिंदूही सत्य असतो आणि सिंधूही सत्य असतो, तसा व्यक्ती हाही सत्य आहे आणि समाज हेही सत्य आहे. या दोघांच्या सामंजस्यावरती समाज निर्माण करणे हे लोकशाही समाजवादाचे काम आहे. याच्यात विसंगती नाही. जगाच्या जीवनात ज्या दोन मतप्रवाहांनी नुकसान केले. विशेषत: स्टॅलिनच्या काळात, त्याची जाणीव केवळ आम्हालाच नव्हे तर तेथील समाजवाद्यांनाही झाली होती. किती निर्घृण, किती अमानुष साम्यवाद असू शकतो. सर्व सत्ता जर शासनाच्या हातात दिली आणि शासन जर चुकीच्या माणसांच्या हातात गेले तर तो किती सर्वनाश करू शकतो, याचे स्टॅलिन हा उदाहरण होतो. केवळ मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली तर त्या देशातील माणसे गरीब राहतात अणि काही भांडवलदार मोठे होतात.



*एस. एम. जोशी*

**प्रश्न : बापू, तुम्ही समाजकारणात राजकारणात सक्रीय राहिलात. तुमचे वैचारिक अधिष्ठान हे कोठल्या तरी चिंतनातून, वाचनातून आले असेल. महत्वाचे कोणते तत्वचिंतक वाचले?**

मी मार्क्सपासून, स्वप्नवादी ओव्यांपासून, त्यावेळच्या इंग्लंडच्या लोकशाही समाजवादाचे तत्वचिंतक होते ते सगळे वाचले. समाजवादासंबंधी स्वप्नवादी होते त्यांच्यापासून वास्तववादी समाजवादी जेव्हा इंग्लंडमध्ये उभे राहिले तोपर्यंतचे सर्व लिखाण वाचले असे नव्हे तर त्याचे योग्य स्वरुपाचे पठणही केले. कारण हे राष्ट्रसेवादलाचे काम होते. राष्ट्रसेवादल ही स्वातंत्र्यलढ्यासाठी तरुण माणसे तयार करण्याची शाळा होती. या शाळेमध्ये केवळ एखाद-दुसरे बौध्दिक घेऊन नव्हे तर पुस्तकाच्या पुस्तके समोर बसवून वाचून घेतली जायची. हे काम प्रधानमास्तरांनी केले. आठआठ दिवस आम्ही एक पुस्तक घेऊन बसायचो. उदा. अशोक मेहतांचे सोशालिझमवर एक पुस्तक आहे. हे पुस्तक त्यांनी दहा-पंधरा दिवसांचा गट बसवून त्यांनी वाचून घेतले.

'गांधी आणि मार्क्स' नावाचे पुस्तक आहे. त्यात लिहिले आहे की गांधी तर स्वीकारावा लागेल नाहीतर जगाचा सर्वनाश करावा स्वीकारावा लागेल. आचार्य नरेंद्र देवांचे लिखाण वाचले. या स्वरुपाच्या लिखाणाच्या वाचनाची सवय होती. प्रधान हे माझे मास्तर. मी जेव्हा पुण्यात आलो तेव्हापासून त्यांनी कधी आमच्याशी मोठेपणाचे वर्तन केले नाही. ते आमचे मित्र म्हणून वागायचे. त्यांच्या वागण्यात मी प्राध्यापक आहे अशी भावना नव्हती. निरनिराळ्या पुस्तकांचा उल्लेख होत होता. मला वाटले की आपल्याला या शहरात टिकायचे असेल तर ज्ञानाची कक्षा रुंदावली पाहिजे. मी प्रधानांना म्हटले की सर मी इंग्रजीचे एकही पुस्तक वाचलेले नाही. तेव्हा तुम्ही मला शिकवाल का? ते मला फर्गसनच्या ग्रंथालयात घेऊन गेले. ग्रंथपालाला सांगितले की या मुलाला पुस्तके द्या. पुस्तकाचा सारांश इंग्रजीमध्ये माझ्याकडून मागवून घ्यायचा. अडलेल्या

शब्दांचे अर्थ सांगायचे. आशय नीट समजला नाही तर विचारायचे. माझ्यावर भाषेचा संस्कार योग्य पध्दतीने होतोय की नाही हे ते पाहायचे. नंतर दुसरे पुस्तक वाचायला द्यायचे. त्यांनी इंग्रजी वाचनाची सवय लावली. माझ्यातील उणेपणाची जाणीव कमी झाली.

**प्रश्न : समाजवादाचे दोन तट पडले, एसएसपीवादी आणि पीसपीवादी. अर्थात डाव्या विचारसरणीत तट पडणे हा नेहमीचाच भाग आहे. पण तुमचा मनाचा कल कोठे होता आणि व्यवहाराची गरज म्हणून तुम्ही कोठे वळलात?**

माझ्या मनाचा कल साधा होता. एसएम जोशी यांच्यासारखा चारित्र्यवान, लढाऊ नेता असूच शकत नाही. जेव्हा ही फूट पडली तेव्हा आम्ही मुंबईत होतो. पण मन इतके अस्वस्थ झालो की मी घरी आलो तेव्हा सुधाला म्हणालो की येथे आम्ही टिकणार नाही. तेव्हा मला वाटायला लागले की पुन्हा पुण्याला जावे. आयुर्वेद कॉलेजमध्ये जावे अणि सरळ दवाखाना सुरू करावा. एका बाजुला नानासाहेब गोरे यांची वैचारिकता आणि दुसऱ्या बाजुला एसएम जोशी यांची संघर्षशील रचनात्मकता या दोघांच्यात फरक करणे अवघड होतो.

एसएम जोशी हा गरीबांचा खरा पुरस्कर्ता. लोहिया यांच्या विचारांबद्दल मला आदर होता. लोहिया केवळ संघर्षशिल होते असे नव्हे तर एक मूलगामी विचारवंत होते. त्यांच्यावर खूप टिका झाली. परंतु, समतेचे तत्वज्ञान हिंदुस्थानातल्या भूमीवर गांधीचा आधार घेऊन कसे निर्माण करता येईल, यासंबंधी मौलिक चिंतन त्यांनी केले. त्यांचा आम्हाला सिध्दांत होता की वर्षातून एकदा तरी कार्यकर्त्याने तुरुंगात गेले पाहिजे. काही जण म्हणाले तसा संघर्षाचा प्रसंग नसेल तर चोऱ्या करून जायचे का? परंतु, संघर्ष हे परिवर्तनाचे साधन आहे. ते वैचारिकदृष्ट्या लोकशाही समाजवाद आहे. त्या काळात त्यांनी सांगितले की जगातील व्हिसा बंद झाला पाहिजे कारण जग जवळ आणण्यातील व्हिसा ही अडचण आहे. पण त्याचबरोबर त्यांनी असे ही सांगितले की नेहरूंना तुरुंगात टाकले पाहिजे. पण त्यामुळे लोक रागावले आणि त्यांनी पहिले जे सूत्र सांगितले तेही विसरून गेले. ते मूर्तीभंजक होते.



*पंडित नेहरू*

**प्रश्न : बापू काही नावे घेतली की त्यांना दंडवत घालावासा वाटतो. ती प्रत्यक्ष तुमच्या जीवनात आली आहेत. जयप्रकाश नारायण, चंद्रशेखर, एसएम जोशी, राममनोहर लोहिया आदी. त्यांच्याशी प्रत्यक्ष संबध आला तो कामानिमित्त आला आणि त्यांच्याशी तुम्ही किती जवळ होता?**

मधु दंडवते यांचा सर्वात मोठा विश्वासातील माणूस मी होतो. अशी एकही गोष्ट नाही जी त्यांनी मला सांगितली नाही. मी एकाही माणसाचा स्नेह तोडला नाही. जयप्रकाश नारायण यांच्याबरोबर मी दीड वर्षे राहिलो. भूदानाची चळवळ सुरू झाली आणि त्यांनी पक्ष सोडला. हिंदुस्थानात सर्वात जास्त जमीन बिहारमध्ये मिळाली. या दरम्यान साने गुरुजी वारले पण त्या आधी सांगलीला जो कँप झाला त्यात सांगुन गेले की पाहा आपण स्वतंत्र झालो पण आपली जी खेडेगावे आहेत त्यांना दुरुस्त करणे आपले काम आहे. म्हणून यापुढे तुम्ही खेड्याकडे जा असा सेवादलाला संदेश दिला. कॅम्प संपला आणि आम्ही तातडीने खटाव नावाचे गाव आहे तेथे गेलो. गुरुजी आंतरभारतीचा प्रयोग करत होते. एसेएम आणि साने गुरुजी यांच्यातील प्रेमाच्या भांडणाची गोष्ट आहे.

बेळगावच्या शिबिराचा समारोप एसएम जोशींनी केला. त्या दिवशी साने गुरुजी धारवाडकडून येत होते. भयंकर गर्दीचे दिवस होते म्हणून आम्ही एसएम जोशींचे सेकंड क्लासचे तिकिट काढले. आम्हाला फोन आला की साने गुरुजी याच गाडीतून येत आहेत. ते थर्ड क्लासमध्ये होते. एसएम जोशी यांनी सांगितले की गुरुजी तुम्ही येथून उठा आणि माझ्या जागेवर जाऊन बसा. गुरुजी अत्यंत लाजाळु. मला तर ते पहिल्यांदा पाहिल्यावर आवडलेच नव्हते इतके संकोची आणि लाजाळु होते. कसा असेल हा मनुष्य इतका मोठा असे वाटायचे. अतिसौम्य त्यांचा स्वभाव होता. ते म्हणाले की जा अण्णा, मला गरज नाही. मी येथे छान बसलो आहे. यामध्ये गाडी सुटायची वेळ झाली.

गुरुजी वारले तेव्हा ठरले की स्मारक करायचे.

एसएम जोशींसह सर्वांनी ठरविले की पुतळा करायचा नाही. हे स्मारक ढोंगाचे आणि केवळ नमस्कारापुरते असणार नाही. कारण साने गुरुजींनी जे लिखाण केले त्यामध्ये लिहिले आहे की लोकशाही समाजवाद हे जीवनाचे स्वप्न आहे. राष्ट्रसेवादल माझा प्राण आहे. एसएम म्हणाले की त्यांनी आपल्याला खेड्यात जा म्हणून सांगितले ना. एक वर्षे त्यांच्या नावाने आपण सेवापथक चालवू. सुभाष सामुदायिक सहकारी सोसायटी ही हिंदुस्थानातील एकमेव शेतकऱ्यांची सामुदायिक सहकारी शेती होती. हडपसरला ही शेती होती. तेथे मेळावा घ्यायचे ठरले. त्याला दहा हजार तरुण आले. मग रोज सकाळी उठून ती मुले कामावर जायचे.

या मेळाव्याला आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश हजर होते. हे काम पाहिल्यावर त्यांना वाटले की आपल्याकडेही ते वाढले पाहिजे. ते एसएमला म्हणायचे की दोन तरुण माणसे माझ्याकडे पाठवा. एसएमनी मला विचारलो की तू, जाऊ शकशील का? मी म्हणालो की माझ्या शिक्षणाचा खर्च माझ्या वडीलांनी केला आहे. त्यांची परवानगी असेल तर मी जाईन. माझी वैद्यकीय क्षेत्रात काही नाव कमाविण्याची इच्छा नाही. त्यांनी माझ्या वडिलांना सांगितले की तुम्ही वारकरी आहात. आपण देवाच्या सेवेसाठी एखादा मुलगा देतो ना? तसा मी तुमच्या मुलाला मागतो. ते म्हणाले न्या. तेव्हा मी वडीलांना एवढेच कबुल केले आपल्या जमिनीतून पैसाही घेणार नाही. मग जयप्रकाशजींच्या आश्रमात राहू लागलो.


*एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे आणि किशोर पवार*

**प्रश्न : तुमचे राजकारण लोकांच्या समस्येभोवती म्हणजे जनआंदोलनाशी निगडित झालेले आहे. एक प्रश्न असा पडतो की भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील १९४२ चे आंदोलन विसरता येत नाही. त्यात तुमची भूमिका कशाप्रकारची होती?**

खरं तर मी त्यावेळी शालेय विद्यार्थी होती. सेवा दलावर इंग्रज सरकारने बंदी घातलेली नव्हती. त्यामुळे आम्ही दररोज सायंकाळी जमायचो. स्वत: एसएम जोशी मस्लिम नाव घेऊन काम करत होते. साने गुरुजींना आधी काही दिवस सोडण्यात आले होते. तेही या आंदोलनाचा प्रचार करत होते. समाजवादी त्यावेळी काँग्रेसमध्येच होते आणि त्यांचा असा निर्णय झाला होता की शांततेच्या माध्यमातून जसे आंदोलन चालू आहे तसे सरकारचे कामकाज ठप्प करण्यासाठी आपण आंदोलन केले पाहिजे. त्या आंदोलनाचा भाग असा होता की सरकारची यंत्रणा जितकी विस्कळित करता येईल तेवढी करायची. त्यातील दोन नियम महत्वाचे होते. कोणतीही माणसांना घेऊन जाणारी बस, रेल्वे यांचा विध्वंस करायचा नाही आणि कोणाही व्यक्तीची हत्या करायची नाही. सेवादलातील एका आग्रही ग्रुपने माझ्या शाळेच्या शेजारी असलेली म्युनिसीपालटीच जाळावी. पण त्यामुळे शाळेलाही आग लागली असती. माझ्यावर कामगिरी अशी होती की शाळेच्या रस्त्याने कोणी जात आहे का? हे पाहावे.

माझे मुस्लिम समाजातील मित्र होते. शेवटचा निरोप दिला आणि मशिदीत जाऊन बसलो. मी त्याच्याशी संबंधित आहे असे वाटल्याने पोलीसांनी आम्हाला दुसऱ्या दिवशी बोलावले आणि सांगितले की खबरदार पुन्हा असे काम केले तर याद राखा. त्यावेळी दुसरे काम असे होते की भूमिगत होते त्यांना आश्रय द्यायचा. कोल्हापुरात बर्मा बँक लुटली. यामध्ये जे लोक पळून आले त्यातील काही लोक पंढरपूरला आले, त्यांना आश्रय देणे माझे काम होते. ते माझ्याच खोलीवर राहायचे आणि वेश बदलून खाणावळीत जेवायचे. तिसरी घटना अशी आहे की पंढरपूर ते मिरज अशी नॅरोगेज गाडी होती. ज्या दिवशी पगारवाटपाचे पैसे घेऊन जाणारी गाडी होती ती लुटायची असे ठरले. त्या लोकांची तिकिटे काढणे, त्यांना त्या गाडीत बसवून ठेवणे ही जबाबदारी होती. उरलेला वेळ पॅम्लेट वाटणे अशा स्वरुपाची सामान्य भूमिका होती. पण एसएम जोशींनी भाषणात जे सांगितले ते खरं म्हणजे मनाला बोचलेले होते.

ते म्हणाले की तुम्हा तरुण माणसांना परकीय राज्याची लाज वाटत नाही का?

**प्रश्न : ४२ चे आंदोलन हे संघर्षाचे आंदोलन होते. लोकांची हत्या करायची नाही. परंतु, हिंसक होते. दुसरे टोक गाठले ते म्हणजे जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन. 'हात हमारा नहीं उठेगा, हमला जैसा कैसा हो' अशी टोकाची अहिंसक टोकाची भूमिका घेणारे जयप्रकाश यांच्याशी तुमची नाळ कशी जुळली?**

त्याचे कारण असे आहे की समाजातील सर्व गटांनी गांधी स्वीकारला नव्हता. समाजवादी चळवळीने गांधीचे दरिद्री माणसांसंबधी जे मुलभूत विचार आहेत, एवढ्या प्रचंड देशामध्ये काम करण्यासाठी प्रामुख्याने अहिंसक मार्गाने जावे लागेल. दुसऱ्या पक्षाप्रमाणे कोणत्याही बाहेरच्या देशाकडे पाहून आपले निर्णय न ठरविण्यासंबंधीची भूमिका जयप्रकाश नारायण यांची होती. समाजवादी हा काँग्रेसचाच एक गट होता. पण त्यांना परवानगी होती की तुमचा विचार मांडत राहा. इथली समाजवादी चळवळही मार्क्सवादावरच उभी राहिली आहे. त्यामुळे मार्क्सवादामधील काही अवशेष किंवा त्यातील काही महत्वाच्या गोष्टी समाजवादी मानत होते. शेतकऱ्यांचा देश आहे तेथे कामगारांचे राज्य ही कल्पना संभाव्य नाही. त्यामुळे शेतकऱ्यांकडे लक्ष आपण देणे जरुरी आहे. त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांमध्ये काम केले जाऊ लागले. शेतकरी आपल्या चळवळीत यावा,लाल टोपी त्याने वापरावी अशासंबंधीचा निर्णय घेतला.

**प्रश्न : गुजराचे नवनिर्माण आंदोलनाशी तुमचा संबंध किती आला?**

त्याचा परिणाम म्हणून राष्ट्रसेवा दल आणि समाजवादी चळवळीत याचा वापर प्रचारासाठी म्हणून झाला.भ्रष्ट राजवटीविरुध्द आपण उभे राहिले पाहिजे याच्याशिवाय महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीचा संबंध त्या आंदोलनाशी आला नाही.

**प्रश्न : भारतीय समाजाला जी घटना कधीच विसरता येणार नाही ती म्हणजे त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांन लादलेली आणिबाणी. या कालखंडातून आपण कधी मुक्त होऊ की नाही याप्रकारची भीती लोकांच्या मनात होती. अशा परिस्थितीत, अत्यंत प्रतिकुल वातावरणात तुम्ही, अनंतराव भालेराव आणि इतर सहकाऱ्यांनी सत्याग्रह केला. तुम्ही अगदी अंधारात उडी घेतली. अनेकांना वाटायचे आता हे गेले म्हणजे गेले. आता सुटणार नाहीत. हे मानसिक बळ तुम्हाला कोठून आले? सत्याग्रहात भारताचे पुढे काय होईल याबाबत तुमची मानसिकता काय होती?**

– ज्या दिवशी आणिबाणी लागू झाली तेव्हा बातम्यांना सांगितले की कोणाकोणाला पकडले. नंतर सेन्सॉरशिप सुरू झाली आणि बातम्या बंद झाल्या. आमची सामान्य प्रतिक्रिया होती की माणसाचे तोंड बंद केल्यावर जनावर होते. पण शेवटी माणूस आणि जनावरांच्या एकूण प्रेरणांमध्ये अभिव्यक्तीची प्रेरणा फक्त माणसांत असते. माणसाची अभिव्यक्ती ज्या दिवशी बंद होते त्या दिवशी माणसाचे जनावर होते. मला दुपारी मुंबईतून निरोप आला. एसएम त्या वेळी पूर्णियात काम करत होते जेथे नक्षलवाद प्रथम सुरू झाला. ते मुंबईला येत आहे असा निरोप आला. मी स्वत: इतका रागावला होतो की जाताना मी सरकारच्या ज्या कमिट्यांवर काम करत होतो त्याचे एक पत्र महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्याकडे घेऊन गेलो. त्यांना भेटलो. वसंतदादा शेजारी होते. मी त्यांना विचारले की स्वातंत्र्याच्या लढ्यात तुम्हाला बेड्या घालून ठेवलेले मला माहित आहे. तुमच्यासारख्या लोकांबद्दल आदर आहे. शंकरराव तुम्हीही हैद्राबादच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला आहे. आपल्या स्वत:च्या स्वातंत्र्याचे मरण आपल्या डोळ्यांनी पाहाणे मला शक्य नाही. हा राजीनामा यासाठी आहे की मी तुमचा विरोधक होतो म्हणून मी आणि तुम्ही एका समान पातळीवर होतो. आज तुम्ही आम्हाला खालच्या पातळीवर टाकण्याचा जो प्रयत्न करीत आहात तो मला सहन होत नाही. शंकररावांचे मोठेपण आहे की ते मला म्हणाले की मी तुम्हाला आजच सांगुन ठेवतो की एसएम जोशी,नानासाहेब गोरे आणि तुम्ही यांना आणिबाणीत थेटपणे सहभागी झाल्याशिवाय पकडणार नाही. मी म्हणालो की मी तुमच्या सद्भावनेबद्दल आभारी आहे. पण ती अभिव्यक्त करण्याचे स्वातंत्र्य तुमच्यामध्ये नसून इंदिरा गांधींमध्ये आहे.

त्यांनी सांगितले की यांना पकडा तर तुम्ही टाळू शकणार आहात का? नंतर आमची एक बैठक झाली. जॉर्ज फर्नांडिस यांच्यासारखे काम करणारा जो ग्रुप होता ते आम्ही सगळे पुण्याला आलो. मी सेवादलाचा प्रमुख होतो.

असे ठरले की सेवादलाने सेवादल म्हणून यात उतरायचे नाही. त्याची बुलेटिन छापायची नाहीत. सेवादलाच्या कार्यकर्त्यांनी विविध भागात विरोध करण्यासाठी मानसिकता तयार करणे हे आमचे काम होते. भूमिगत असणाऱ्या लोकांना सहाय्य करणे काम होते. संघटना म्हणून सेवादलाचा विरोध होता, पण संघर्ष म्हणून यात उतरायची भूमिका घेतली नव्हती. कारण सेवादल ही शाळा आहे. मी सत्याग्रहासाठी माणसे गोळा करत होतो. अडचण अशी झाली की मी ज्याच्या घरी जात होतो ते तुरुंगात जात होते. आमचे जवळचे नातेवाईकही भेटण्यास तयार नव्हते. हे सगळे झाल्यावर मला वाटले की या सगळ्यांचे जे जेलमध्ये गेले त्यांचे बाप मला म्हणतील की तु बरा जेवतोस, खातोस आणि आमची मुले तरुंगात पडलीत. म्हणून मी शेवटी एसएमना सांगितले की अण्णा आता मला बाहेर राहणे सहन होत नाही.

१९४२ च्या लढ्यात आम्ही काही केले नाही. ही नवी स्वातंत्र्याची लढाई आहे. याच्यात आम्हाला काम करण्याची संधी द्या. अनंतरावही अस्वस्थ होते. वर्तमानपत्र कशाला चालवायचे? येथे सरकारचा माणूस येऊन बसणार. मी लिहिलेले पाहणार. अग्रलेख कापून काढणार. तेव्हा मला वाटले की या स्वातंत्र्यलढ्यात मलाही भाग घ्यायचा आहे. काही मित्र गोळा करून सत्याग्रह करू. सुधा त्यावेळी विद्यापीठात होती. शरद पवार मंत्री होते. हे दोघे एकत्र येत होते. ती बोलता बोलता सहज म्हणाली की बापूला हे सहन होत नाही.


*ग. प्र. प्रधान*

सत्याग्रह करण्याची शक्यता आहे. त्यामुळे ते मला म्हणाले की तुम्ही मुंबईला चला. प्रतिभाला ते म्हणाले की हे लढवय्ये आहेत. अंधारात उडी मारणारे आहेत. तेव्हा याला जे आवडते ते जेवण करू या आणि दुसऱ्या दिवशी त्याला जे करायचे ते करू देत. जेवण करून दुसऱ्या दिवशी मी औरंगाबादला आलो. सुशिलकुमार शिंदेंची सभा केली. आम्ही सगळे मिळून नंदनवन हॉटेलमध्ये जेवलो. त्यांना माहित नव्हते की आम्ही काय करणार आहोत. २१ तारखेला कॅबीनेटची बैठक होती. घोषणा काही नव्हत्या. निर्भय बनो, महात्मा गांधी की जय अशा स्वरुपाच्या साध्या घोषणा होत्या. त्यांनी आम्हाला पकडले. कोर्टात हजर केले आणि तुरुंगात टाकून दिले. खटला चालला आम्ही त्यांना सांगितले की आम्हाला काहीही बोलायचे नाही. आम्ही हे मान्य करतो देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे आम्हाला योग्य वाटते ते केले आहे. तुमच्या मिसाखाली जर अयोग्य वाटत असेल तर आम्हाला शिक्षा द्या. आम्हाला दीड महिन्याची शिक्षा दिली. क्लास टू दर्जा दिला. संध्याकाळच्या भाजीला बावनपत्ती म्हणायचे. जेलमधल्या आवारात जेवढी झाडे असतील त्याची पाने खुडून भाजीत घालायची. दर रविवारी शिरा मिळायचा. यामध्ये त्यावेळच्या जनसंघाचे काही लोक सत्याग्रह करून तुरुंगात आले होते. त्यामुळे ग्रुप जमला. अधिकारी चांगले वागत. हा दीड महिना संपला आणि मी, अनंतराव घरी आलो. सगळ्यांनी शिरा खावा म्हणून केला आणि सगळे आपल्या घरी गेले. दुपारी अडीचच्या दरम्यान पोलीस अधिकारी आले आणि मला म्हणाले की तुमचा वेळ घेण्यात अर्थ नाही. तुम्हाला मिसाखाली आम्ही पकडले आहे. अनंतरावही त्यात होते. आमची नाशिकच्या जेलला रवानगी केली. आमच्या आधी मोहन धारिया आले होते. मी सांगितले की आम्हाला दोघांना एकच खोली द्या. आम्हाला 'ऐ' क्लास मिळाला होता. त्यात आम्हाला सकाळी चहा मिळायचा, लोणी लावलेला पाव मिळायचा. बाहेरून वस्तू आणून स्वयंपाक करून खाता येत होते. अगदी हॉटेलसारखी व्यवस्था होती. परंतु, मला हे अन्यायकारक वाटले. मी शंकररावांना पत्र पाठविले आणि त्यांना सांगितले हे अन्यायकारक आहे. माझ्या बाजुला निहाल अहमद आहेत, गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन आहे. तुम्ही आम्हाला ए क्लास देऊन कार्यकर्त्यांत भेदभाव करत आहात. शंकररावांनी त्याची दखल घेतली. सगळ्यांना पहिला वर्ग दिला. महाराष्ट्र हे एकमेव असे राज्य होते की येथे मिसाखालील कैद्यांना अ दर्जा होता. अ दर्जा म्हणजे मजा होती. झोपायला कॉट, मच्छरदानी, टेबललॅम्प द्यावा लागायचा. अनेक कार्यकर्त्यांसाठी ही चैनच होती. काही गरीब कार्यकर्त्यांनी ही सुखे अनुभवली नव्हती. मग

येथे ठरले की भाषा शिकायचे ठरविले. मग ज्यांना उर्दू येत नव्हते त्यांना अनंतराव शिकवू लागले. मग तेलगुचाही ग्रुप झाला. दुपारी हे उपक्रम चालायचे. संध्याकाळी खेळायचे. मग आम्ही सेवादलाची शिबिरे घ्यायचो, आरएसएसने त्यांच्या शाखा भरवायच्या असे चालायचे. एकदा माझी प्रेतयात्रा काढली. त्याचे कारण म्हणजे साधनामध्ये छापून आले की येथे असलेले संघाचे लोक लवकर निसटून जाण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे टेन्शन वाढले की पोलीसांना आम्हाला बंद करावे लागले. या तणावामुळे बराक्सची वाटणी करावी लागली. पण शेवटी समझौता झाला. मला अठरा महिने तेथे राहावे लागले. आम्ही एक बावन्न विषयांचा एक अभ्यासक्रम चालविला.त्यामध्ये कुराण, सर्व भारतीय दर्शने, समाजवाद, लोकशाही, हिंदूत्व अशी व्याख्यानांची मालिका आम्ही चालविली. सगळ्यात प्रश्न आला की संजय गांधी महाराष्ट्रात आल्यावर बोलले की निवडणुका होणार नाहीत. त्यामुळे सगळी तरुण मंडळी हताश झाली. त्यात आरएसएसची मंडळी खूप होती. त्यामुळे त्यांना समजाविण्याचे, त्यांचे मनोबल टिकविण्यासाठी आम्हाला खूप त्रास झाला. त्यात शंकररावांनी हुशारी केली. त्यांनी आमचे दोन कार्यकर्ते सोडायचे ठरविले. येथे ७५-८० वर्षांचे लोक होते. ते बाहेर जाऊन काही करणार आहेत. अभ्यंकर नावाचे पुण्याचे आरएसएसचे प्रमुख होते, उस्मानाबादचे एक गृहस्थ होते. एक खोमचावाला तर केवळ बुलेटिन जवळ सापडल्यामुळे पकडला गेला. तो या बुलेटिनमध्ये शेंगदाणे विकायचे. शंकररावांनी त्यांना सोडायचे ठरविले. त्याप्रमाणे ऑर्डर आली. पण त्यात शंकररावांनी एक डाव टाकला त्याचे आम्ही बळी झालो नाही, पण आरएसएस त्याची बळी झाली होती. सुटण्यासाठी जो अर्ज होता की त्यामध्ये लिहिले होते की मी जे केले आहे ते चुकलेले आहे. यापुढे मी सरकारच्या विरोधात पुन्हा गैरवर्तन करणार नाही. आम्ही याला विरोध केला. सांगितले की सरकारने आम्हाला बिनशर्त सोडले तरच आम्ही बाहेर जाऊ. पण आरएसएसने वेगळीच भूमिका घेतली. त्यावरून आमची आणि त्यांची मोठी लढाई त्यांनी ऑरग्युमेंट करायला सुरूवात केली शिवाजीमहाराज काय तसेच कैदेत राहिले काय? पळून गेले नव्हते का? आम्ही त्यांना सांगितले की शिवाजीमहाराज माफी मागून पळाले नव्हते. पेटाऱ्यातून पळाले होते. तुमची हिम्मत असेल तर भिंतीवर उड्या मारून पळा. आम्ही एसएम यांना विचारले. त्यांनी सांगितले की बिनशर्त सुटका असेल तरच ती मानायची. आम्ही संघाच्या लोकांना सांगितले की तुम्ही राजकीय कार्यकर्ते आहोत. उद्या काही लिहून दिले तर त्याचा निवडणुकीत तुमच्या विरोधात उपयोग केला जाईल. हा काळ माझ्या आयुष्यातील चांगला काळ मानतो. काही विशिष्ट विचारांसाठी आपण काही करू शकलो. आम्ही सत्याग्रह करून तरुंगात गेलो होतो. संघाच्या लोकांना सरकारने जाणूनबुजून पकडले होते. या वेळी प्रमोद महाजन, गोपीनाथ, जयसिंग गायकवाड यांची मैत्री झाली. पुढे निवडणुकीत त्याचा उपयोग झाला.

**प्रश्न : मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर याबद्दल तुम्ही नेमकी, निश्चित भूमिका केव्हा घेतली?**

– एक्झीक्युटिव्हचा ठराव होण्याअगोदरच चळवळ सुरू झाली होती. दलितांमध्ये अपरिहार्यपणे कारण त्यात बाबासाहेबांचे नाव होते, पण इतर पुरोगामी संघटनांचाही त्याला पाठिंबा होता. काही संघटना माझ्याकडे आल्या. मी त्यांना म्हणालो की मला स्वत:ला वाटते की हे नाव देण्यात काही चुकीचे नाही. कारण या निमित्ताने आपण एका ज्येष्ठ, श्रेष्ठ विद्वानाचा गौरव करत आहोत. त्यांची येथे संस्था आहे. हजारो तरुणांना त्यांनी शिक्षित केले आहे. त्यामुळे माझा त्याला विरोध असायचे कारणच नाही. दुसरी गोष्ट म्हणजे ठराव झाला आहे त्यामुळे कोणी विरोध करू नये. काही असले तरी एक गोष्ट सत्य आहे की दलितांना बाबासाहेबांखेरीज कोणीही दैवत नाही. बुध्द झाले कारण बाबासाहेब बुध्द झाले. त्यामुळे त्यांना एकच परमेश्वर आहे. हिंदूच्याकडे अनेक, वाट्टेल तेवढे आहेत. त्यामुळे दलितांना वाटत असेल माझी त्याला काही हरकत नव्हती.

**प्रश्न : बापू, तुम्ही नामांतरवादी होता. एसएम होतेच होते. पण एसएम नामांतरवादी असूनही त्यांना जो त्रास झाला तो कोणामुळे झाला?**

पहिल्यांदा लक्षात घेतले पाहिजे की नामांतर हा शब्द मला पसंत नव्हता. कारण नामांतर शब्दाने फार घोळ केला. अस्मितेचा प्रश्न वर आला. दलितांच्यामध्ये सुध्दा अस्मितेच्या प्रश्नावर आंदोलने सुरू झाली. मी याला नामविस्तार हा शब्द वापरला आहे. आज अनेक लोक हा शब्द वापरत आहे. मी त्यांना सांगत होतो की मराठवाडा हा शब्द यासाठी ठेवला आहे की हे मराठवाड्यातील आहे.

आपल्याकडे बाबासाहेबांनी सेवा केली असल्याने हे बाबासाहेबांच्या गौरवाचे प्रतिक मानतो. मी त्यावेळी पार्लमेंटचा मेंबर होतो. तिकडे शरद पवार काँग्रेसमधून बाहेर पडले होते. त्यांच्या मनात आमच्याशी संगनमत करावे असे होते. एसएम जोशी महाराष्ट्र जनता दलाचे अध्यक्ष होते. मी नामांतराचा पुरस्कार केला त्याचा परिणाम येथे दंगली होण्यावर झाला. ज्यादिवशी मंत्रीमंडळाचा शपथविधी व्हायचा त्यादिवशी आम्ही मंत्र्यांची यादी घेऊन मुंबईला उतरलो. मी एसएमना म्हणालो की मी या औरंगाबादचा प्रतिनिधी आहे. कोणी आमदाराने हे म्हणण्याची हिम्मत दाखविली नाही. त्यामुळे मी त्यांना सांगितले की मतदारसंघात निघालो.

माझे नाव मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीतून गेले. ते काय कारणामुळे त्याच्या मींमासेत मी जात नाही. परंतु, यशवंतराव चव्हाणांनीच सांगितले होते. गेले ते गेले. राजकारण हे स्वत:च्या सत्तेसाठी वापरण्याचे साधन नाही, हे परिवर्तनाचे साधन आहे असे आपण मानत असू तर त्यामधल्या पदांबाबत आपण आग्रही असणे चुकीचे आहे ही माझी पहिल्यापासून भूमिका होती. एसएम हा ऐवढा मोठा नेता की त्यांनी शरद पवारांना सांगितले की मी बापूंना एकट्याने जाऊ देणार नाही. मी सुध्दा बापूंच्या बरोबर सकाळच्या विमानाने औरंगाबादला जाणार. शरदराव मुख्यमंत्री होते, त्यांनी पोलिसांना कळविले असणार.

पोलीसांनी मला सांगितले की तुम्ही घरी जाऊ नका, कारण तुमच्या घराची सिक्युरिटी अवघड आहे. तणाव इतके भयंकर आहेत की दगडफेक होईल, जाळतील सुध्दा घर. मी म्हटले की हे मी करणार नाही. मी या गावचा आहे. माझे घर आहे. असे असताना संरक्षण मिळत नाही म्हणून गेस्ट हाऊसवर राहणे मी पसंद करणार नाही. जे काही व्हायचे असेल तर या घरात होईल. जो माणूस देशासाठी दहा वर्ष तुरुंगात गेला त्याला आम्ही तीन दिवस तुरुंगात होतो असे म्हणण्याचे औद्धित्य दाखवणारे लोक आम्ही पाहिले. पण शंकराने जसे विष गिळावे तसे एसएम जोशी यांनी त्यांचे सर्व शब्द ऐकले. एकही अनुचित प्रकार घडला नाही.

यामध्ये विशेषत: जवळचे लोक आमच्या विरोधात गेले. अनंतरावांचा भयंकर विरोध होता. त्याचे कारण हे अस्मिता आहे. दुसरे एक कारण आहे की जर मराठवाडा विद्यापीठाला नावच द्यायचे असेल तर स्वामीजींचे का नाही द्यायचे? कारण येथील स्वांतंत्र्यचळवळीचे ते अग्रदुत होते. त्यामुळे त्यांचे द्यावे असे त्यांना स्वाभाविकपणे वाटत होते. स्वामीजींचे विसरले गेले पण अस्मितेच्या प्रश्नावर दंगे झाले. यामध्ये समाजातील तरुण होते. एसएम आणि मी आठ तास बसलो.

मी बाळासाहेब पवारांना म्हणाले की तुम्ही एक पत्रक काढा. आपण मराठवाड्यात शांतता आणली पाहिजे. ते हो म्हणाले. जाताना आम्ही वैजापूरहून गेलो. कारण हा प्रश्न आला की या नामांतराचे करायचे काय? तेव्हा मी, गोविंदराव तळवळकर, एसएम जोशी असे बसलो होतो. माझे म्हणणे होते की हा प्रश्न एकदम आणण्यापेक्षा सगळ्यांशी बोलले पाहिजे. भाई, अनंतराव यांच्याशीच नव्हे तर समाजातील इतर लोकांशी बोलणे चांगले. आमदार सरकार चालवित असल्याने कदाचित मतही देतील. पण समाजामध्ये हा प्रश्न तणावपूर्ण होण्याची शक्यता मला वाटते. ते शरद पवारांनी लिहिले आहे. त्यांनी म्हटले आहे की बापू काळदातेंचे म्हणणे होते की आपण सावधपणे घ्यावे. एसएम आणि मी गेलो तेव्हा आमच्या दोघांचेही मत झाले की आता हा प्रस्ताव पुढे रेटण्यात अर्थ नाही. कारण याने तणाव वाढेल. पण ते म्हणाले की तू, रेडिओवर बोल की आम्ही भेटलो मुख्यमंत्र्यांना. मुख्यमंत्र्यांनी येथील जनतेची एकंदर तणावाची धारणा लक्षात घेऊन हा प्रस्ताव स्थगित केला आहे.

पुन्हा एसएम जोशींचे मोठेपण आहे. ते मराठवाड्यात आले आणि सर्व ठिकाणी फिरले. सरस्वतीभुवनला आले, मिलिंद महाविद्यालयात गेले. नरहररावांच्या अध्यक्षतेखाली नांदेडला बोलले. उद्गारला तर त्यांना जोड्याच्या माळा घातल्या. पण ही भूमिका ते मांडत राहिले की यामध्ये आपल्याला अपमानित होण्यासारखे काही नाही, आपल्याला गौरव वाटायला पाहिजे. परंतु, ती स्थगित झाली. एसएम जोशी मरताना शरद पवारांना म्हणाले होते की बेळगाव महाराष्ट्रात येणे आणि नामविस्तार होणे हे माझ्या जीवनात फार आवश्यक वाटते. जेव्हा मुंबईला बॉंबस्फोट झाला तेव्हा शंकररावांना उचलून दिल्लीला पाठविले आणि शरद पवार यांना मुख्यमंत्री म्हणून पाठविले. त्यांनी दोन-तीन दिवसांत मुंबईचे दंगे वगैरे ठिकठाक केले. मला एकेदिवशी बोलावून म्हणाले की बापू, अण्णांचे म्हणणे आपल्याला

साकार करता येईल असे तुम्हाला वाटते का? त्यांनी एक कमिटी केली आणि मला अध्यक्ष केले. त्यामध्ये मग मी गोपीनाथ मुंडे, आठवले या सगळ्या लोकांशी बोललो. मग मी भाईंकडे जाऊन म्हणालो की मला स्वत:ला हा अस्मितेचा प्रश्न वाटत नाही, परंतु या प्रश्नात जर सामाजिक तणाव कायम राहिला तर आपल्या सारख्या अविकसित भागाचा विकास करणे अवघड जाईल. तणाव दूर करण्याचा हा रस्ता आहे. भाईंनी काही सूचना केल्या. त्यातील सूचना स्वामीजींच्या नावाची. मी आधीच शंकररावांना सांगितले की तुम्ही विरोध करा, पण याचा आपण विचार करू असा शेवट करा. मला ठरावाचा पराभव होणे योग्य वाटत नाही. त्यांनी मान्य केले. मी शरद पवारांना म्हणालो की तीनही गोष्टी एकत्र करणे चांगले. मी त्यांना सांगितले की तुमचे जे कार्यकर्ते आहेत ते यामध्ये पुष्कळ संख्येने होते. बहुजन समाज मोठ्या प्रमाणात होता. तेव्हा आपण असे करू की मी औरंगाबादमध्ये आणि तुम्ही जेथे असाल तेथे या कार्यकर्त्यांना बोलावून घ्या. हे आपण पार पाडले पाहिजे अशा स्वरुपाचे अपील त्यांना करत जा.

**प्रश्न : आजचा काळ व्यवहारवादाच्या सुनामी लाटा घेऊन आला आहे. एकीकडे व्यवहारवाद आणि तुमचा आदर्शवाद यात सांगड कशी घालता?**

– इतिहास तपासून पाहिला तरी सैध्दांतिकता आणि तिच्या वापराचे व्यवहार यांच्यामध्ये सिद्धांत न सोडता तडजोड करता येते, असा माझा अनुभव आहे. तडजोड आणि संधीसाधूपणा यात सीमारेषा अत्यंत धुसर असतात. या समजण्याचे सामर्थ्य तुमच्याजवळ असेल तर तडजोडी करता येतात. आजच्या अतिशय गळेकापू स्पर्धेमध्ये ज्या अपप्रवृत्ती आहेत त्यांचा प्रभाव वाढत असताना आपल्याला दिसतो आहे.याचा अर्थ असा नाही की त्या वाढणार आहेत, म्हणून आपण थकून जावे. उलट मी असे मानतो की ही व्यवस्था हे आम्हाला आव्हान आहे. आम्ही ज्या स्वरुपाच्या व्यवस्थेचा विचार करत आलो, ज्या शिक्षणाचा विचार करत आलो त्याला हे आव्हान आहे. ते आपण स्वीकारले पाहिजे. त्यासाठी आवश्यक तो व्यवहारवाद आणि आपली असलेली जी काही सामाजिक बांधिलकी या दोघांच्या तडजोडीचे प्रयत्न केले पाहिजेत.

**प्रश्न : बापू आपण लोकशाही स्वीकारली. परंतु, लोकशाहीत लोकच हतबल झाले आहेत. समाजकारण, राजकारण यामध्ये एकप्रकारची बधिरता आली आहे. लोकांमध्ये भावना निर्माण होत आहे की जे चालले आहे ते असेच चालणार. म्हणजे चांगले आणि वाईट यातील मर्यादा कमी होत आहे. यावर काय उपाय आहे? लोकशाहीचे आदर्श सांगणे वेगळे, प्रत्यक्षात काय करू शकतो?**

– स्वातंत्र्यपूर्वकाळात काय होते? त्या काळातही मेकॉलेच्या प्रयत्नाचा मुख्य भाग हाच होता की यातला जो बुध्दीजीवी वर्ग इंग्रजाळलेला करायचा. या वर्गाला भविष्य समजतो, तो अनुकुल केला आणि त्याच्या मार्फत राज्य केले तर सामान्य माणूस गोंधळून जातो. मी स्वत: असे मानतो की आज एका बाजूला सगळे जग जवळ आल्यामुळे आणि विज्ञानाचा झपाटा विशेषत: ॲटमबाँबच्या काळानंतर विज्ञानाने प्रचंड वेग घेतला. याचा परिणाम एका बाजूला अतिशय चांगला झाला. परंतु, जगामधील सगळी गुंतागुंत जगामध्ये आली. भूगोलाच्या नकाशावरच्या सीमा सोडल्या तर जगाला कोठेही सीमा उरलेली नाही अशा जगात आपण आलो आहोत.

या जगाची विकासाच्या नावाखाली पैसे म्हणजे ज्याला रिसोर्स जनरेशन म्हणतो यामध्ये आपण एका बाजूकडे दुर्लक्ष केले ते म्हणजे ह्यूमन रिसोर्स. या देशामधील जनशक्तीचा वापर विकासासाठी करण्याऐवजी आपण धनशक्तीच्या जोरावर विकासाच्या मागे लागलो. त्याचा परिणाम धनशक्ती वाढत गेली आणि जनशक्ती कमजोर होत गेली. या कमजोर असलेल्या जनशक्तीला काही वेळेला असे वाटायला लागते की धनशक्तीचाच प्रभाव पुढे चालणार. ज्याला व्यवहार म्हणून भ्रष्टता करावी लागते, लाचारी पत्करावी लागते ती भ्रष्टता आणि लाचारी ही या समाजव्यवस्थेची एक अपरिहार्यता म्हणून आलेली आहे. तरी जसे गांधींच्या चळवळीने यावर मात करण्याच प्रयत्न केला तसे या जनतेमधला आक्रोश आजच्या परिस्थितीवर सुध्दा मात करेल. काळ कमी लागेल असेही माझे मत आहे. कारण एकूणच सगळा वेग वाढत असल्याने या परिवर्तनाला फार वेळ लागेल असे मी स्वत: मानत नाही.



# कृष्ण आणि महाराष्ट्र

-डॉ. सदानंद मोरे
तत्त्वज्ञान विभागप्रमुख,
पुणे विद्यापीठ, पुणे

विविधतेने नटलेली आणि त्यामुळे जगाचे लक्ष वेधून घेणारी भारतीय संस्कृती कोणालाही हेवा वाटावी अशीच आहे. या वैविध्याला सहिष्णुतेचे कोंदण लाभल्यामुळे ते चिरस्थायी झालेले आहे.

अशा या सांस्कृतिक वैविध्याचा ल.सा.वि. काढायचा झाला तर जे उत्तर मिळते ते आहे 'श्रीकृष्ण'. श्रीकृष्ण हा देशातील सर्व प्रदेशांमधील सर्व थरांतील सर्व वयोगटातल्या स्त्रीपुरुषांना आवडणारे दैवत आहे. भारतातील साहित्य, कला, तत्त्वज्ञान इ. चा विकास खूप वेळा कृष्णाला केंद्रस्थानी ठेऊन आणि कृष्णाच्याच अनुषंगाने झालेला दिसतो. कृष्णाच्या भगवद्गीतेने शंकराचार्य ज्ञानेश्वरांपासून टिळक, गांधी, विनोबांपर्यंतच्या अनेक भाष्यकारांना आकृष्ट केले. पारतंत्र्याच्या काळात तर क्रांतिकारक हातात भगवद्गीता घेऊन हसतमुखाने फासावर चढलेले आहेत. एका बाजूने गंभीर आणि प्रगल्भ तत्त्वज्ञान सांगणारा कृष्ण दुसरीकडे योद्धा म्हणून क्षात्रतेजाने तळपताना दिसतो, तर तिसरीकडे गोपाळगड्यांबरोबर बाललीलांत दंग होऊन वडिलधाऱ्यांच्या मिष्किल खोड्या काढताना दिसून येतो. गोकुळातील गोपिकांबरोबर रास नावाच्या लोकनृत्यातही त्याने तितक्यात तत्परतेने भाग घेतलेला.

हाच कृष्ण पांडवांच्या मदतीला धाऊन जाऊन त्यांचा कौरवांच्या पाशवी शक्तीपासून बचाव करतो. सुदाम्यासारख्या गरीब मित्राची आठवण ठेऊन त्याची नड भागवतो. पांडवांच्या यज्ञातील पंक्ती उठल्यावर उष्टी खरकटी काढण्यात कमीपणा मानीत नाही. भारतीय युद्धात अर्जुनाचा सारथी झालेला कृष्ण रात्री सर्व योद्धे झोपी गेल्यावर घोड्यांना खरारा करीत त्यांच्या दाणापाण्याची व्यवस्था लावताना दिसतो. बासरीसारखे नाजूक

वाद्य तो जितक्या हळूवारपणे हाताळतो तितक्याच जोरकसपणे तो कंसाच्या दरबारातील कसलेल्या मल्लांना अस्मान दाखवून चित करतो. भारतातील चित्र, शिल्प, संगीत, काव्य, नाट्य अशा सर्व प्रकारच्या कला कृष्णापासून प्रेरणा घेऊन समृद्ध झालेल्या आहेत. तो नुसताच अवतार मानला गेला नाही तर पूर्णावतार मानला गेला हे लक्षात ठेवले पाहिजे. त्यामुळेच भक्तीमार्गीयांमध्ये कृष्णाचे पंथ विविध निघाले. बंगालमध्ये चैतन्य महाप्रभूंचा तर आसाममध्ये शंकर देवांचा. दक्षिणेतील निंबार्क आणि वल्लभ अशा आचार्यांचे. तर महाराष्ट्रात चक्रधरांच्या महानुभव आणि ज्ञानेश्वर-नामदेवांच्या, वारकरी-वारकऱ्यांचे आराध्य दैवत. पंढरपूरचा विठोबा हे तर कृष्णाचे द्वारकेतून झालेले अवतरण मानले जाते. ''द्वारकेचे केणे आले याची ठाया । पुढे भक्तराया चोजवित'' या शब्दात तुकोबांनी आपल्या दैवताची ओळख करून दिलेली आहे.

श्रीकृष्ण आणि विठ्ठल हे एकरुप आहेत या धारणेतूनच श्रीकृष्णाचा उपदेश शब्दबद्ध करणारी भगवद्गीता विठ्ठलाचाही ग्रंथ होऊ शकली आणि तिच्यावरील ज्ञानेश्वरांचे भाष्य-ज्ञानेश्वरी-वारकरी पंथाचा धर्मग्रंथ बनू शकली.

मराठी भाषा आणि साहित्य यांच्या विकासाला कृष्णच निमित्त ठरला. गीतेच्या तत्त्वज्ञानाचा विस्तार करून ज्ञानेश्वरांनी मराठीला अमृतातेही पैजा जिंकण्याचे सामर्थ्य प्राप्त करून दिले. महानुभव पंथाचा धर्मग्रंथ 'लीळाचरित्र' ज्या चक्रधरांचे चरित्र सांगतो ते चक्रधर म्हणजे कृष्णाचेच अवतार अशी पंथियांची श्रद्धा आहे. हा ग्रंथ मराठीतील आद्य गद्य ग्रंथ होय. शिवाय स्वतः चक्रधरांचे श्रीकृष्ण चरित्र निरुपिते ते वेगळेच. तिकडे ज्ञानेश्वरांच्या विराण्या सुद्धा कृष्ण गीतच आहे. नंतरही प्रत्येक मराठी संतांनी कृष्णाची बाळक्रीडा गायली आहेच. कृष्णाच्याच चरित्राचे व तत्त्वज्ञानाचे विवरण करणाऱ्या गीता भागवत ग्रंथावर भाष्य करीत करीत मराठीला प्रौढत्व आले. दासोपंथाचे गीतार्णव नावाचे भाष्य गीतेवरील सर्वात विस्तृत भाष्य होय. बिहरा जातवेद, एकनाथ, कृष्णदास दामा, शिवकल्याण अशा मराठी कवींनी भागवतावर मराठी साज चढविला. रुक्मिणी स्वयंवर हा तर महाराष्ट्राचा मोठ्या कौतुकाचा विषय. कृष्ण हा महाराष्ट्राचा जावईच. रुक्मिणी म्हणजे विदर्भाचा राजा भीमक याची कन्या. अमरावती ही भीमकाची राजधानी. अर्थात त्याच्या स्वतःच्या आणि युवराज रुक्मी यांना रुक्मिणीचे लग्न शिशुपालाशी करायचे होते. पण रुक्मिणीने मनातून कृष्णाला वरलेले. तिने कृष्णास पत्र पाठवून आपले मनोगत



व्यक्त केले. तेव्हा कृष्णाने ऐन विवाहाच्या वेळी अमरावतीत अवतीर्ण होऊन रुक्मिणीचे हरण केले. असा हा प्रेमाला प्रतिसाद देणारा नामक योद्धा.

कृष्णाचे राजनीतीज्ज्ञ आणि मुत्सद्दी रूप पाहायचे असेल तर महाभारताला पर्याय नाही. बालपणी मुरली वाजविणारा हा कृष्ण आता हातात सुदर्शन नावाचे चक्र व कौमुदिकी नावाची गदा बाळगीत असतो. शिवाय शारंग हे धनुष्यही त्याचेच. म्हणून तर त्याला शारंगधर किंवा शारंगपाणी म्हणतात. बालवयात गाई-बैलांच्या खिलारांशी मस्ती करणाऱ्या कृष्णाची आता रथाच्या घोड्यांशी दोस्ती आहे. महाभारतात अर्जुनाच्या रथाच्या घोड्यांची सुद्धा नावे आलेली आहेत.

युद्धात प्रविण असणारा कृष्ण नीतीत म्हणजे राजनीतीतही तितकाच निपुण आहे. युद्धात तो शक्तीपेक्षा युक्तीचाच अधिक प्रयोग करतो. शत्रूची मर्मस्थाने ओळखण्यात त्याच्या इतका तरबेज कोणीच नाही. पांडव कौरवांनी हरवू शकले याचे फार मोठे श्रेय कृष्णाच्या युद्धनितीला आहे. कोणत्या प्रसंगी कोणती चाल खेचून शत्रूवर मात करायची यात तो महावाक्‌बगार आहे. पण तरीही तो युद्धखोर नसून शांतताप्रिय आहे. युद्ध टाळण्यासाठी तो शेवटपर्यंत प्रयत्नशील असतो.



पण अंगावर आलेल्याला शिंगावर घ्यायलाही तो कचरत नाही. कौरव-पांडवांचे युद्ध टाळण्यासाठी त्याने खूप खटपट केली. तडजोड व्हावी म्हणून स्वतःचा जीव धोक्यात घालून तो जातीने कौरवांच्या दरबारात गेला. तेथील मानकऱ्यांना व मुत्सद्यांना युद्धाचे दुष्परिणाम समजावून सांगितले. पांडवांना पाच गावे मिळाली तरी पुरे इतकी तयारी दाखविली. अलिकडील भाषा वापरून सांगायचे झाले तर त्याने पर्यावरणाची प्रतिमा सुद्धा वापरली. कौरव म्हणजे वन आणि पांडव हे वनातील वाघांप्रमाणे आहेत. वाघांमुळे वनाचे रक्षण होते. त्यांच्या भीतीनेच लोक वनात येऊन वृक्षतोड करीत नाहीत परंतु त्याचबरोबर वाघही वनाच्याच आश्रयाने, वनातच सुरक्षित असतात. म्हणून वनाचा नाश होऊ देऊ नये व वाघांनाही मारू नये अशा पद्धतीने कृष्ण उपदेश करतो. परंतु कौरवांच्या व स्वतः दुर्योधनाचा घडा पालथाच असल्याने उपदेशाचे पाणी आत शिरतच नाही. शेवटी युद्धाला पर्यायच उरत नाही.

पांडवांनी युद्धाची तयारी केली ती कृष्णाशी सल्लामसलत करूनच. त्याच्या मसलतीचे पांडवांना एवढे महत्त्व वाटत होते की एका बाजूला त्याचे नारायण गण या नावाने प्रसिद्ध असलेले लढाऊ सैन्य आणि दुसऱ्या बाजूला तो स्वतः परंतु निःशस्त्र, बिनलढाऊ. या पर्यायांमधून पांडवांनी सैन्य कौरवांना देऊन आपण 'न धरी शस्त्र करी' अशा कृष्णाची निवड केली. कारण त्याच्या 'युक्ती'च्या चार गोष्टी अधिक महत्त्वाच्या होत्या.

अर्थात हुशार अर्जुनाने त्याला आपण सारथी बनवले. लढाईत कृष्णाने फक्त रक्षाचेच सारथ्य केले असे नसून एकूणच युद्धाची सूत्रे हालवली. तो या अर्थाने सेनापतींचाही सेनापती होता. पांडवांना शत्रूसंहाराचे योग्य ते उपाय सुचवणे, शत्रूची मर्मस्थाने हेरणे, गरज असेल तेव्हा मानसिक धीर देणे इ. महत्त्वाची कामे त्याने केली. खरे तर कृष्णाशिवाय महाभारताचे कथानकच पुढे सरकू नये इतका महत्त्वाचा हस्तक्षेप त्याने निर्वाणीच्या प्रसंगी केलेला आहे. सर्वांनाच माहित आहे की अर्जुनाचे गाडे लढाईच्या सुरुवातीलाच अडले. ऐन वेळी त्याला स्वजनांशी युद्ध करणे अधार्मिक आणि अनैतिक असल्याचे वाटू लागले, अशा वेळी कृष्णाने त्यास तत्त्वज्ञानाचा उपदेश करून त्याला जागेवर आणले. कृष्ण नसता तर अर्जुन युद्ध करता ना! अशा प्रकारे कृष्ण हा पांडवाचा 'मित्र, मार्गदर्शक आणि तत्त्वज्ञ' ठरला.

तर अशा या महाभारताच्या अरण्यात शिरण्याचे धाडस सहसा कोणी करत नाही. संपूर्ण महाभारतावर एकच भाष्य लिहिले गेले. ते लिहिले नीलकंठ चुर्थर या विद्वानाने. म्हणून त्याला 'नीलकंठी टीका' असेच म्हणतात. हा नीलकंठ नगर जिल्ह्यातील पुणतांबे या गावाचा. महाराष्ट्र, श्रीकृष्ण आणि महाभारत यांच्यातील नाते हे असे घट्ट आहे.

भारताच्या इतर भागांतील विद्वान कृष्णचरित्रातील गोपिकांच्या अध्यायात अधिक रमलेले दिसतात. बंगाल, ओरिसा आणि गुजरात, राजस्थानचा प्रदेश यासाठी प्रसिद्ध आहे. मथुरा-वृंदावन तर त्याचे केंद्रच होय. तर राधा या स्त्रीचा उल्लेख पुराणग्रंथात वा महाभारतात नाही. तो पहिल्यांदा महाराष्ट्रात निर्माण झालेल्या व सातवाहन राजा हाल याने संग्रहित केलेल्या गाथासप्तशती या महाराष्ट्रीय प्राकृत भाषेतील काव्यसंग्रहात आढळतो. तेथे ती राहिआ किंवा राही या नावाने आली आहे. महाराष्ट्रातून मराठीत प्रवेश करताना राही राधा झाली खरी, पण तिला महाराष्ट्रात फारसे महत्त्व मिळाले नाही. येथे राधाकृष्णापेक्षा रुक्मिणी आणि कृष्ण ही जोडीच लोकांनी आराध्य मानली. कृष्णाच्या विठ्ठल रुपाबरोबर महत्त्व आले ते रुक्मिणीला, राधेला नाही. इतरच मात्र राधेला कृष्णाइतके, प्रसंगी त्याच्याही पेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झाले. 'परकी' या भावाने भक्तिशास्त्रात प्रवेश केला व

आचार्यांचेही पाय घसरू लागले. इतरत्र उपदेशापेक्षा भागवतातील रासपंचाध्यायीला महत्त्व मिळाले. महाराष्ट्राने मात्र पहिल्यापासून गीतेला घट्ट धरून ठेवले आहे. ज्ञानोबा ते विनोबा ही नुसती शाब्दिक कोटी नसून वस्तुस्थिती आहे. कंसाच्या कारगृहात जन्मलेल्या कृष्णाने सांगितलेल्या गीतेवर लोकमान्य टिळकांनी मराठीत भाष्य लिहिले ते मंडाले येथील तुरुंगातच हा एक विलक्षण योगायोग आहे.

टिळकांनी निष्काम कर्मयोगी म्हणून वर्णिलेला कृष्ण गांधीजींनी अनासक्त योगी मानला आणि बरोबरच आहे. आयुष्यभर अविरत कर्म करीत राहिलेल्या कृष्णाला कशाचीच आसक्ती नव्हती, तो कशातच गुंतला नाही. त्याने राज्ये पालथी घातली व उभी केली पण स्वतः राजा होण्याची अभिलाषा बाळगली नाही. गांधीजींना कोठे वाटले आपण भारताचे पंतप्रधान किंवा राष्ट्राध्यक्ष व्हावे म्हणून? तिकडे पाकिस्तानात बॅ. जिना त्यासाठी इतके अडून बसले होते की लॉर्ड माऊंटबॅटनला औट घटकेसाठी औपचारिक गव्हर्नर होऊ देण्यासही ते तयार झाले नाहीत. उलट नेहरूंनी कोणतेही आढेवेढे न घेता त्याला संमती दिली. हा कृष्णाच्या शिकवणीच्या परिणाम असेल काय?

आपणास महाराष्ट्राच्या संदर्भात विचार करायचा आहे. महाराष्ट्राने कृष्णचरित्रातील निसरड्या शृंगारला फार महत्त्व दिले नाही. त्याने प्रौढ परिपक्व तत्त्वज्ञ कृष्ण आपलासा केला आणि त्याचबरोबर बालगोपाळांचा सखा असेलला बाळकृष्णही जवळ केला. तुकोबांच्या अभंगातून पांडुरंगाची नेमकी ही दोन कृष्णरुपे उभी राहतात.

***गीता जेणे उपदेशिली । ते हे माऊली विटेवरी ।***
***पांडुरंग बालमूर्ती । गाईगोपाळ सांगाती ।।***

विठ्ठलाला संतांनी माऊलीच्या रुपात पाहिले. विठ्ठल विठाई झाला. ज्ञानेश्वरीत

***'गीतेचे हे दुभते । वत्स करुनी पार्थाते ।***
***दुभितली जगापुरते । श्रीकृष्णगाय ।।***

असे म्हणणारे ज्ञानेश्वर अभंगात विठ्ठलाला 'विठाई विठाई माझे कृष्णाई कान्हाई' असे लडिवाळपणाने संबोधतात.

कृष्णाच्या बालरुपाचाही मराठी संतांवर आणि वारकरी संप्रदायावर लक्षणीय प्रभाव दिसून येतो. एकदा विठ्ठल हा कृष्ण अशी एकरुपता स्वीकारली आणि तो बालकृष्ण आहे असे म्हटले की वारकरी हे गोपाळ ठरतात. चंद्रभागेचे वाळवंट हे गोकुळातील यमुनेचे वाळवंट बनते आणि त्या वाळवंटात



कृष्ण गवळ्यांच्या पोरांबरोबर शिदोऱ्यांचा काला करून म्हणजे त्या एकत्र करून त्यांच्या समवेत जेवला. त्याप्रमाणे आता येथीही वारकरी असाच काला करणार. या काल्यात गोरसापासून तयार झालेल्या दह्याला विशेष महत्त्व असते. म्हणून तुकोबाच म्हणतात,

***'उपजोनिया पुढती येऊ । काला खाऊ दहीभात ।।***
***वैकुंठी तो ऐसे नाही । कवळ काही काल्याचे ।।***
***तुका म्हणे काला वैकुंठी दुर्लभ ।***
***विशेष तो लाभ संतसंगे ।।***

आषाढी वारीसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून दिंड्या घेऊन दशमींच्या दिवशी पंढरीत दाखल झालेले वारकरी पौर्णिमेपर्यंत भजनानंदात मग्न असतात. वाळवंटात कीर्तने होतात. पौर्णिमेच्या दिवशी या वारीची सांगता होते ती काल्याच्या कीर्तनाने. या कीर्तनाचा विषय असतो श्रीकृष्णाने बालपणी गोकुळात केलेल्या क्रीडा आणि लीला.

***गाईन ते लीलाचरित्र पवाडे ।***
***राखिले सवंगडे सहित गायी ।***
***चोरीले नवनीत बांधिला गळा ।***
***जे तुम्ही गोपाळा छंद केले ।।***

कीर्तनाच्या समाप्तीनंतर मुरमुरे, लाह्या आणि दही एकत्र कालवून त्या काल्याचा प्रसाद वाटला जातो. वारकरी एकमेकांना हे घास भरवतात. त्याचे वर्णन तुकोबांनी असे

केले आहे,

*कंठी धरिला कृष्णमणी । अवघा जनी प्रकाश ।।*
*काला वाटू एकमेक । वैष्णव निका संभ्रम ।।*
*वाकुनिया ब्रह्मादिक । उत्तम लोका दाखवू ।।*
*तुका म्हणे भूमंडळी । आम्ही बळी एक ते ।।*

गोकुळात यमुनेच्या तीरावर गाई राखायला आलेला कृष्ण आपल्या गोपाळांबरोबर खूप खेळ खेळतो आणि दमून भूक लागल्यावर सर्वांच्या शिदोऱ्या एकत्रित करून जेवतो. या घटनेचे वारकऱ्यांनी चंद्रभागेच्या वाळवंटात एक विधीनाट्यच उभे केले. त्याच्या मुळाशी समतेचा विचार आहे. काला हे एक प्रकारचे सहभोजनच आहे. वर्णजाती वयाचा विचार न करता,

*खेळ मांडियेला वाळवंटी घाई ।*
*नाचती वैष्णव भाई रे ।*
*क्रोध अभिमान केला पावटणी ।*
*एकमेंका लागतील पाई रे ।*

असा हा समतेचा मामला आहे.

वारकरी संप्रदायात या विधीनाट्याला इतके महत्त्व आहे की त्यांच्या कोणत्याही उत्सवाची सांगता काल्याच्या कीर्तनानेच होत असते.

काल्याचे कीर्तन होत असतानाच इकडे मंदिरात दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम पार पडत असतो. कृष्णाने दहीहंडी फोडण्याच्या खोडकरपणाच्या प्रकारामागे एक गंभीर विचारही आहे. नंदगोपाच्या गोकुळ नावाच्या खेड्याजवळ, यमुना नदीच्या दुसऱ्या तीरावर मधुरेत कंसाचे वैभव संपन्न नागरी राज्य असते. शहरातील सभ्य, सुसंस्कृत श्रीमंतांनी खेड्यातील भोळ्याभाबड्या शेतकऱ्यांचे शोषण करायचे, त्यांच्या उत्पादनांना कमीत कमी भाव द्यायचा हा प्रकार जुनाच आहे. गोकुळातील गरीब गोपजन पशुधनाची पैदास करीत व त्यांचे दूध, दही, लोणी मथुरेच्या राज्यात निर्माण करीत. मिळेल त्या मोबदल्यात आपल्याच गावात आपल्याच श्रमातून तयार होणाऱ्या या पौष्टिक पदार्थांपासून गावातील मुले वंचित राहात. कृष्णाने या प्रकाराला पायबंद घालायचे ठरविले. पण मुलांचे कोण ऐकणार? तेव्हा त्यावरील नामी उपाय त्याने शोधून काढला. तो म्हणजे घराच्या छतास टांगलेल्या शिंक्यामधील दह्याची मडकी फोडून त्यातील दही हस्तगत करायचे. पण लहान मुलांचे हात छतापर्यंत कसे पोहोचणार? मग हे बालगोपाळ एकमेकांच्या खांद्यावर उभे राहून ही अशक्य गोष्ट शक्य करीत. संत एकनाथ म्हणतात,

*शिंकेचि तोडितो मडकेसी फोडितो ।*
*करी दह्यादुधाचा रबडा ।*
*असा कसा देवाचा देव बाई ठकडा ।।*

काल्यामागचा हा आर्थिक विचार महाराष्ट्रातील तमाशावाल्यांनी पुढे नेला. तमाशाच्या सुरुवातीला गण म्हणजे गणेशवंदन झाल्यानंतर 'गवळण' हा प्रकार सादर होते. मथुरेच्या बाजारात दहीदूध विकायला घेऊन जाणाऱ्या गवळणींना कृष्ण व त्याचे संवगडी अडवतात व मज्जाव करतात, असा हा कथाभाग गवळणीत येतो. कृष्ण गवळ्यांच्या घरातील दह्याची मडकी कशी फोडायचा याचे वर्णन संतांनी मोठ्या कौतुकाने केले आहे. त्यासाठी त्याला एकाच्या खांद्यावर उभे राहणाऱ्या मुलांचे एकूण तीन थर लागायचे. सर्वसाधारण घरांच्या छताची आणि मुलांची उंची ध्यानात घेतली तर हे अगदी वास्तविक वाटते. सर्वात वर उभा असणारा अर्थातच कृष्ण. तोच ते दह्याचे मडके फोडणार.

कृष्णाने गवळणींच्या घरातील मडकी फोडण्याची कथा भारतात सर्वत्र प्रचलित आहे. परंतु इतर ठिकाणी कृष्णभक्तांनी कृष्ण आणि गोपी यांच्या रासनृत्यावर भर दिला. महाराष्ट्रातील अध्यात्मातही महाराष्ट्राची वीरवृत्ती व धाडस डोकावत असल्यामुळे तेथे उंच बांधलेली दहीहंडी फोडण्यास महत्त्व प्राप्त झाले. हा कार्यक्रम वारकऱ्यांच्या काल्यातच कीर्तनापुरता मर्यादित न राहाता तो चौकाचौकातून पसरत गेला. त्याला सार्वजनिक स्पर्धेचे स्वरूप प्राप्त झाले. शम्मी कपूरच्या 'ब्लफ मास्टर' या चित्रपटातील 'गोविंदा आला रे आला' या गाण्याने या खेळाची लोकप्रियता आणखी वाढवली. बघता बघता ती महाराष्ट्राची आयडेंटिटी बनली. दहीहंडी फोडणारी गोविंदाची पथकेच निर्माण झाली. वेगवेगळी मंडळेच नव्हे तर राजकीय पक्ष यात उतरले. नवरात्रातील दांडिया गरब्याप्रमाणे त्यालाही आता व्यावसायिक स्वरूप प्राप्त होत असून त्यातील भक्तांची बैठक हरवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शिवाय थरांची संख्या दहापर्यंत पोहचल्याने सक्त निरागस क्रीडाप्रकारचे रुपांतर धोकादायक जीवघेण्या खेळात होऊ पाहात आहे.

महाराष्ट्रातील सुबुद्ध लोकांनी याचाही विचार करायला हवा. कोठे थांबायचे याचे औचित्य कृष्णास होते तसे आपल्यांसही हवे.




# राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा अन् घोंघावणारे भ्रष्टाचाराचे वादळ

- विजय नाईक, नवी दिल्ली

यमुनेच्या पलिकडे पूर्व दिल्लीतील मयूर विहार एक्स्टेन्शन या उपनगरातील समाचार अपार्टमेन्टस् मध्ये मी गेल्या वीस वर्षापासून राहात आहे. अपार्टमेन्टला लागून दिल्ली मेट्रोचे 'मयूर विहार एक्स्टेन्शन' हे रेल्वे स्टेशन आहे. त्याच्या फलाटावर उभे राहिले, की समोर पसरलेली हिरवी गार शेतं, उजव्या हातास दोन किलोमीटर अंतरावर असलेले जगप्रसिद्ध अक्षरधाम मंदिर, त्यामागे नुकतेच बांधलेले कॉमनवेल्थ गेम्स व्हिलेज, व डाव्या हातास उत्तर प्रदेशातील नोयडा या भागातील वादग्रस्त आंबेडकर उद्यान असा परिसर आहे. त्या पलिकडे शॉपिंग मॉल्स आहेत. याचा अर्थ आमच्या उजव्या हातास अध्यात्मवाद व डावीकडे अधिभौतिकतावाद. आमचं एक विचित्र सँडविच झालंय.

दिल्लीत यंदा पावसानं कहर केल्यानं घरापासून फर्लांगभर पुढे असलेल्या शेतात पाणी शिरलय. त्यामुळे तेथील शेतकरी प्लास्टिकचे तंबू घेऊन फुटपाथावर आलेत. त्यांचे दैनदिन व्यवहार तेथून चाललेत. पाणी ओसरत नाही, तोवर ते रस्त्याच्या कडेलाच राहाणार. शिवाय, राष्ट्रकुल स्पर्धा अवघ्या महिन्यावर आल्यानं घिसाडघाई करून रस्ते बांधण्याचे काम हाती घेण्यात आल्याने, ते शहरभर अनेक ठिकाणी खचले आहेत. पावसामुळे डांबर टिकले नाही. रस्त्यांना मोठमोठे खड्डे, त्यात साचलेले पाणी, त्यात झालेली डासांची पैदास, त्यामुळे डेंग्यूची झपाट्यानं पसरलेली साथ, याचा अनुभव दिल्लीकर घेत आहेत. ''या स्पर्धांच्या निमित्ताने दिल्लीला जागतिक दर्जाचे शहर बनविणार.'' अशी वारंवार शेखी मिरविणाऱ्या मुख्यमंत्री शीला दीक्षित यांची पाचावर धारण बसली आहे. त्या पर्जन्यदेवतेला प्रार्थना करीत आहेत,

की किमान स्पर्धा होईपर्यंत तरी दिल्लीवर बरसू नको. स्पर्धाची स्थळे दिल्लीसह अन्य राज्यातील प्रमुख संकुलात घेण्याचे ठरले असते, तर त्या त्या राज्यांना जागतिक स्वरूपाचा व आपपले बांधकाम कौशल्य दाखविण्याचा अनुभन आला असता. परंतु त्या दिल्लीतच घेण्याचा अट्टाहास केंद्राने व नेत्यांनी का केला, याचे उत्तर एकच असावे. या निमित्ताने होणाऱ्या कोट्यावधी रूपयांच्या खर्चात कंत्राटदार, इंजिनियर्स, नोकरशहा व राजकीय नेत्यांना खिसे गरम करून घेता येतील, अशा हिशेब त्यांनी केला असावा. आणि झाले आहे तेच. शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, तेव्हा कर्जमुक्तीसाठी केंद्राने सत्तर हजार कोटी रूपयांचे अनुदान जाहीर केले. पण इथे तर केवळ तेरा दिवसांच्या खेळांसाठी ३५ हजार कोटी रूपयांचा चुराडा करण्यात येत आहे. हा आकडा दुप्पट होणार, असा अंदाज वर्तविला जातो. शिवाय जे भ्रष्टाचार करीत आहेत व ज्यांनी तो केलाय, त्यांच्यावर स्पर्धा झाल्यानंतर कारवाई करण्याचं पोकळ आश्वासन सरकारनं दिलय. सरकारच्या कोणत्याही आश्वासनावर जनतेचा विश्वास उरलेला नाही. भ्रष्टाचाराचा ठपका केवळ ऑलिंपिक समितीचे अध्यक्ष सुरेश कलमाडी यांच्यावर ठेवता येणार नाही. त्यास त्यांच्या इतकेच किंबहुना, त्यांच्यापेक्षा अधिक जबाबदार आहेत, ते शीला दीक्षित, क्रीडा मंत्री एम.एस.गिल व नगरविकास मंत्री जयपाल रेड्डी. कलमाडी यांच्यावर हल्ला होताना, हे सारे सोयीस्कररित्या मूग गिळून गप्प बसले होते. गिल यांनी तर संसदेत अगोचर पणे सांगितले, ''भ्रष्टाचार काय झाला आहे, हे जाणून घ्यायचे असेल, तर माहिती अधिकाराखाली अर्ज करा. त्याचे उत्तर देऊ.'' इतके निलाजरे उत्तर अद्याप कोणत्याही केंद्रीय मंत्र्याकडून संसद पटलावर ऐकावयास मिळालेले नाही. ते म्हणाले,'' लग्न जवळ आलय, ते पार पाडायचय. पण सारं काही भगवान भरोसे आहे,'' त्यांची टिप्पणी सद्यस्थिती दर्शक आहे. प्रत्येकाच्या मनात शंका आहे, ती ३ ते १३ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या स्पर्धांचे तीन तेरा तर वाजणार नाही?



दिल्लीचे नाक म्हणजे ड्यूक ऑफ कॅनॉटने बांधलेली कॅनॉट प्लेस ही वर्तुळाकार बाजारपेठ. तिचे नूतनीकरण करण्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. राजधानी वाहतुकीचे बारा वाजलेत. कॅनॉट प्लेसला असं काही खणून ठेवलय, की काही दिवसांपूर्वी तेथे बाँबवर्षाव झालेला असावा, असे तेथे जाणाऱ्यास भास व्हावा. कोणत्यावेळी कुणाचा पाय व वाहनाचे चाक कोणत्या खड्ड्यात जाईल, कोण कुठल्या मॅन होलमध्ये पडेल, याची काही शाश्वती नाही. गेल्या दोन चार महिन्यात इतस्तः परसलेल्या व लटकलेल्या विजेच्या तारांमुळे काही मृत्यू ओढवले. वाहनांचे अपरिमित नुकसान झाले. काल (२८ ऑगस्ट रोजी) संसदेपासून अवघ्या पाच मिनिटांच्या अंतरावर असलेल्या शास्त्री भवनानजिक दिल्ली परिवहन मंडळाच्या बसची चाके खचलेल्या जमिनीत अडकली. त्यामुळे प्रवासाचे बारा वाजले, ते वेगळे. यंदा झालेल्या विक्रमी पावसाने तर अनेक रस्त्यांचे रूपांतर नद्यात झाले. वाहने अडकली. ज्या प्रवासाला अर्धा तास लागतो, त्यास तीन ते चार तास लागले. यामुळे दिल्लीकर जेरीस आलाय. काही महिन्यापूर्वी दिल्लीच्या अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्‌घाटन झाले, तेव्हा अभिमान वाटावा, अशी ती घटना होती. त्याचे काम तीन वर्षात पूर्ण झाले. तसेच, इ. श्रीधरन यांच्या नेतृत्वाखाली सुमारे दीडशे कि.मी.रेलमार्ग असलेली दिल्ली मेट्रो ही दिल्लीची शान आहे. जगभरातून तिला पाहाण्यासाठी राष्ट्रप्रमुख येत आहेत. याचा अर्थ खाजगी कंपनीकडे अथवा एसपीएल कंपनीकडे (स्पेशल परपजेस व्हेहिकल) काम दिल्यास ते वेळत व दर्जेदार होते. परंतु स्पर्धांसाठी उभारण्यात येणाऱ्या संकुलांचे व शहर दुरूस्तीचे काम सरकारी संस्थांनी हाती घेतल्यावर काय होते, याची दिल्ली हे ताजे उदाहरण होय.

वीस वर्षांपासून दिल्लीतील तीस चाळीस सरकारी संस्थांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी त्यांना एका अधिकरणाखाली आणण्याची मागणी होत आहे. त्यावर चर्वितचर्वण होऊन एकही पाऊल पुढे पडले नाही. त्यामुळे, रस्ते बांधणाऱ्या संस्थेने ते बांधायचे, ते तयार झाले, की

महानगर टेलिफोन निगम अथवा दिल्ली जल प्राधिकरणाने ते फोडायचे, नंतर ते त्याच अवस्थेत ठेऊन द्यायचे, असे वर्षानुवर्ष चालले आहे. रस्ते बांधण्याचे काम कंत्राटदारांना येथे बरोबर पावसाळ्यापूर्वी काही दिवस आधी दिले जाते. मग ते बांधायला सुरवात होते. डांबर, खडी टाकली जाते, रोलर फिरतात. त्यावर मुसळधार पाऊस पडत असतो. काही दिवसातच रस्ते उखडतात. ते माती व गवताने बुजविले जातात. ते वारंवार खराब होतात. व कंत्राटदाराला वारंवार काम व पैसे मिळतात. पैसे खाण्याची संधी दिली जाते. काम अत्यंत निकृष्ट प्रतिचे असते. ब्रॉडबँडच्या वायर्स व अन्य नळप्रकल्प हाती घेण्यासाठी वापरात आणलेल्या 'ट्रेंचलेस टेक्नॉलॉजी' ला आता दोष देण्यात येतोय. यंत्राच्या साह्याने ड्रिलिंग करून वायर्स टाकण्यात येतात. त्या टाकल्यावर तेथे नीटसा भराव घातला जात नाही. खोदकाम चालू असताना काही नळांना भेगा पडल्याने तेथून होणाऱ्या पाण्याच्या गळतीने रस्ते कमकुवत होऊन खचल्याचे निदान काढण्यात येत आहे. हेच तंत्रज्ञान परदेशात वापरले जाते, तेथे अशा प्रकारच्या तक्रारी येत नाहीत. कारण युरोप, अमेरिका, दक्षिण पूर्व आशियातील अनेक देशांत सार्वजनिक काम करताना गुणवत्तेची जाणीव ठेवली जाते. कामात कुचराई झाली, तर कठोर शासन केले जाते. आपल्या देशात सरकार दरबारी ही जाणीव पार नाहीशी झाली आहे. म्हणूनच राष्ट्र कुलस्पर्धेतील भ्रष्टाचारामुळे त्याला 'कॉनवेल्थ गेम्स,' 'कॉमन करप्शन गेम्स,' 'कॉमनवेल्थ लूट गेम्स,' 'कॉमनवेल्थ शेम' अशी अनेक नावे देण्यात आलीत.

गेल्या महिन्यात माजी गृह सचिव, केंद्रीय सतर्कता आयोगाचे माजी आयुक्त व कॉम्पट्रोलर अँड ऑडिटर जनरल ऑफ इंडिया सी. जी. सोमैय्या यांचे 'द ऑनेस्ट ऑल्वेज स्टँड अलोन' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. १९८२ मध्ये झालेल्या एशियन गेम्सच्या वेळी ते अर्थमंत्रालयात खर्च विभागाचे अतिरिक्त सचिव होते. या स्पर्धांसाठी पाचशे कोटी रू.ची मान्यता देण्याचे अधिकार त्यांना होते. त्याअंतर्गत नवी संकुले उभारणे, काहींचे नूतनीकरण करणे, परदेशी खेळाडूंसाठी गेम्स व्हिलेज बांधणे, वाहतूक सुधारण्यासाठी सात उड्डाणपूल बांधणे आदींसाठी ही तरतूद होती. सोमैय्या म्हणतात,'' हे सर्वात स्वच्छ व्यवहार होते, व सारे काही वेळात झाले. दहा दिवस स्पर्धा चालल्या, पण एकही छोटे देखील विघ्न आले नाही. याचे श्रेय भारताचे माजी डिकॅथेलॉन (दहा वेगवेगळ्या स्पर्धा)पटू कोदंड मुथैय्या यांना द्यावे लागेल. त्यांनी केलेल्या तांत्रिक मार्गदर्शनाला तोड नव्हती. स्पर्धेच्या जाहिरातींचे अधिकार देण्यासाठी आंतरराष्ट्रीय निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यापैकी अमेरिकेतील व एक दुबईमधील कंपनी होती. त्यांची छाननी व निवड करण्यासाठी एशियन गेम्सच्या अध्यक्षाच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करण्यात आली. त्यात सोमैय्या होते. अखेर त्याचे कंत्राट दुबईतील कंपनीला २.५ दशलक्ष डॉलर्सला देण्यात आले. तीच संकुले दिल्लीत होती. म्हणजे मूळ ढाचा होता. त्याचे केवळ नूतनीकरण करण्यावर पाण्यासारखा पैसा खर्च झाला, तरीही त्यांची छपरे गळत आहेत. म्हणजे पैसा खाल्ला कुणी? निकृष्ट माल वापरला कुणी?

क्वीन्स बॅटन रिलेच्या संदर्भात लंडनच्या एएम फिल्मला देण्यात आलेल्या कंत्राटातील लाखो पौंडाचा भ्रष्टाचार, जिच्या अस्तित्वाबाबतच शंका आहे, अशा जुबिली स्पोर्ट्स टेक्नॉलॉजी प्रा. लि. या कंपनीला देण्यात आलेली संशयास्पद कंत्राटे, दिल्ली विकास प्राधिकरण (डीडीए), केंद्रीय सार्वजनिक बांधकाम खाते (सीपीडब्ल्युडी) व सार्वजनिक बांधकाम खाते (पीडब्ल्युडी) आदी चाळीस खात्यांनी बांधकामात केलेली ढिलाई, हे सारे अक्षम्य गुन्हे आहेत. आयोजन समितीतील टी.एस. दरबारी व अन्य अधिकाऱ्यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे त्यांचे गैरव्यवहार संपुष्टात येत नाही. तसेच, त्यामुळे सुरेश कलमाडी यांची जबाबदारी कमी होत नाही.

सर्वाधिक खटकणारी बाब म्हणजे, भ्रष्टाचाराचा वाद गळ्यापर्यंत येईस्तोवर पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग व कॉंग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांनी पाळलेले मौन. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात रोज यावर रणकंदन होत होते, वृत्तपत्रे व दृकश्राव्य वाहिन्यावर रात्रंदिवस चर्चा सुरू होती. भ्रष्टाचाराचे तपशील प्रसिद्ध होत होते. तरीही हे दोघे शांत, स्थितप्रज्ञ होते. वस्तुतः भ्रष्टाचाराचे तपशील जाहीर होताच, आयोजन समिती, दिल्ली सरकार, नगर विकास मंत्री व मुख्यमंत्री यांना बोलावून पंतप्रधानांनी स्पष्ट शब्दात तंबी दिली असती, तर जनतेचे कोट्यावधी रूपये पाण्यात गेले नसते. स्पर्धांना केवळ दीड महिना उरला, तेव्हा त्यांना बैठकीची निकड भासली व संकुलांची पाहाणी करण्यासाठी २९ ऑगस्ट हा दिवस उजाडला. या संकुलांभोवती व आत काय परिस्थिती आहे, याच्या असंख्य बातम्या छायाचित्रांसह रोज छापल्या जात आहेत. अजूनही इंदिरा गांधी इन्डोअर संकुल, जवाहरलाल नेहरू

संकुल येथे पाणी गळण्याचे थांबलेले नाही. ''काही ठिकाणी जमीन खचली आहे,'' असे खुद्द क्रीडा राज्यमंत्री प्रतिक पाटील यांनी मला अलीकडे सांगितले. त्यांनी तेथील तंत्रज्ञांना आवश्यक त्या सूचनाही दिल्या, परंतु प्रत्यक्षात सुधारणा झाली नाही. एखाद्या कपड्याला भोकं पडावी व वेळ मारून नेण्यासाठी तेथे ठिगळकाम करावे, असे चालले आहे. या स्पर्धांत भाग घेणाऱ्या भारतीय खेळाडूंचा सराव केला जातोय, तो देशातील अन्य संकुलातून. म्हणजे त्यांना या नव्या संकुलांचा सरावच नाही. या स्थितीत त्यांच्याकडून काय अपेक्षा करावयाची? त्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देशाचा मान राखावा लागणार आहे.

योगायोग म्हणजे, भ्रष्ट व्यवहारांचे अनेक तपशील जाहीर होत असताना, चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या भ्रष्टाचार विरोधी व नियंत्रक समितीचे शिष्टमंडळ दिल्लीत आले होते. त्यांनी चीनच्या येथील दूतावासात पत्रकार परिषद घेतली व त्यात पक्षातील भ्रष्ट अधिकाऱ्यांना देण्यात येत असलेल्या शिक्षेबाबत माहिती दिली. ते म्हणाले, ''बीजिंगमध्ये झालेल्या ऑलिंपिक स्पर्धांपूर्वी अनेक क्रीडा संकुलांच्या उभारणीचे काम हाती घेण्यात आले, तेव्हा बांधकामात कोणताही भ्रष्टाचार व विलंब होऊ नये, तसेच संकुलांची गुणवत्ता जागतिक दर्जाची असावी, हे पाहाण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली होती. रोजच्या बांधकामाची देखरेख या समितीतर्फे अत्यंत काटेकोरपणे केली जात होती. कोणताही भ्रष्टाचार झाला नाही,'' असा दावा त्यांनी केला. परंतु, भ्रष्टाचार झाला असावा, असे क्षणभर गृहित धरले, तरी बीजिंगमधील ऑलिंपिकने जगाच्या डोळ्यांचे पारणे फेडले. उत्कृष्ट आयोजन, व नेत्रदीपक खेळ यासाठी ते गाजले. तसेच, या ऑलिंपिकने चीनला एका वेगळ्या आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन ठेवले. 'दिल्लीतील स्पर्धांसाठी आपली काय शिफारस आहे,' असे विचारता, शिष्टमंडळाचे नेते लिऊ मिंगबो यांनी पृच्छा केली, ''दैनंदिन बांधकामावर देखरेख ठेवणारी समिती आहे काय?'' अर्थातच तशी कोणतीही समिती नेमण्यात आलेली नव्हती. २००३ मध्ये या स्पर्धा दिल्लीत आयोजित करण्याचा निर्णय होऊनही तब्बल पाच वर्षे २००८ पर्यंत क्रीडा संकुलांच्या नूतनीकरणाचे अथवा नवी संकुले बांधण्याचे कोणतेही काम हाती घेण्यात आले नाही.



परंतु कलमाडी, शीला दीक्षित, जयपाल रेड्डी व गिल ही चौकडी ''सारे काही स्पर्धेपूर्वी बांधून पूर्ण होईल,'' अशी विधाने वारंवार करीत आहेत. ते सारे आता गोत्यात आलेत. आजपर्यंत चार वेळा डेड लाईन्स पुढे ढकलण्यात आल्यात. ''स्पर्धांच्या निमित्ताने दिल्लीला जागतिक दर्जाचे शहर बनविले जाणार,'' ही शीला दीक्षित यांनी केलेली घोषणा बऱ्याच प्रमाणात कागदावर राहाणार आहे. मारून मुटकून अखेर स्पर्धा होणार व त्या यशस्वी झाल्याचेही घोषित केले जाईल. गेले सुमारे वीस एक वर्षे कलमाडी हे क्रीडा क्षेत्रातील 'झार' समजले जातात. मोठमोठ्या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा अनुभव असल्याने त्याच्या जोरावर त्यांनी अनेक नेत्यांना आपल्या प्रभावळीत गुंडाळल्याने राष्ट्रकुल क्रीडास्पर्धांबाबत गंभीर आरोप होऊनही ते गेले काही महिने अगदी बिनधास्त वाटचाल करीत आहेत.

''पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग अथवा काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांनी समितीचे अध्यक्षपद सोडण्यास सांगितले, तरच आपण राजीनामा देऊ,'' असे त्यांनी म्हटले आहे. तथापि, क्रीडामंत्री गिल यांच्यानुसार 'वरातीचे घोडे' मध्येच बदलता येत नाही. स्पर्धा होईपर्यंत ते राहातील. त्यानंतर ऑलिंपिक समितीचे नेतृत्व त्यांच्या हाती राहाण्याची शक्यता दिसत नाही. पंतप्रधानांनी केंद्रीय मंत्रिमंडळ सचिवाच्या नेतृत्वाखाली ऐनवेळी स्थापन केलेली समिती अखेरच्या दिवसात काही चमत्कार घडविल, अशी शक्यता उरलेली नाही. दरम्यान, ममता बॅनर्जी, विलासराव देशमुख व अन्य सार्वजनिक कंपन्यांनी यापूर्वी जाहीर केलेल्या देणग्याबाबत पाय काढता घेतलाय. त्यांना राजकीय रंग चढलाय. दिल्ली महानगरपालिकेत भाजपचे वर्चस्व असले, तरी दिल्ली सरकार व केंद्र सरकार ही दोन्ही काँग्रेसची असल्याने त्यांचेच नाक कापले जाण्याची वेळ आली आहे.

या प्रचंड वादंगांमुळे व स्पर्धांदरम्यान दिल्लीवर येणाऱ्या अनेक बंधनांमुळे दिल्लीकर या तेरा दिवसात बाहेर जाण्याचा विचार करीत आहेत. कारण या दिवसात शाळा, कॉलेजेसना सुटी असेल. अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद असतील. दहशवादी हल्ला होऊ नये, म्हणून जागोजागी पोलिसांचा ससेमिरा असेल. खाजगी उद्योगांनाही आपली कार्यालये बंद करण्याचे आदेश दिले जाण्याची शक्यता आहे. खेळाडूंची वाहतुक सुरळीत व्हावी, म्हणून खास बसेसची योजना असेल. त्या वाहनांसाठी रस्त्यांचा काही भाग राखून ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे अन्य वाहतुकीची गोची होणार, ती वेगळी. या दिवसात दिल्लीत लाखो देशी व परदेशी पर्यटक येणार हा अंदाज चुकणार आहे. त्यांच्यासाठी ज्यांना 'पेईंग गेस्ट'च्या खोल्या तयार करण्यास सांगितले, त्यांना धंदा चालणार नाही, याची धास्ती पडलीय. पर्यटक कंपन्यांनी वेळ साधून याचदिवसात 'दिल्ली बाहेर जा, अमेरिका, युरोप, दुबई, सिंगापूरला चला,' अशा ठळक जाहिराती दिल्यात. त्यांना चांगला प्रतिसाद मिळतोय. याकडे पाहाता, ज्यांना दिल्लीबाहेर जाणे शक्य नाही, असे येथे राहातील. स्पर्धांसाठी तिकिटांचा घोळ अद्याप चालू आहेच. ती मिळेनाशी झालीत. यंदा त्यांचे फारसे ब्लॅक मेलिंग होणार नाही, हीच काय समाधानकारक बाब. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीचे माईक फेनेल यांनी अलीकडे संकुलांची पाहाणी केली व त्याबाबत समाधान व्यक्त केले. पण त्यांनाही अनेक 'जर-तर' विषयक शंका आहेतच.

चाळीस कोटी रुपये खर्चून 'ओपनिंग सेरेमनी'च्या वेळी एअरोस्टॅट हे प्रचंड बलून जवाहरलाल संकुलावर तरंगणार असून त्यांच्या असंख्य आरशातून रंगीबेरंगी रंगाची उधळण संकुलातील कार्यक्रमावर होणार आहे. पण ऐनवेळी वरूणराजाने अथवा पर्जन्याने हजेरी दिली, तर तेही पैसे वाया जातील, अशी भीती व्यक्त होत आहे. प्रसिद्ध संगीतकार ए.आर.रहमान यांचे 'खेलो, जियो, हे ओ' यांचे गीत गुंजेल. त्याचा प्रिमियर शो गुडगाव येथे २८ ऑगस्ट रोजी थाटामाटात झाला. पण, भारत नेमकी किती पारितोषिके मिळवतोय, हे प्रश्न चिन्ह कायम आहे. या स्पर्धांवर भारताची जागतिक प्रतिमा अवलंबून आहे. त्यांची प्रगती पाहाण्यासाठी व पदके जिंकण्यासाठी हजारो खेळाडू राष्ट्रकुल देशातून आलेले असतील. लंडनमधील राष्ट्रकुल संघटनेचे सरचिटणीस कमलेश शर्मा यांची गेल्या महिन्यात दिल्लीत भेट झाली. ''स्पर्धा यशस्वीपणे पार पडतील,'' अशी आशा त्यांनी व्यक्त केली. तथापि, ते म्हणाले, ''बांधकामात झालेल्या भ्रष्टाचाराच्या बातम्या व लेख जगातील अनेक देशातील वर्तमानपत्रातून ठळकपणे छापून आल्याने भारताच्या प्रतिमेला जोरदार तडा गेलाय.'' म्हणूनच, स्पर्धांचा पुरताच बोजवारा होऊ नये, यासाठी जबाबदार असलेल्या सर्वांनाच कंबर कसावी लागेल व प्रतिमेला सावरावे लागेल. काय होणार, ते लौकरच देशापुढे येईल.

# स्वायत्त काश्मीर (?) काही समस्या



- डॉ. श्रीकांत परांजपे
विभागप्रमुख, संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे

काश्मीर खोऱ्यातील संघर्षाचे स्वरुप आज बदलले आहे. एके काळी काश्मीरचे विलिनीकरण पाकिस्तानमध्ये व्हावे ह्यासाठी जनमत घेणाचा आग्रह धरला जात होता. पुढे त्याला वांशिक राष्ट्रवादाच्या आधारे मागण्यात येणाऱ्या राजकीय स्वयंनिर्णयाच्या हक्काची चौकट दिली गेली आणि काश्मीरचे स्वातंत्र्य ही मागणी पुढे आली. त्यात काश्मीरमध्ये मानवी हक्कांचे उल्लंघन होत आहे हे सूर जोर धरत होते. काश्मीर मधील आंदोलनाचे प्रकार देखील बदलले. आज काश्मीर खोऱ्यात ज्या प्रकारे दगडफेक केली जाते आणि अनेक मार्गाने सर्वसामान्य जनजीवन विस्कळीत केले जाते त्याची तुलना काही जण पॅलेस्टाईनमधील 'इंतिफदा' लढ्याशी करतात. हा एक प्रदीर्घ लढा असतो, त्याचे स्वरुप कमी तीव्रतेच्या लढ्याचे असते आणि सर्वसाधारण जनजीवन सातत्याने विस्कळीत करुन सरकारला वेठीस धरण्याचे असते. त्यात नागरिकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो. आपल्यावर सतत अत्याचार कसे केले जातात ही भावना जागृत ठेवली जाते आणि त्या लढ्यात मीडियाचा अत्यंत चोख वापर केला जातो. मानवी हक्कांचे उल्लंघन हा त्याचा मुख्य रोख असतो आणि यातून जागतिक पातळीवर सहानुभूती मिळविण्याचे प्रयत्न केले जातात. काश्मीरमधील सक्रीय दहशतवादी गटांनी ही नवीन राजनिती वापरुन इतर मवाळ गटांना त्यात समाविष्ट केले आहे. आज काश्मीरमधील राजकीय प्रश्नांना ह्या लढ्यांबाबत कोणतीही भूमिका घेणे अडचणीचे झाले आहे. पाठिंबा देणे म्हणजे आपले अपयश मान्य करणे, विरोध करणे म्हणजे जनमताच्या विरोधात जाणे होते.

आजच्या काश्मीरच्या उद्रेकाची भौगोलिक व्याप्ती बघितली तर ती मुख्यतः काश्मीर खोऱ्यापुरती मर्यादित आहे. श्रीनगर हे त्याचे केंद्र मानता येईल. जम्मु किंवा लडाखचा भाग ह्या उद्रेकाचा तसा भाग नाही.



ह्या काश्मीर खोऱ्यात राजकीयदृष्ट्या जे घटक महत्त्वाचे मानता येतील ते प्रामुख्याने तीन घटक आहेत. राष्ट्रीय पातळीवर आणि सरकारी पातळीवर असलेला काँग्रेस पक्ष, राज्यपातळीवर काश्मीर मधील दोन महत्त्वाचे राजकीय पक्ष, नॅशनल कॉन्फरन्स व पीडीपी आणि तिसरा घटक म्हणजे वेगवेगळे इस्लामिक गट ज्यात मवाळ आणि जहाल यांचा समावेश करता येईल. काश्मीर खोऱ्याच्या राजकारणात हे तीन घटक खऱ्या अर्थाने निर्णायक भूमिका घेऊ शकतात. अर्थात प्रत्येक घटकांच्या काही मर्यादा आहेत.

काँग्रेस पक्ष हा राष्ट्रीय पक्ष असल्याने त्याला प्रादेशिक राजकारण केंद्रित भूमिका मांडता येत नाही. त्यामुळे काश्मीरी मागण्यांना कितपत प्रतिसाद द्यायचा त्यावर मर्यादा येऊ शकतात. तसेच काश्मीर खोऱ्याच्या प्रश्नांबाबत इतर विरोधी पक्ष आपली भूमिका आग्रहाने मांडतील हे ही गृहित धरावे लागते.



काश्मीर मधील प्रादेशिक पातळीवरील दोन्ही मोठ्या राजकीय पक्षांची जनमानसातील विश्वासार्हता कितपत आहे हा वादाचा प्रश्न आहे. दोन्ही राजकीय पक्षांनी आपआपल्या कारकीर्दीत काश्मीरच्या जनतेसाठी काही ठोस पाऊले उचललेली दिसत नाही.

काश्मीरच्या नागरी समाजात ह्या राजकीय पक्षांच्याबाबत फार आशा आहेत असे वाटत नाही. काश्मीर समस्या सोडविण्यासाठी ह्या दोन्ही पक्षांनी स्वायत्ततेची मागणी केली आहे. ही स्वायत्तता संविधानाच्या ३७० कलमानुसार असावी हे मानले जाते. ह्या पक्षांना 'आझादी' बाबत कोणतीही भूमिका घेणे अडचणीचे आहे कारण तो देशद्रोह होतो. म्हणूनच मूळचे ३७० कलम त्यांना हवे आहे.

'आझादी'ची मागणी ही केवळ इस्लामिक गट करतात. ह्या 'आझादी' च्या भूराजकीय सीमा कोणत्या असतील? त्या बाबत जरी स्पष्टपणे काही मांडले गेले नसले तरी असा अंदाज बांधता येतो की ही आझादी खऱ्या अर्थाने काश्मीर खोऱ्यापुरती मर्यादित असेल. इथे लडाख किंवा जम्मूचा समावेश होणे कठीण आहे तसेच ती आझादी पाकव्याप्त काश्मीरबाबत असणे तितकेच कठीण आहे. तशा अर्थी ह्या लढ्याच्या खऱ्या मर्यादा ह्या काश्मीर खोऱ्याच्या प्रदेशात आहेत.

काश्मीरच्या आझादीची मागणी करताना काही आर्थिक निकष समोर आहेत का असा प्रश्न पुढे येणे स्वाभाविक आहे. काश्मीरची अर्थव्यवस्था ही नैसर्गिक साधन संपत्ती आणि पर्यटनावर अवलंबून आहे. स्वतंत्र राज्याची अर्थव्यवस्था एवढ्यावर

टिकवता येणे कठीण आहे हे राजकीय पक्ष जाणून आहेत. म्हणूनच त्यांनी स्वायत्ततेची मागणी पुढे केली. अशा मागणीत दुहेरी फायदा असतो. केंद्रसरकारची आर्थिक मदत चालू राहते त्याच बरोबर सर्वसामान्य जनतेला आपण काही तरी मिळविल्याची भावना येते. इस्लामिक गटांना मात्र आपल्या आझादीला पाकिस्तानकडून पाठिंबा मिळण्याची आशा आहे. इथे पाकिस्तानच्या मर्यादा जाणून घेण्याची गरज आहे. पाकव्याप्त काश्मीरमधील अत्यंत निकट परिस्थिती जगजाहीर आहे. किंबहुना भारत-पाकिस्तान दरम्यान काश्मीर मधील व्यापारी मार्ग खुले करण्याबाबत खरा विरोध पाकिस्तान सरकारचा आहे. तसा व्यापार खुला झाला आणि लोकांचे येणे जाणे सुरु झाले की भारतातील काश्मीरी जनतेला पाकव्याप्त काश्मीरमधील खरी परिस्थिती समजेल ही भीति आहे.



काश्मीरच्या स्वायत्ततेचा विचार हा केवळ त्या खोऱ्या पुरता मर्यादित असू शकत नाही, त्याचबरोबरीने जम्मू व लडाखचा देखील विचार करावा लागेल. एक विचार प्रवाह असा आहे की जम्मू व लडाखला केंद्रशासित प्रदेश करून काश्मीर खोऱ्याचा स्वतंत्रपणे विचार केला जावा. अशा विचाराला, काश्मीरचे विभाजन केले जात आहे, अशा स्वरुपाची टीका होऊ शकते. परंतु काश्मीर खोऱ्याला कोणत्याही स्वरुपाची राजकीय 'सवलत' देताना ह्या प्रकारची किंमत मोजावी लागण्याची शक्यता आहे हे काश्मिरी विरोधक कदाचित मान्य करतील.

अशा प्रकारच्या विभाजित क्षेत्राला स्वायत्तता मिळणे म्हणजेच मूळचे ३७० कलम लागू करणे ह्याला काश्मीर प्रादेशिक पक्ष निश्चितच पाठिंबा देतील. त्यात त्यांचा दुहेरी फायदा आहे, त्यांना केंद्र सरकारचा आधार राहील व त्याचबरोबर काश्मीरी जनतेच्या अस्मितांची आपण राखण करीत असल्याचे दाखविता येईल. त्याचबरोबर काश्मीर भारतापासून विकसित होत नाही. तर त्याला एका वेगळ्या पातळीवर समजून केले जात आहे हे राष्ट्रीय पक्षांना दाखविता येईल.



मात्र ह्या पर्यायाबाबतचे पुढचे प्रश्न भारताच्या सुरक्षा व्यवस्थेचे असणार आहेत. अशा स्वायत्त प्रदेशाचा पाकिस्तान किंवा आता चीनकडून वापर केला जाऊ शकतो. पाकव्याप्त

काश्मीरमध्ये चीनचा वाढता प्रभाव आणि तेथील अस्थिर परिस्थितीचा दहशतवादी गटांनी घेतलेला फायदा भारताच्या हिताचा असणार नाही. ह्या प्रांतातील भारतीय लष्करासमोर वेगळ्या प्रकारची आव्हाने येण्याची शक्यता आहे.



काश्मीरच्या आजच्या उद्रेकाला सामोरे जाण्याचा मार्ग शोधताना कदाचित आपल्याला पारंपारिक विचारांच्या पलिकडे जाण्याची गरज आहे. त्यात ३७० कलमासारखे रचनात्मक पर्याय आणि पारंपारिक राजकीय पर्याय यांच्या पलीकडे जाता येईल का ह्याचा शोध घ्यावा लागेल.

आजच्या समस्येचे नेतृत्व करणारे दहशतवादी किंवा इतर इस्लामिक गट, तसेच राजकीय पक्षातील नेतृत्व त्यांच्या पलीकडे असलेला नागरी समाज (आज त्याचा व्यवस्थित वापर केला जातो) यावर लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे. त्या समाजाचे हित हे आंदोलनाच्या राजकारणात नसून विकासाच्या राजकारणात आहे. त्यासाठी स्थानिक-ग्राम पातळीपासून नव्याने नेतृत्व निर्माण करण्याची गरज आहे. त्या प्रक्रियेचा एक भाग हा स्थानिक प्रातिनिधीक व्यवस्था निर्माण करणे व त्यांना आर्थिक बल देणे हा आहे. त्याचबरोबर सामाजिक नेतृत्व निर्माण करणे तितकेच गरजेचे आहे. आज सामाजिक नेतृत्व म्हटले की आपण पुन्हा वेगळ्या चौकटीत अडकतो. ती चौकट स्वयंसेवी संस्थांची आहे. त्या सर्वच संस्था खऱ्या अर्थाने योग्य कार्य करतात असे मानता येणार नाही.

आज काश्मीर संदर्भात विचार करताना जुन्या नेतृत्वाचे अपयश किंवा साचेबंद पद्धतीत विचार करण्याच्या मर्यादा आणि नवीन नेतृत्वाचा अभाव समोर येतो. त्यातच दहशतवादी गटांना आपल्या विचारसरणीची मांडणी करण्यासाठी जागा मिळते.



काश्मीरमधील ही सत्तेची पोकळी भरुन काढण्यासाठी खऱ्या अर्थाने स्थानिक पातळीवर प्रतिनिधीत्व निर्माण करुन तेथील स्थानिक जनतेचे सबलीकरण करण्याची गरज आहे. कारण ह्या संघर्षात खरा तोटा होतो तो ह्या जनतेचा. यासाठी केंद्रसरकारला स्वतंत्रपणे राजकीय इच्छाशक्ती दाखववावी लागेल. हा लढा प्रदीर्घ असेल कारण तो काश्मीरी जनतेच्या मानसिकतेचा आणि अस्मितेचा प्रश्न असणार आहे.



# शेतकरी चळवळ : वाटचाल आणि आव्हाने

- प्रा. द. ना. धनागरे
माजी कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

ऑगस्ट २०१० महिन्याच्या याच 'राष्ट्रवादी' नियतकालिकात शेतकरी संघटनेचे संस्थापक नेते शरद जोशी यांचा एक छोटेखानी लेख आहे. देशात अन्नधान्य आणि एकूणच शेतमालाच्या उत्पादनात गेल्या सात-आठ वर्षात लक्षणीय वाढ झाली आहे याची नोंद घेत सध्याच्या परिस्थितीत केंद्रशासनाने गहू, तांदुळ यासारख्या अन्नधान्यांच्या विक्रमी आधारभूत किंमती ठरवून दिल्याबद्दल त्यांनी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांचे त्या लेखात खुल्या दिलाने कौतुक केले आहे. केंद्राच्या निर्णयामुळे सर्वसामान्य शेतकऱ्याला जो दिलासा मिळाला आहे त्याचे सर्व श्रेय शरद जोशी यांनी शरद पवारांनाच दिले आहे.

एका देशव्यापी संघटनेचा आणि चळवळीचा प्रवास कसा नागमोडी वळणे घेत होत असतो याचे हा कौतुक सोहळा एक उत्तम उदाहरण आहे. कारण १९७८ ते १९८४-८५ या शेतकरी आंदोलनांनी गजबजलेल्या काळात शरद जोशी यांच्या वक्तृत्वाने आणि काळजाला भिडणाऱ्या घोषणांनी शेतकरी वर्ग पूर्णपणे मोहित झालेला होता. त्यावेळी 'भीक नको, हवे घामाचे दाम' अशी एक घोषणा असलेली एक पुस्तिकाही शरद जोशींनी प्रसिद्ध केली होती. पण देशात विक्रमी उत्पादन झाले म्हणजे शेतमालाचे भाव कोसळण्याची

शक्यता असते अशा वेळी आधारभूत किंमतीची मागणी करावीच लागते किंवा शेतमालाच्या निर्यातीला प्रोत्साहन द्यावे लागते ही जाण आंदोलनकर्त्यांमध्ये निर्माण होणे हे सुचिन्ह आहे.

मात्र योगायोग असा की त्याच शेतकरी संघटनेचे विद्यमान अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांनी नुकतीच बारामती येथे राज्यव्यापी आंदोलन सुरु केल्याची घोषणा केली. सुमारे दहा हजाराहून अधिक उस उत्पादक शेतकऱ्यांची उपस्थिती असलेल्या मेळाव्यात त्यांनी तीन प्रमुख मागण्या शासनाकडे केल्या आहेत, 'उसाला यंदा (२०१०) रु. २२०० प्रतिटन उचल मिळायला हवी, उस तोडणी कामगारांना दोनशे रुपये प्रतिटन मजुरी मिळाली पाहिजे आणि तीन हजार रुपये प्रतिक्विंटल या भावाच्या आत साखरेची विक्री होऊ द्यायची नाही अशा त्या तीन मागण्या त्यांनी शरद पवारांच्या बारामतीतच केल्या. (पहा : दै. सकाळ, सकाळ टुडे पुरवणी दि. ३ सप्टेंबर २०१०, पृष्ठ १२) हा योगायोग दोन अर्थाने आहे. एक तर ज्या कृषिमंत्री शरद पवारांचे शरद जोशींनी अन्नधान्याच्या विक्रमी आधारभूत किंमती ठरवून दिल्यामुळे अभिनंदन केले त्याच शरद पवारांच्या बारामतीत या नव्या संघर्षाची मशाल पेटवली गेली. दुसरे म्हणजे सप्टेंबर २०१० च्या पहिल्या आठवड्यातच शरद जोशींनी वयाची पंचाहत्तरी पूर्ण केली त्याबद्दल त्यांचा घरगुती स्वरुपात सत्कार सोहळा पुण्यात होत होता त्याचवेळी शेतकरी संघटनेने आंदोलनाचा पांचजन्य बारामतीत वाजवला.



*शरद पवार*

शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त दर मिळाले पाहिजे आणि त्यांच्या हातात नफ्याचे चार पैसे उरले पाहिजे कारण देशात महागाई नवे उच्चांक गाठत आहे हे मान्य करणाऱ्यांनाही शेतकरी संघटनेने ऊस आणि साखरेच्या बाबतीत केलेल्या मागण्या काहीशा अवाजवी आहेत असेच वाटेल. चळवळी आणि आंदोलनांची रणनीती ठरविणाऱ्यांनासुद्धा वास्तवाची स्थिती व मागण्यांची पूर्तता होण्याच्या शक्याशक्यतेचे भान असले पाहिजे.

दीर्घकालीन उद्दिष्टे आणि लक्ष्य, तसेच नजिकच्या भविष्यात जे पदरात पाडून घ्यायचे आहे यांचे संतुलन वैचारिक-सैद्धांतिक अधिष्ठान असलेल्या चळवळींना ढळू देणे हितावह नसते. शेतकरी संघटनेने बारामती येथील कृषी मेळाव्यात आंदोलनाची घोषणा केल्याच्या पार्श्वभूमीवर 'शेतकरी तितुका मेळवावा' असे भावनिक आवाहन करणाऱ्या शरद जोशींच्या नेतृत्वाखालील शेतकरी चळवळीचा आणि संघटनेचा गेल्या तीन दशकातील स्मृतीतला पट उलगडत गेला. तो सुद्धा त्यांचा अमृत महोत्सव साजरा होत असतानाच.

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या महत्त्वाच्या चळवळी आणि आंदोलनांचा जेव्हा आढावा घेतला जातो तेव्हा महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या प्रदीर्घ चळवळीचा उल्लेख करावाच लागतो. या शेतकरी आंदोलनाने गेल्या तिच्या तीन दशकांच्या वाटचालीत अनेक वळणे घेतली, तसेच बरेच चढउतारसुद्धा अनुभवलेत. कोणत्याही संघटनेने किंवा चळवळीने, विशेषतः तिच्या अपूर्णावस्थेत म्हणजे तिचा संपूर्ण जीवनपट अद्याप पूर्णपणे उलगडलेला नसताना, तिने काय कमावले व काय गमावले याचा ताळेबंद तयार करणे जसे कठिण आहे तसेच ते तिच्यावर अन्याय करणारेही ठरू शकेल.

ज्याला आज सामाजिक शास्त्रांच्या परिप्रेक्ष्यात 'नव सामाजिक चळवळ' म्हटले जाते त्यांत शेतकरी संघटनेचा विचार करणारे काही निरीक्षक आहेत, तर काहींच्या मते 'शेतमालाला उत्पादन खर्चाच्या आधारावर योग्य भाव मिळाला पाहिजे या प्रमुख मागणीचा लाभ श्रीमंत शेतकरी आणि बागाईतदारांना जास्त होतो. त्यामुळे शेतकरी चळवळ ही वर्गीय हितसंबंध काहीशा पोथीनिष्ठपणे 'वर्गसंघर्षा'चे तत्त्वज्ञान मानणारे करीत असतात. गतकाळातल्या घटना आणि त्यांच्या परस्परसंबंधांचा अन्वयार्थ इतिहासकार लावतात, पण ते करताना त्यांच्याकडून इतिहासाची समकालीन संदर्भात पुर्नमांडणीच होत असते. त्या विश्लेषणात तटस्थता तंतोतंत पाळली जातेच असे नाही.

१९७० च्या दशकात हरित क्रांतीच्या पहिल्या टप्प्यात

अपेक्षित फळे दिसू लागली होती. पंजाब, हरयाणा, गुजरात तसेच महाराष्ट्र आणि कर्नाटकाच्या काही भागात हरितक्रांतीच्या नव्या तंत्रज्ञानामुळे शेती उत्पादनात, विशेषतः अन्नधान्य उत्पादनात, लक्षणीय वाढ झालेली होती, मात्र बाजारपेठेतील मागणी-पुरवठ्याच्या असंतुलनामुळे धान्याचे भाव गडगडू लागले होते आणि उत्पादन खर्च तरी भरून निघेल किंवा नाही अशा परिस्थितीत, त्या पृष्ठभूमीवर पंजाब, हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक आणि तामिळनाडूमध्ये शेतकरी आंदोलने १९७३-७९ दरम्यान सुरु झाली. म्हणजे 'उत्पादनात वृद्धी, पण नफ्यात घट' या हरितक्रांतीमुळे निर्माण झालेल्या अंतर्विरोधातून शेतकरी संघटनेचा उदय झाला हे सर्व प्रथम ध्यानात घेतले पाहिजे.

महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या 'उत्पादनखर्चावर आधारित शेतमालाला किंमत मिळाली पाहिजे' या एक कलमी कार्यक्रमाला तर्कशुद्ध असा सैद्धान्तिक आधार मिळाला ही आंदोलनाची सगळ्यात भक्कम जमेची बाजू. कारखाने आणि उद्योगधंद्यात वस्तुउत्पादन करताना भांडवलदार कामगारांचे शोषण करतात, अतिरिक्त मूल्य निर्माण करणाऱ्या श्रमिकालाच नफ्यातील त्याच्या न्याय्य वाट्यापासून वंचित ठेवले जाते ही मुळात १९ व्या शतकाच्या मध्यात मार्क्सवादाने केलेली मांडणी. त्याला रशियन राज्यक्रांतीच्या सुमारास रोझा लुक्झेम्बर्ग यांनी वेगळीच कलाटणी दिली. त्यांच्या मते उत्पादन संबंधात अंतर्विरोध दोन स्तरांवर निर्माण होतात. उद्योगधंदे - कारखान्यांना स्वस्त दरात कच्चा माल पाहिजे असतो. म्हणून पहिल्या स्तरावर कृषि अर्थव्यवस्थेचे शोषण भांडवली उद्योगपतींकडून आणि अर्थव्यवस्थेकडून होत असते. नंतर तेच भांडवलदार कामगारांचे शोषण करीत असतात. पहिल्या पातळीवर शोषण निर्विघ्नपणे होत रहावे यासाठी राज्यसंस्थेची धोरणे व यंत्रणा पद्धतशीरपणे भांडवलदार वापरतात. हा प्राथमिक स्तरावरचा अंतर्विरोध आधी निस्तरला पाहिजे. ते शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाल्यानेच होऊ शकेल ही शेतकरी संघटनेची मूळ सैद्धांतिक मागणी. तिच्या तपशिलात काही किरकोळ बदल झाले असले तरीही ती जागतिकीकरण आणि आर्थिक उदारीकरणाच्या आजच्या संदर्भातही तितकीच रास्त, आणि म्हणून समर्थनीय आहे.

शेतकरी आंदोलनाची दुसरी जमेची बाजू म्हणजे तिला लाभलेले प्रभावी नेतृत्व. आज तीन दशकानंतरही शरद जोशी यांच्या नेतृत्वाला अधूनमधून ग्रहण लागले तरीही त्यांना पर्यायी नेता महाराष्ट्रातच नव्हे तर सर्व भारतात नाही असे म्हणताना त्यात कुठलीही अतिशयोक्ती होणार नाही. शेतकरी चळवळीत त्यांचे समकालीन नेते म्हणजे पंजाबात राजेवाल, भूपींदरसिंग मान, उत्तरप्रदेशात भारतीय किसान युनियनचे महेन्द्रसिंग टिकैत किंवा कर्नाटकात प्रो. नांजुंयेदप्पा आणि अन्य राज्यातील काही नेत्यांचेही योगदान महत्त्वाचे आहे याबद्दल वाद असण्याचे कारण नाही. पण शेतीच्या अर्थशास्त्राची सैद्धांतिक मांडणी करताना लागणारी सुस्पष्टता, आणि ते अर्थशास्त्र तळागाळातल्या 'बळिराजा'ला समजेल अशा भाषेत त्याला पटवून देण्याचे कौशल्य यांचे जे दुर्मिळ रसायन शरद जोशींमध्ये आहोत त्यांच्या समकालीन इतर शेतकरी नेत्यांत नाही असे म्हणावे लागते. या परिस्थितीत अद्याप बदल झालेला नाही.


शरद जोशी

१९७८-७९ चे चाकण-लासलगाव-नाशिक भागात केलेले कांदा आंदोलन, त्यानंतर ऊसाला हमी भाव मिळावा यासाठीचा प्रभावी प्रदीर्घ संघर्ष, त्यापाठोपाठ निपाणीचे तंबाखू उत्पादनाला मिळणाऱ्या भावाबद्दलचे आंदोलन, विदर्भातील कापूस उत्पादकांचे आंदोलन अशी एकापाठोपाठ एक यशस्वी आंदोलनाची मालिका शेतकरी संघटनेच्या खात्यात जमा आहे. नाही म्हणायला 'दूध' आंदोलन फिसकटले. दुध उत्पादकांनी डेअऱ्यांवर दुध न घालता त्याचा खवा, तुप करणे किंवा आंदोलनाचा पवित्रा म्हणून दूध रस्त्यावर ओतून देणे हे दोन-तीन दिवस घडू शकले. मात्र असे नुकसान सोसण्याची सिद्धता फार काळ टिकत नसते. आंदोलनाच्या रणनीतीबद्दल दूध आंदोलनामुळे शेतकरी संघटनेला एक महत्त्वाचा पाठ शिकायला मिळाला. आंदोलन कसे छेडू नये याचा तो धडा होता.

## महिला आघाडी

कृषी अर्थव्यवस्थेत महिला कष्टकऱ्यांचे स्थान महत्त्वाचे असले तरीही पुरुषसत्ता रचनेत ते मान्य केले जात नाही म्हणा किंवा उत्पादन प्रक्रियेत शेतकरी कुटुंबातील स्त्रियांचे योगदान गृहितच धरण्याची प्रवृत्ती सर्वत्रच आहे. भारतात तर सांस्कृतिक परंपरांनी तिला प्रतिष्ठा आणि अधिमान्यता दोन्हीही दिल्या आहेत. स्त्रियांच्या शोषणाच्या या दुष्टचक्राला प्रथम छेद दिला तो शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेने. त्यांनी स्वतंत्रपणे महिला आघाडी उभी केली. त्याद्वारे शेतकरी महिलांमध्ये जाणीव - जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न पद्धतशीरपणे केला गेला. वार्षिक अधिवेशने भरविण्यापुरती ही महिला आघाडी नाही. तर शेतीचे सात-बारावर मालकी हक्क कुटुंबातल्या स्त्रियांच्या नावाने नोंदविले गेले पाहिजे असा प्रयत्न झाला. सीताशेतीची संकल्पना मांडली गेली आणि



त्या दिशेने प्रयोग-प्रयत्न झाले. स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकऱ्यांच्या चळवळीत स्त्रियांचा जिकताना सहभाग महाराष्ट्रात शेतकरी संघटनेने यशस्वीपणे घडवून दाखविला तसे अन्य राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दुसरे उदाहरण नाही.

## राजसंन्यासाकडून राजकारणाकडे

शेतकरी चळवळीच्या पहिल्या दशकात (१९७८-८७) शरद जोशींनी शेतकरी संघटना पक्षीय राजकारणापासून पूर्णतः अलिप्त राहील अशी भूमिका घेतली होती. लोकतंत्रात्मक राज्य संस्थेत सत्तेसाठी तडजोडीचे राजकारण तत्वशून्य होऊनच सर्व पक्ष नेते करीत असतात. 'कोणी मोठा चोर तर कोणी छोटा'. सगळेच लबाड असे विचार शरद जोशी जाहीर सभांमधून बेधडकपणे करीत असत. पण पुढे शेतकऱ्यांना जे लाभ आपल्याला मिळवून द्यायचे आहेत ते राज्यसंस्थेच्या धोरणात्मक चौकटीत बदल घडवून आणल्यानेच शक्य होणार आहे हे डोळस शहाणपण आल्यानंतर मात्र विविध पक्ष आणि त्यांच्या नेत्यांमध्ये शेतकरी संघटनेने मित्रांचा शोध सुरु केला. राहुरी येथील कृषी मेळाव्यात एकाच व्यासपीठावर शरद जोशींसमवेत, व्ही. पी. सिंग, चौधरी चरणसिंग, शरद पवार, कामगार नेते दत्ता सामंत आदी नेत्यांनी संघटनेच्या भूमिकेला पाठिंबा दर्शविला होता इतपत ठीक होते.

नंतर शेतकरी संघटनेने 'स्वतंत्र पक्ष' नावाचा आपला वेगळा पक्षच स्थापन केला. तो आजही कार्यरत आहे. विधानसभा, लोकसभा निवडणुका लढविण्याआधी संघटनेने काही, सहकारी साखर कारखान्यांच्या, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थातील निवडणुका लढविल्या होत्या. स्वतंत्र पक्षाचे चार-



सहा आमदार महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले. सरोज काशीकरांसारख्या महिला आघाडीच्या नेत्या विधान परिषदेवर निवडून गेल्या. पण शेतकरी चळवळीची राजकीय शक्ती त्याच्यापुढे जाऊ शकली नाही. हे वास्तव आहे. विदर्भातील चंद्रपूरकडचे वामनराव हे एक प्रभावी कार्यकर्ते, स्वतंत्र पक्षाचे उमेदवार म्हणून दोन-तीन वेळा विधानसभेवर निवडून गेले. मात्र आंदोलन काळात शरद जोशींच्या सभांना लाखाच्या संख्येने येणाऱ्या शेतकऱ्यांचा लाभलेला जनाधार शेतकरी संघटना मतपेटीत पडणाऱ्या मतांमध्ये परिवर्तीत करु शकली नाही हे कटू सत्य नाकारुनही चालणार नाही. शिवाय ज्या भाजप आणि शिवसेनेच्या राजकारणावर शरद जोशी कसलाही मुलाहिजा न ठेवता टीकेची झोड उठवायचे, शेवटी त्याच

पक्षाच्या समर्थनामुळे ते सहा वर्षे राज्यसभेवर निवडून गेले हे चोखंदळ नागरिक विसरणार नाहीत. शेवटी राजकारणात कोणीच कोणाचे कायमचे मित्र वा शत्रू नसतात हेच खरे !

शिवाय जागतिकीकरण, आर्थिक उदारीकरण, मुक्त आंतरराष्ट्रीय बाजारपेठ आणि जागतिक व्यापार संघटना यांच्याबाबत शरद जोशींनी घेतलेली अनुकूल भूमिका सर्वच कार्यकर्त्यांना पटलेली नाही. एकीकडे शेतमालाच्या निर्यातीसाठी आग्रही मागणी करायची आणि दुसरीकडे स्थानिक बाजारपेठेत हमीभाव मागायचे या भूमिका परस्पर विरोधी वाटायच्या याबाबतीत धोरणात्मक धरसोडीमुळे कार्यकर्त्यांच्या मनात गोंधळ निर्माण झाला असल्यास नवल नाही.

ध्येयासक्ती आणि तळमळीमुळे झोकून देऊन काम करण्याचा शरद जोशींचा पिंड म्हणून हात राखून आंदोलनात उतरणारे कार्यकर्ते त्यांच्या मर्जीतून उतरतात. काही वैचारिक-तात्विक मतभेदांमुळे, तर काही नेते शरद जोशींच्या काहीशा 'हट्टी हेकेखोर' स्वभावामुळे, असहिष्णु वृत्तीमुळे दुखावले गेलेले कार्यकर्ते आज संघटनेच्या मुख्य प्रवाहातून बाजूला झाले आहेत. वर्ध्याचे विजय जावंधियांपासून तर विनय हर्डिकरांपर्यंत एके काळीजे आघाडीचे नेते शेतकरी संघटनेपासून दूर झालेत. 'मी म्हणेन तेच बरोबर व तीच पूर्वदिशा' अशा नीतीने संघटनेचा जनाधार क्षीण होऊ शकतो हे शरद जोशींना कोणी सांगावे याची गरज नाही. त्यांच्या बौद्धिक व कर्तृत्वाबद्दल, वैचारिक मांडणीबद्दल आणि वक्तृत्वाबद्दल नितांत आदर बाळगणारे अनेकजण आज खांद्याला खांदा लावून त्यांचेसोबत चळवळीत नाहीत हे उघड आहे. याबद्दल अंतर्मुख होऊन विचार होणे आवश्यक आहे. मात्र एवढ्याने शेतकरी चळवळीला महाराष्ट्रात ओहोटी लागली आहे, शेतकरी संघटनेचा जनाधार संपलेला आहे आणि शरद जोशी यांनी आता चळवळीतून निवृत्त होऊन आत्मचरित्र लिहीणे योग्य असे निष्कर्ष काढणे सपशेल चुकीचे ठरु शकतात. फारतर आज चळवळीचा एक टप्पा पूर्ण झालाय, एक मोठा अध्याय संपला आहे एवढेच काय ते म्हणता येईल. शेतकरी आंदोलन हे भांडवली उत्पादन व्यवस्थेचे



अविभाज्य अंग आहे. तिचे पाठीराखे पक्षीय राजकारणात आहेत तोवर शेतकरी संघटना सक्रीय राहणारच. प्रत्येक राजकीय पक्षाच्या जशा महिला, युवा आघाड्या आहेत तशाच 'किसान आघाड्या' सुरु झाल्यात. त्यांचे मेळावे सतत होत असतात. शेतमालाला उत्पादनखर्चावर आधारित भाव मिळावेत या मागणीला आज सर्व पक्षीय समर्थन मिळते आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

पण, काळ्या मातीतून सोने पिकविणारा आणि समृद्धी आणणारा शेतकरी भारतात आजही बहुसंख्य मात्र गरीब आणि कर्जबाजारी आहे. गेल्या दशकात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. आजही करीत आहेत. आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांच्या नावाने हजारो कोटींचे पॅकेजेस केंद्रातून पोचते. पावसाची अनिश्चितता, लोडशेडिंग आणि दलाल-मध्यस्थींच्या कारवायांनी शेतकरी त्रस्त आहे. शेतकरी संघटनेचा 'अजेंडा' संपलेला नाही. आता पुनः नव्याने आंदोलन सुरु करण्यासाठी काळ अनुकूल आहे. राजू शेट्टी हे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे खासदार म्हणून निवडून आलेत हे खरे, पण हा पर्याय कितपत शाश्वत आहे हे आज सांगता येणार नाही. शेतकरी संघटनेचे विद्यमान अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांना उसासाठी उचल भावाची मागणी करताना वास्तवाचे भान कितपत आहे याबद्दल शंका वाटते.

वयाची पंचाहत्तरी पूर्ण केलेल्या शरद जोशींना यातले अनेक प्रश्न आज खुणावीत असणार. ग्रामीण परिवर्तनात शेतकरी चळवळीला अजून महत्त्वाची भूमिका बजावायची आहे. त्यासाठी लागणाऱ्या वैचारिक घुसळण, चिंतन आणि मंथनाला ते चालना देतील अशी आशा आपण करु या आणि 'जीवेत शरदः शतम्' अशी त्यांना शुभेच्छा देऊ या. त्याचप्रमाणे संघटनेच्या नेतृत्वाची नवी पिढी आंदोलनाची रणनीती व मागण्या काय असाव्या आणि सामान्य शेतकरी शेतमजूर कोणत्या मुद्द्यांवर आपल्या पाठीशी राहतील याचे भान राखेल अशी आशा करु या.



# रॉंग, युवर ऑनर

**सरकारच्या गोदामामध्ये खराब झालेले धान्य गोरगरिबांना फुकट वाटावे, असा जो सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला आदेश दिला. त्यावरून प्रसार माध्यमांमध्ये ज्या निरनिराळ्या प्रतिक्रिया लेख व अग्रलेखाच्या रुपाने व्यक्त झाल्या. त्यातील काही निवडक प्रतिक्रिया वाचकांसाठी येथे देत आहोत.**

(इकॉनॉमिक टाइम्सच्या १-९-२०१० च्या अंकातील अग्रलेखाचा स्वैर अनुवाद)

'सडलेले धान्य देशातील गोरगरीबांना फुकट वाटा.' असा आदेश केंद्र सरकारला देण्यात सर्वोच्च न्यायालयाने मोठी चूक केली आहे. या आदेशाची अंमलबजावणी करु असे सरकारने स्पष्ट केले असले तरी त्यामुळे न्यायालयाची चूक लपत नाही. अर्थात देशातील असंख्य नागरिक उपासमारीने ग्रस्त असतांना सरकारी गोदामांमध्ये धान्य सडत पडावे, याबद्दल न्यायालयाने व्यक्त केलेला संताप योग्यच आहे. परंतु त्यामुळे देशाच्या भिन्न-भिन्न यंत्रणांमध्ये असलेला समतोल बिघडू देता कामा नये. न्यायालयाने कायद्यांशी संबंधित मुद्द्यांचाच विचार करावा आणि धोरण व प्रशासनविषयक बाबी सरकारच्या अखत्यारीत राहू द्याव्यात. हेच सर्वथा योग्य ठरेल. सरकार व विधी मंडळांच्या कारभारातील दोष व त्रुटी दूर करण्यास न्यायालयाने पुढे सरसावणे चुकीचे आहे. निसर्ग नेहमी पोकळी भरुन काढत असतो, आणि देशाचे कामकाज पाहणाऱ्या विविध यंत्रणांच्या जबाबदारीच्या विभाजनासही तो नियम लागू होतो. त्यामुळे एक यंत्रणा आपली विहीत जबाबदारी पार पाडण्यात कमी पडते तेव्हा दुसरी यंत्रणा पुढे होऊन तिची कसर भरुन काढत असते. या स्थितीत कदाचित अल्पकालीन लाभ होतातही परंतु दीर्घकालीन नुकसान लक्षात घेता ते लाभ नगण्यच ठरण्याची शक्यता असते. आज घडीस दिल्लीच्या रस्त्यांवर दररोज न्यायालयाच्या आदेशांची पायमल्ली करुन दुचाकी, तीन चाकी वाहने, मोटारी व बसेस मनमानी पद्धतीने धावतांना दिसतात. खरे तर, या प्रत्येक प्रकारच्या

वाहनांसाठी ठराविक मार्ग आखून देण्यात आलेले आहेत परंतु त्याचे पालन कोणीच करीत नाही. आपल्या आदेशांचे हे अगदी दरदिनी होणारे सर्रास उल्लंघन सर्वोच्च न्यायालयास मुकाटपणे सहन करावे लागत आहे.

आता सडलेले धान्य गोरगरीबांना मोफत वाटण्याच्या त्यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देऊन आणि वैधानिक अनुचिततेच्या मुद्यावर त्यास विरोध करण्याचे टाळून सरकारने चांगला समंजसपणा दाखविला आहे. खरे तर, न्यायालयाने स्वतःकडे सोपविलेले काम करावे. आपण आपले काम करण्यास व त्यात काही चूक झाल्यास जनतेच्या न्यायालयात त्याची किंमत मोजण्यास आपण तयार आहोत, अशी संघर्षाची भूमिका सरकार घेऊ शकले असते. तसे झाले नाही हे ठीकच परंतु धान्याचे साठे सडत पडू देण्याचे समर्थन मात्र कदापि होऊ शकणार नाही. साठवणीची अपुरी व्यवस्था हे या समस्येचे कारणच असू शकत नाही. सरकारने खरीदलेले धान्य योग्य प्रकारे साठवण्यासाठी पुरेशी गोदामे का नाहीत? जर खासगी व्यापाऱ्यांना ठराविक मर्यादेपेक्षा अधिक धान्यसाठा करण्यास सरकार मनाई करीत असेल तर मग आवश्यक तेवढ्या साठवण क्षमतेची तरतुद करणे वा खासगी क्षेत्राकडून ती भाडेपट्ट्याने उपलब्ध करुन घेणे, ही त्यांचीच जबाबदारी ठरते. आता अन्नसुरक्षेच्या संपूर्ण व्यवस्थेचीच सुधारणा होणे गरजेचे आहे. अर्थात ती कशी करायची याचा निर्णय सरकारनेच घ्यायचा आहे, न्यायालयांनी नाही!

# सर्वोच्च न्यायालयाचा आदेश बुचकळ्यात टाकणारा

भारताचे सर्वोच्च न्यायालय हे जगातील सर्वात शक्तीशाली न्यायालय आहे असे अनेकदा म्हटले जाते. या न्यायालयाचे पुनर्विलोकन व हस्तक्षेपविषयक अधिकार खरोखरच अतिशय व्यापक आहेत. अर्थात ते त्यास प्राप्त झालेले आहेत ते त्याच्या प्रचंड विश्वासार्हतेमुळेच हे नाकारुन चालणार नाही. राज्यकर्त्यांच्या कारभाराचे नियमन करणारी त्यावर नियंत्रण ठेवणारी अंतिम सत्ता म्हणून आपल्या सर्वोच्च न्यायालयाकडे पाहिले जाते आणि विश्वासार्हतेच्या बळावरच त्याने आपली ही प्रतिमा आजवर अगदी काळजीकाट्याने जपली आहे. काही दिवसांपूर्वी भारताच्या सरन्यायाधीशांनी ‘देश चालविण्याच्या कामात लक्ष घालण्याचा प्रयत्न आमची न्यायालये करीत नाहीत.’ असे जे विधान केले ते न्याययंत्रणेची कार्यकक्षा स्पष्ट करणारे आणि विश्वसनियतेची ग्वाही देणारे होते.



परंतु या साऱ्या पार्श्वभूमीवर देशातील गरजू गोरगरिबांना अतिरिक्त धान्यसाठा मोफत वाटा, ‘‘असा जो आदेश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नुकताच दिला तो निश्चितच बुचकळ्यात टाकणारा वाटतो. फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियातील भ्रष्टाचाराशी संबंधित एका प्रकरणाची सुनावणी करताना या न्यायालयाच्या खंडपीठाने केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्यावर जे ताशेरे झाडले ते खरोखरच अनाकलनीय आहे. ‘जादा धान्याचा साठा सध्या सडत असला तरी न्यायालयाच्या सुचनेप्रमाणे



फुकट वाढणे सरकारला शक्य होणार नाही.'' असा अभिप्राय श्री. शरद पवार यांनी मध्यंतरी व्यक्त केला होता. त्यास आक्षेप घेतांना खंडपीठाने केंद्र सरकारच्या वकिलांची कानउघाडणी केली आणि 'सर्वोच्च न्यायालयाची कोणतीही टीप्पणी ही सूचना नाही तर आदेशच असतो हे मंत्रीमहोदयांना समजावून सांगा,' असे खडसावले आहे.

वरवर पाहाता, खंडपीठाच्या या खडसावणीत आक्षेपार्ह म्हणावे असे काहीही नाही. आज फूड कॉर्पोरेशनच्या गोदामांमध्ये हजारो टन धान्य कुजत पडलेले असतांना नोकरशाहीच्या नियम-निर्बंधांची सबब पुढे करुन ते गोरगरीबांपर्यंत पोचण्यास विरोध करणे, निश्चितच अयोग्य व कोणाच्याही सद्सदविवेक बुद्धीला न पटणारे आहे. त्याबद्दलचा राग व्यक्त करण्यासाठी संसदेच्या सभागृहात एका सन्मान्य सदस्याने धान्याचे पाकिट आणले तर अन्य काही सदस्यांनी श्री. पवार यांच्या बडतर्फीची मागणी केली. अर्थात, दरम्यानच्या काळात आपण न्यायालयाच्या निर्णयाचा आदर राखू असा खुलासा श्री. पवार यांनी केला आहे.

'या सर्व गोंधळात आता नेमके कोणते धान्य गोरगरीबांना मोफत वाटता येईल,' हा महत्त्वाचा मुद्दा तर बाजूला पडला आहेच परंतु फूड कॉर्पोरेशनची साठवणक्षमता व त्यातील अडचणींचा जो उहापोह न्यायालयाने केला तोही दुर्लक्षित झाला आहे. 'साठवण करता येईल एवढेच धान्य सरकारने खरेदी करावे आणि दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे नव्याने सर्वेक्षण करावे,' ही न्यायालयाची नवी सूचना सरकारच्या कार्यक्षेत्रावर आक्रमण करणारी ठरू शकते. भारतातील सरकारी धान्यखरेदी - खरीदलेल्या धान्याची साठवण आणि त्याचे सार्वजनिक वितरण हा साराच विषय अतिशय गुंतागुंतीचा व अनेक प्रश्न निर्माण करणारा आहे. धान्यखरेदीचे आपले धोरण आणि त्याची अंमलबजावणी अतिशय वाईट आहे यात शंकाच नाही, परंतु त्या साऱ्यास राजकारणाची झालर आहे हे मात्र विसरुन चालणार नाही. या स्थितीत न्यायालयाने त्यात हस्तक्षेप करणे व लक्ष घालणे कितपत संयुक्तिक व योग्य ठरु शकते?

**(इंडियन एक्स्प्रेसच्या १-९-१० च्या अंकातील संपादकीयाचा स्वैर अनुवाद)**

# ‘हक्क’ आणि ‘अधिकार’ यांची गल्लत नको...!



- स्वामीनाथन एस अंकलेसरिया अय्यर

**‘मूलभूत हक्क’ आणि ‘जनकल्याणकारी अधिकार’ या दोन गोष्टी एकमेकांपासून पूर्णपणे भिन्न आहेत. त्यांची गल्लत करुन समाजाचे भले करण्याचा आव कोणी कितीही आणला तरी त्याचा परिणाम अखेर सारा देश ‘दिवाळखोर’ बनण्यातच होऊ शकतो, असा इतिहास आहे. त्यापासून योग्य तो बोध घेणे आणि साऱ्या जनकल्याणकारी अधिकारांचे प्रमाण व व्याप्ती योग्य मर्यादेत राखणे, हेच राज्यकर्त्यांकडून अपेक्षित आहे.**

आपल्या देशातील राजकारणी मंडळी आणि सामाजिक कार्यकर्ते नेहमी हक्कांची भाषा बोलत असतात. गेल्या काही काळात त्यांनी काम मिळण्याचा शिक्षणाचा आणि अन्न मिळण्याचा असे अनेक हक्क जनतेच्या पदरात टाकले आहेत परंतु तसे करतांना त्यांनी ‘हक्क’ या संकल्पनेचा मात्र साफ विपर्यासही केला आहे.

हक्क म्हणजे सरकार वा समाजाच्या कोणत्याही घटकाच्या दडपशाहीपासून, पिळवणुकीपासून मुक्तता. त्यास सरकारी अधिकार व सवलतींचे स्वरुप कदापि प्राप्त होऊ शकत नाही. सरकारी सवलतींना अर्थसंकल्पीय बंधने असतात, परंतु हक्कांना मात्र ती लागू होत नाहीत. एका वाक्यात हा फरक सांगायचा झाला तर असे म्हणता येईल की हक्क हे कालातीत, वैश्विक असतात. सवलती व अधिकार मात्र तसे कधीच असू शकत नाहीत.

आपल्याकडे कल्याणकारी राज्यांची संकल्पना फार लोकप्रिय आहे, परंतु भारतात ही संकल्पना नेहमीच खूप मर्यादित स्वरुपात राबविली गेली असल्याचे लक्षात येते. सामान्यतः देश जसजसा अधिक श्रीमंत होत जातो तसतशी या संकल्पनेची व्याप्ती वाढत जाते. परंतु पाश्चात्य जगात सध्या जी आर्थिक पेचप्रसंगाची स्थिती दिसते ती मात्र सवलती व अधिकारांचा अतिरेक झाला तर भल्या भल्या देशांना चक्क दिवाळखोरीस सामोरे जावे लागते. याच दाहक सत्याचा प्रत्यय देते. हक्कांना मर्यादा नसते परंतु अर्थसंकल्पीय निर्बंधांचे यथायोग्य पालन करायचे तर अधिकार व सवलती मर्यादित राखणेच श्रेयःस्कर ठरते. त्यामुळे ‘हक्क’ आणि ‘अधिकार’ यांची गल्लत कधीच केली जाऊ नये.

अमेरिकेतील अर्थतज्ज्ञांनी नुकतीच काही आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार आगामी दशकभरात तीन प्रकारच्या कल्याणकारी योजनांचा वृद्धांसाठी सामाजिक सुरक्षा व वैद्यकीय सेवासुविधा आणि गोरगरीबांसाठी वैद्यकीय सेवासुविधा खर्च तिपटीने वाढणार आहे. सध्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या सात टक्के रक्कम या योजनांवर खर्ची पडते. आता तो आकडा वीस टक्क्यांवर जाईल. आणि त्यासाठीच सरकारचा बहुतेक सारा महसुल खर्ची पडेल. कॅटो इन्स्टिट्युटचे जगदीश गोखले यांच्या म्हणण्यानुसार सामाजिक सुरक्षा योजनांवर होणारा खर्च यापुढेही असाच चालू राहाणे म्हणजे अमेरिकेने राष्ट्रीय कर्जबाजारीपणास आमंत्रण देण्यासारखे ठरणार आहे. बोस्टन विद्यापीठाचे लॉरेन्स कोटलीकॉफ यांनीही त्या विरोधात

आवाज उठविला असून तथाकथित कल्याणकारी कार्यक्रमांचे वर्णन 'पोंझी स्किम्स' अशा शब्दात केले आहे. ते म्हणतात की, या योजनांवर होणारा खर्च म्हणजे अन्य काही नाही तर भावी पिढ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा भार वाढविणे आहे.'

ग्रीससारखा देश आपल्या नागरिकांच्या समाजवादी अधिकारांचा मोठा टेंभा मिरवित होता, परंतु या अधिकाऱ्यांच्या अतिरेकामुळेच आज तो कर्जाच्या विळख्यात सापडला असून, युरोपियन महासंघाने मदतीचा हात दिल्यानंतरही त्याची त्यातून सुटका होऊ शकलेली नाही, त्याच्या या स्थितीपासून योग्य तो बोध घेत आता स्पेन, ब्रिटन, पोर्तुगाल व आयर्लंडसारखे देश अधिकार व सवलतींचे प्रमाण घटविण्याचा विचार करु लागले आहेत.

एककाळ कल्याणकारी राज्य या संकल्पनेकडे मार्क्सची महान दुरदृष्टी म्हणून पाहिले जायचे परंतु खरे तर ही संकल्पना सर्व लोकशाही व भांडवलशाही व्यवस्थांचाच स्वाभाविक भाग आहे. १६ व्या शतकापासून ब्रिटनमध्ये गरीबांसाठीचे जे कायदे अस्तित्वात आहेत, त्यात निराश्रीतांना अगदी अल्प वेतनात काम देण्याची तरतुद आहे. परंतु या तरतुदीकडे कामाचा हक्क म्हणून नव्हे तर 'ख्रिश्चन चॅरिटी' (दानधर्म) म्हणून पाहिले जाते आणि तिचा उद्देश निराश निराश्रितांना गुन्हेगारीच्या मार्गाकडे वळण्यापासून रोखणे, एवढाच आहे.

१६८९ च्या बील ऑफ राइटस्‌मुळे ब्रिटनमध्ये संविधानिक राजेशाही अस्तित्वात आली, त्यात नमूद केलेल्या हक्कांमध्ये संसदेच्या मंजुरीविना कोणतीही करआकारणी नाही, कायद्याच्या प्रक्रियेत राजाचा हस्तक्षेप नाही, शांततेच्या काळात लष्करी कायदा लागू होणार नाही आणि स्वतंत्र निवडणुका व भाषणस्वातंत्र्य आदिंचा अंतर्भाव आहे. या सर्व गोष्टींचा समावेश 'हक्कांत' होतो, 'अधिकारांमध्ये' नाही.

१७७६ मध्ये अमेरिका स्वातंत्र्याचा जो जाहीरनामा प्रसृत झाला त्यात 'सर्व नागरिक समान आहेत, सर्वांना स्वतंत्रपणे जगण्याचा व जीवनाचा आनंद लुटण्याचा मुलभूत हक्क आहे,' असे नमूद करण्यात आले होते. पुढे १७८९ मध्ये यू एस बील ऑफ राइटस् संमत झाले. त्यात धार्मिक व भाषण स्वातंत्र्य शांततेने एकत्र जमण्याचा हक्क-शांततेच्या काळात लष्करी हस्तक्षेपापासून मुक्तता - बेकायदा अटक, अवास्तव जामीन, छळ व कठोर शिक्षांना प्रतिबंध आणि कोणत्याही खटल्यात विधीतांची मदत आदि हक्कांचा अंतर्भाव होता.

फ्रेंच राज्यक्रांतीनेही अशाच स्वरुपाच्या नागरी हक्कांची प्रस्थापना केली. सर्व नागरिक जन्मतः स्वतंत्र व समान असून, त्यांना मालमत्तेचा व सुरक्षिततेचा हक्क आहे. तसेच धार्मिक व भाषण स्वातंत्र्य आहे, याची ग्वाही तेथील हक्क सनदेने दिली.

नागरिकांच्या मुलभूत हक्कांच्या प्रस्थापनेत अमेरिका-ब्रिटन व फ्रान्स हे तीन देश नेहमीच आघाडीवर राहिले आहेत, परंतु हे मुलभूत हक्क अधिकार नव्हे तर स्वातंत्र्य या संकल्पनेशी संलग्न ठेवण्याची दक्षताही त्यांनी आवर्जुन घेतली आहे. अर्थात हे हक्क पुरेसे न वाटल्यामुळे गेल्या काही दशकांत त्यास काही पुरक अधिकारांची जोड देण्यात आली आणि त्याचे वर्णन 'Second Generation Rights' म्हणून केले जाऊ लागले. त्यांचा पाठपुरावा करतांना मार्क्सवाद्यांनी भाषणस्वातंत्र्य, खुल्या निवडणुका, व वैयक्तिक स्वातंत्र्य हे सर्व हक्क म्हणजे प्रस्थापितांनी निर्माण केलेला भ्रम आहे, त्याचा गोरगरीबांना काहीही उपयोग नाही,' असे घोषित केले. याच प्रचाराचा आधार घेत पुढे रशियात लेनिनने 'जनसामांन्यांची हुकूमशाही' स्थापली आणि जनतेचे सर्व मुलभूत हक्क स्थगित करीत तिला अन्न-निवारा व कामाचा अधिकार देऊ केला. अर्थात त्याबद्दल ना त्याला कोणी काही शिक्षा ठोठावली ना 'ग्रेट लिप फॉरवर्ड'चा नारा देत तीन कोटी नागरिकांना यमसदनी धाडणाऱ्या माओला कोणी पदच्युत केले. जी गोष्ट या दोघांची तीच स्टॅलिनची! त्याने युक्रेनमध्ये स्वतःची हुकुमशाही प्रस्थापित करतांना चाळीस ते साठ लाख नागरिकांचे बळी घेतले होते.

कम्युनिस्ट राज्यकर्त्यांची ही उदाहरणे हेच सिद्ध करतात की, मलुभूत स्वातंत्र्याऐवजी मुठभर कल्याणकारी अधिकार मिळणे जनसामांन्यांसाठी कधीच लाभाचे ठरत नाही. जी गोष्ट कम्युनिस्टांची तीच भांडवलशाही कल्याणकारी राज्यांची तेथे जनसामांन्यांना काही वेगळे अधिकार मिळणे योग्य व अनिवार्य असले तरी या अधिकारांची व्याप्ती व प्रमाण मर्यादितच राहिली पाहिजे. देशातील गोरगरीबांपर्यंत जास्तीतजास्त मदतीचा हात पोचवित असतांना त्यामुळे सरकारचे दिवाळे निघणार नाही, याचीही दक्षता घेतली जाणे गरजेचे आहे.

आपल्या देशाच्या लोककल्याणकारी कार्यक्रम व योजनांत आता त्यादृष्टीने काही ठोस बदल केले गेले पाहिजेत. रोजगाराची हमी वा अन्न मिळविण्याचा अधिकार हा सरसकट नाही तर फक्त गरजू नागरिकांपुरताच मर्यादित ठेवला गेला पाहिजे. मुकेश अंबानींसारख्या देशातील सर्वात श्रीमंत उद्योगपतीस भाषणस्वातंत्र्य जरुर मिळाले पाहिजे परंतु अन्य गरजू गोरगरीबांच्या बरोबरीने त्यालाही दरमहा तीन रुपये किलो दराने पस्तीस किलो तांदुळ देण्याचे अट्टहास कशासाठी?

**(टाइम्स ऑफ इंडियाच्या सौजन्याने)**

# दुष्काळी व अतिवृष्टीच्या प्रदेशात शेती करणे थांबवावे

- नानासाहेब पाटील,
अतिरिक्त मुख्य सचिव, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन




'अतिवृष्टीग्रस्त आणि दुष्काळग्रस्त प्रदेशातील शेतकऱ्यांनी शेती करणे थांबवावे कारण या दोन्ही प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या नुकसानीची व्याप्ती वाढत चालली असून, त्याचा सर्वाधिक फटका शेतकरी वर्गासच बसत आहे.' असे प्रतिपादन महाराष्ट्राचे कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचीव नानासाहेब पाटील यांनी नुकतेच केले.

पुण्यातील वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट तर्फे आयोजित एका चर्चासत्रात ते बोलत होते. देशांतर्गत एकूण उत्पादनात असलेला कृषीउत्पादनांचा वाटा आता हळूहळू कमी होत आहे, असे निदर्शनास आणून देऊन श्री. पाटील म्हणाले, 'खते, किटकनाशके, बी-बियाणांच्या किंमतीतील वाढ आणि शेतजमिनीच्या कसात व उत्पादकतेत होत असलेली घट यामुळे शेती करणे फारसे फायद्याचे राहिलेले नाही. दुष्काळग्रस्त प्रदेशात कृषीउत्पादनाचा खर्च वाढतो कारण जलसंधारण हेच मोठे खर्चिक काम आहे. साहजिकच कृषी उत्पादनांच्या किंमती घसरल्या तर शेतकरीवर्ग अधिकच अडचणीत येतो. सध्या खेड्यांमधून शहरांकडे जे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत आहे त्यात प्रामुख्याने दुष्काळग्रस्त प्रदेशातील शेतकरीच आहेत, हे दुर्लक्षून चालणार नाही.'

दुष्काळप्रवण व रेताड जमिनी असलेल्या प्रदेशात यापुढेही शेती करणे चालू राहिले पाहिजे असे म्हणणे मूर्खपणाचे ठरेल. असे सांगून श्री. पाटील पुढे म्हणाले 'आज देशभरातील तब्बल ४० टक्के शेतकरी कृषीक्षेत्रातून बाहेर पडण्यास उत्सुक आहेत. अन्य ४० टक्के शेतकरी ज्यांनी वयाची चाळीशी पार केली आहे त्यांनाही शेती करण्यास रस राहिलेला नाही. परंतु अंगी अन्य कोणतेही कार्यकौशल्य नसल्याने त्यांना नाईलाजाने शेतांमध्ये राबावे लागत आहे. फक्त उर्वरित २० टक्के मंडळींचा शेतकरी म्हणून वावरण्याचा उत्साह टिकून आहे. ही सारी बदलती वस्तुस्थिती व मानसिकता सरकार आणि सत्ताधाऱ्यांनी समजून घेत यापुढील धोरणांची आखणी करणे जरुरीचे आहे.

ग्रामीण नागरिकांचे शहरांमध्ये होत असलेले स्थलांतर आणि शहरीकरणाची वाढती व्याप्ती यांचा देशाच्या आर्थिक विकासात मोठा वाटा असतो. उद्योग व सेवा क्षेत्राप्रमाणे शेती फार मोठी संपत्ती निर्माण करु शकत नाही.' असा मुद्दाही त्यांनी यावेळी मांडला. ते म्हणाले,'' पश्चिम महाराष्ट्र वगळता राज्यातील कोकण, मराठवाडा व विदर्भासारख्या प्रदेशांत तांदुळ, ज्वारी, डाळी व काही कडधान्यांचे उत्पादन होते. परंतु राज्याच्या आर्थिक विकासाचा आढावा घेणारे अहवाल पाहिले तर केवळ पश्चिम महाराष्ट्राचीच प्रगती झाल्याचे लक्षात येते. त्याचे कारण तेथील बागायती उत्पादनांची वाढती निर्यात हेच आहे. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर ऊस उत्पादनाचा नेहमीच थेट परिणाम होतो आणि प. महाराष्ट्र नेमका त्यातच आघाडीवर आहे. तेथे कडधान्ये व डाळींचे उत्पादन अगदी अभावाने होतांना दिसते. प. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी शेतीची आधुनिक तंत्रे आत्मसात केली आहेत, त्यामुळे त्यांच्या प्रदेशाचा तर विकास झाला आहेच परंतु एकूण देशाच्या विकासासही चांगली गती मिळाली आहे.''




# नाशिक विमानतळ योजना लवकर मार्गी लावू : छगन भुजबळ

''नाशिक विमानतळाची योजना नियोजन विभागात अडकली असून, ती लवकरच मार्गी लावली जाईल आणि यासाठी केंद्र सरकारकडे विशेष प्रयत्न केले जातील,'' असे राज्याचे उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले. काकडी ता. कोपरगाव येथील नियोजित शिर्डी विमानतळाच्या भूमीपूजन समारंभात ते प्रमुख पाहुणे या नात्याने बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी खासदार बाळासाहेब विखे होते. या वेळी पालकमंत्री बबनराव पाचपुते, परिवहनमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषीमंत्री बाळासाहेब थोरात, आमदार अशोक काळे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार माणिकराव कोकाटे, साईबाबा संस्थानाचे अध्यक्ष जयंत ससाणे, उपाध्यक्ष शंकरराव कोल्हे, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष रमेशचंद्र सिन्हा उपस्थित होते.

श्री. भुजबळ पुढे म्हणाले की, नाशिकच्या मंत्री मंडळ बैठकीत विमानतळासाठी निधी मंजूर केला. गावकऱ्यांच्या दूरदृष्टीमुळे ते मार्गी लागले. नाशिक एअरपोर्टची योजना नियोजन विभागात अडकली. नवी मुंबई विमानतळाचे मुंबई ते दिल्ली गडबड सुरु आहे. अजून हिरवा झेंडा मिळालेला नाही. शिर्डीकर भाग्यवान आहेत. शिर्डीतील पायाभूत सुविधांमुळे धार्मिक पर्यटन वाढीस लागून त्याचा विकासावर परिणाम होईल. संस्थानचे उत्पन्न ७६ कोटीवरुन २७२ कोटी झाले ते हजार कोटींवर जाईल. साईबाबांना जगभरातील भक्त मानतात. बाबांच्या मंदिरात कुणाला प्रवेश नाही अशी गडबड होत नाही. समतेचा संदेश त्यांनी दिला. भक्तांकरिता राहाता बायपासला ९.५० कोटीचा निधी दिला. ८ कोटीची रक्कम शिल्लक आहे. कोपरगांव ते नगर महामार्गाचे

चौपदरीकरणाचे काम अपूर्ण अजून ते लवकरच पूर्ण करु असे ते म्हणाले.

''निळवंडे धरणाच्या कालव्याच्या कामाकरिता मी व उपमुख्यमंत्री दिल्लीला जावून केंद्राकडून निधी मिळवून देवू. नाशिक नगरच्या हिताकरिता प्रादेशिक अनुशेषाचा अडसर येऊ देणार नाही,'' अशी घोषणा मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी यावेळी केली.

मुख्यमंत्री चव्हाण पुढे म्हणाले की, निळवंडेला १९७० साली प्रशासकीय मान्यता मिळाली, प्रकल्प रखडला. त्याची किंमत दहापट वाढली आता काम पूर्ण होत आले आहे. देशात ४० टक्के सिंचन असले तरी राज्यात ते २० टक्के असून रखडलेले सिंचन प्रकल्प मार्गी लागावेत म्हणून वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून राज्यपालांच्या संमतीने १०० टक्के निधी देवू. निळवंडेमुळे नगराला ५६ हजार हेक्टर, नाशिकचे ८ हजार हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार असल्याने कालव्यांना निधी उपलब्ध करुन देऊ.

रस्ते, रेल्वे, विमानतळामुळे विकास होतो. शिर्डी विमानतळामुळे नगर जिल्हा विकासाच्या मुख्य प्रवाहात येईल. औद्योगिक विकासाला हातभार लागेल. शेतकऱ्यांनी विमानतळासाठी जागा दिल्या. त्यामुळे त्यांचे मुलांना नोकऱ्यामध्ये सामावून घेणे, विमातळाचे काम बाहेरील लोकांना देण्योवजी स्थानिक लोकांना द्यावे अशी सूचना मुख्यमंत्री चव्हाण यांनी केली. शिर्डी विमानतळ उभारणेसाठी महाराष्ट्र एअरपोर्ट ॲथोरिटीने शिर्डी साईबाबा एअरपोर्ट चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना केली आहे. या माध्यमातून २०११ पर्यंत विमानतळ कार्यान्वित होईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. नवी मुंबईत नवीन विमानतळ उभारण्यात जमीन व पर्यावरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. मात्र राज्य सरकार यात लवकर तोडगा काढून या विमानतळाचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे तसेच मुंबई मोनो व मेट्रो रेल्वे प्रकल्प २०१४ पर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री यांनी सांगितले. शिर्डी शहरासाठी स्वतंत्र पोलिस ठाणे व उपविभागीय दर्जाचा अधिकारी नेमण्यात येईल असे त्यांनी जाहिर केले. शेती महामंडळाच्या जमिनी खंडकऱ्यांना



*मुख्यमंत्री अशोक चव्हाण नियोजित विमानतळाचे भूमीपूजन करताना शेजारी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ.*



*भूमीपूजन समारंभप्रसंगी उपस्थितांमध्ये सर्वश्री अशोक चव्हाण, छगन भुजबळ, बाळासाहेब थोरात, जयंत ससाणे, अशोक काळे, रमेशचंद्र सिन्हा, शहजाद हुसेन व राधाकृष्ण विखे पाटील*

देण्यासंदर्भाचा निर्णय अंतिम टप्प्यात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

याबरोबरच शिर्डी - दादर या एक्सप्रेस रेल्वे गाडीचा व अन्य तीन रेल्वे गाड्यांचा शुभारंभही मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या हस्ते झाला. यावेळी बोलताना ते म्हणाले, शिर्डी-दादर एक्सप्रेस रेल्वे गाडीला दाखविलेला हिरवा झेंडा म्हणजे केवळ गाडीसाठीच दाखविला नाही तर आजपासून शिर्डी व जिल्ह्याच्या विकासासाठी कायम स्वरुपी दिलेला हिरवा कंदिल आहे. रेल्वेने पर्यटन वाढीच्या दृष्टीने प्रवाशी साईभक्तांना तिकीट रिर्झव्हेशन बरोबरच टॅक्सी, हॉटेल रुम व संस्थानच्या मदतीने दर्शनाची सुविधा हे सर्व एक खिडकी योजनेच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिल्यास साईभक्तांची चांगली सोय होईल व शिर्डीचे पर्यटन अधिक वाढेल. विमान सेवेमुळे जगभरातील तर रेल्वे सेवेमुळे देशभरातील साईभक्त सहजपणे येथे येऊ शकणार आहेत. रेल्वे व विमान सेवेमुळे शिर्डी जगाच्या नकाशावर पोहचेल असे ही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी साईनगर शिर्डी-दादर या एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला तर काकीनाडी सिकंदराबाद व विजयवाडा एक्सप्रेस या मनमाड रेल्वेस्टेशनपर्यंत येणाऱ्या गाड्यांचा साईनगर शिर्डीपर्यंत तर निजामाबाद-परळीवैजनाथ व धाराशिव-निजामाबाद पॅसेंजर रेल्वेचा पंढरपूर पर्यंत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विस्तार करण्यात आला.

परिवहन मंत्री विखे यांनी निळवंडे धरणाचे काम पूर्ण करावे तसेच कालव्याचे काम सन २०१२ पर्यंत पूर्ण करण्याकरिता तसेच गोदावरी कालव्याच्या नुतनीकरणाकरिता निधी देण्याची मागणी केली.

कृषीमंत्री थोरात यांनी काकडी विमानतळाच्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा नवा प्रस्ताव दिला असून तो लवकर मंजूर करावा. निळवंडेचे काम कालव्यासह पूर्ण करण्याकरिता निधी देण्याची मागणी केली.

यावेळी पालकमंत्री बबनराव पाचपुते, विमानतळ कंपनी अध्यक्ष सिन्हा, दत्ता भालेराव, संस्थानचे अध्यक्ष जयंत ससाणे यांची भाषणे झाली. आमदार सुधीर तांबे, राजेश परजणे, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के, सुरेश वाबळे, प्रधान सचिव अजित जैन आदी उपस्थित होते.



# प्लॅस्टिक संस्कृतीला सामोरे जाऊ या...

- डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर, सातारा

राष्ट्रवादीचा 'घनकचरा व्यवस्थापन विशेषांक' (ऑगस्ट २०१०) या अंकाने एक महत्त्वाचा विषय परिपूर्ण स्वरुपात वाचकांच्या समोर ठेवला आहे. हा महत्त्वाचा विषय या स्वरुपात मराठीतील (आणि माझ्या वाचनाप्रमाणे इंग्रजी व हिंदीमधीलही) कोणत्याही मासिकाने असा समोर ठेवलेला नाही. त्याबद्दल राष्ट्रवादीचे अभिनंद करावयास हवे.

मात्र त्याच वेळी या अंकातील वेगवेगळ्या विषयांची अधिक व्यापक चर्चा होणे पण अगत्याचे आहे. 'प्लॅस्टिक जीवनाचा शत्रू' हा राजू भावसार यांचा लेख एक बाजू अभ्यासपूर्ण व परिपूर्णपणे पुढे मांडतो. पण मला वाटते त्याची दुसरी बाजू समजावून घेऊन त्यावर पण मनमोकळी चर्चा व्हावयास हवी.

१) प्लॅस्टिक बहुगुणी आहे. अनेक नित्योपयोगी वस्तू प्लॅस्टिक स्वस्त दरात व मुबलक प्रमाणात देते. एकवेळ खेड्यात शाळेत अनवाणी जाणारी मुले आता प्लॅस्टिकच्या चपला घालतात आणि प्लॅस्टिकचे हलक्या वजनाचे हंडे सायकलला लावून पाणी आणले जाते. टेरिलिनचे अनेक वर्षे टिकणारे शर्ट-पॅन्टस् खेड्यात अनेक माणसांना अर्धनग्न ठेवत नाहीत. प्लॅस्टिक नसते तर कागद, कार्डबोर्ड, फर्निचर यासाठी केवढी प्रचंड लाकूडतोड झाली असती, निसर्गावर कसे आक्रमण झाले असते याची वैज्ञानिक चर्चेत स्वीकारली जाणारी विस्तृत आकडेवारी आज उपलब्ध आहे.

२) हे सारे जरी खरे असले, तरी सर्वसामान्यपणे सर्वांच्या मनात प्लॅस्टिकबाबत एक घृणा आहे. रस्त्यावर पडलेल्या प्लॅस्टिकच्या गलिच्छ पिशव्या, त्यामुळे तुंबलेली गटारे कायम आपल्या मनासमोर असतात.

३) याचे खरे कारण एवढेच, की प्लॅस्टिकचे सर्वात मोठे 'शक्तीस्थान' आणि 'मर्मस्थान' आपण नीटपणे समजावून घेतलेले नाही. थोडक्यात प्लॅस्टिक संस्कृतीला सामोरे कसे जावे, याचा आपण विचार करुन त्यासाठी योग्य कार्यवाही केलेली नाही.

४) प्लॅस्टिकची प्रामुख्याने 'थर्मोप्लॅस्टिक' आणि 'थर्मोसेट' अशा दोन विभागात विभागणी होते. थर्मोप्लस्किटला उष्णता देऊन ते वितळवून त्यातून पुन्हा पहिल्यासारखी पण थोड्या कमी प्रतीची वस्तू बनविता येते. किंवा थर्मोप्लॅस्टिक पासून आपण पहिल्या वेळी अशा वस्तु बनवत असताना त्यात हे वापरुन वितळवलेले प्लॅस्टिक काही प्रमाणात मिसळता येते. प्लॅस्टिकच्या चपला, प्लॅस्टिकच्या पिशव्या या थर्मोप्लॅस्टिक विभागात येतात. मात्र थर्मोसेट प्लॅस्टिक वितळवून त्यातून पुन्हा पहिल्या प्रकारच्या वस्तू बनवता येत नाहीत. ते मुळात वितळवताच येत नाही. आपले टेलिफोन, प्लॅस्टिकच्या खुर्च्या, रेफ्रिजरेटर या थर्मोसेट विभागात येतात.

५) मात्र आज थर्मोप्लॅस्टिक व थर्मोसेट या दोन्ही गटांतील प्लॅस्टिकपासून बनवून, वापरुन फेकून दिलेल्या वस्तु वापरुन पुन्हा वेगवेगळ्या उपयोगी वस्तू बनविण्याचे तंत्रज्ञान उपलब्ध आहे आणि हे तंत्रज्ञान आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे.

६) प्रगत देशात हे करणे शक्य नाही. भारतात हे करणे सहज शक्य आहे. कारण भारतात रस्त्यावरील कचऱ्यामधुन उपयोगी वस्तू गोळा करणारे, तळागाळातील स्वयंरोजगारी लोक विपुल प्रमाणात आहेत. नीटपणे विचार केला तर असे आणखी स्वयंरोजगार निर्माण करणे शक्य होईल. किमानपक्षी आज हे काम अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत करणाऱ्या या तळागाळातील लोकांना अधिक वेतन आपणाला यातून मिळवून देता येईल.

७) आज ही स्वयंरोजगारी, कचरा गोळा करणारी माणसे, प्लॅस्टिकच्या पिशव्यांना अजिबात हात लावत नाहीत. याचे कारण असे आहे की, या पिशव्यांचे वजन अगदी कमी असते. अशा दहा हजार पिशव्या गोळा केल्या तरी त्यातून एक किलोसुद्धा 'थर्मोप्लॅस्टिक मिळत नाही. त्या एक किलोचेही अगदी नगण्य पैसे मिळतात. पाच-दहा हजार पिशव्या गोळा करणे हे तापदायक आणि बऱ्याच दिवसांचे काम असते. त्यामानाने घाणीत मिळणारे कागद, चिंध्या त्यांना बरेच जास्त पैसे मिळवून देतात.

८) या पार्श्वभूमीवर सर्वांच्या विचारासाठी व चर्चेसाठी मला खालील मार्ग सुचवावासा वाटतो. आपण चर्चेच्या सोयीसाठी स्थूलमानाने पुण्याचे उदाहरण घेऊ.

आज पुण्यात पंधरा ते सोळा हजार स्वयंरोजगारी कचरा गोळा करणारे लोक आहेत. त्यांच्यापैकी काही कर्तृत्ववान महिलांनी एकत्र येऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांची संघटनाही बनविली आहे. या संघटनेतील पदाधिकारी महिलांशी विचार विनिमय करावयाची संधी मला मिळाली होती.

या स्वयंरोजजगारी लोकांनी पुणे शहर त्यांच्या दृष्टीने सोईस्कर अशा विभागात वाटलेले आहे. त्या त्या विभागातील कचऱ्यातील उपयोगी वस्तू ते टिपून घेतात.

आपण या प्रत्येक व्यक्तीला दर महिन्याला दोन हजार रुपये द्यावयाचे. अट एवढीच की त्या मोबदल्यात त्या विभागातील प्लॅस्टिकचा कुठलाही कचरा त्यांनी पूर्णपणे गोळा करुन सोईस्कर ठिकाणी द्यावयाचा.

प्रत्येक व्यक्तीला दरमहा दोन हजार रुपये म्हणजे १६,००० जणांसाठी दरमहा तीन कोटी वीस लाख किंवा वर्षाला चाळीस कोटी रुपये.

हे काम करताना आपण दारिद्र्यरेषेखालील लोकांना पैसे देत आहोत. उत्पन्नाचे एक नवे साधन त्यांच्या हातात देत आहोत. पर्यावरण स्वच्छ करुन प्लॅस्टिक संस्कृतीला सामोरे जाण्यासाठी तयार करीत आहोत.

पर्यावरण कसे सुधारेल, प्लॅस्टिकची जनमानसातील प्रतिमा कशी बदलेल, हे पण आपण सर्वांच्या समोरचे जटील प्रश्न आहेत. त्यातून प्लॅस्टिकची जनमानसातील प्रतिमा बदलली तर प्लॅस्टिकचा खप अनेक प्रकारे वाढेल प्लॅस्टिकवर वेगळा कर यासाठी बसवून पैसे मिळविता येतील.

आज मात्र वेगळ्या प्रकारे पैसे उभे करुन पुणे वा इतर शहरात आपण ही योजना यशस्वीपणे वापरली तर भारतभर असे सरकारी, निमसरकारी वा स्वयंसेवी गट उभे राहतील. हगणदारी मुक्त गाव, तंटामुक्त गाव त्याप्रमाणे महाराष्ट्राची एक वेगळी ओळख आपण भारतभर व खरे तर जगभर निर्माण करु.

या योजनेत काही वा अनेक त्रुटी असण्याची शक्यता मी नाकारत नाही पण चर्चेनंतर ही योजना नाकारणे, सुधारणे वा एखादी नवी योजना विचारात घेणे शक्य आहे. या दृष्टीने व्यापक चर्चा होणे ही आजची प्राथमिक पण निकडीची गरज आहे.

# क्रिकेटमधील पिछेहाट अन् राष्ट्रकुल स्पर्धा संयोजनातील भ्रष्टाचार

- मुकुन्द मोघे

श्रीलंकेविरुद्धची कसोटी मालिका बरोबरीत सोडविण्यात कसेबसे यश मिळाल्यानंतर धोनी व त्याच्या युवा सहकाऱ्यांना तिरंगी मालिकेत स्विकारावा लागलेला दणदणीत पराभव, इंग्लंडमध्ये खेळल्या गेलेल्या चार कसोटी सामन्यांच्या मालिकेत स्ट्रॉसच्या नेतृत्वाखालील यजमान संघाने पाकिस्तानवर केलेली ३-१ मात, जागतिक नेमबाजी स्पर्धेत कोल्हापूरच्या तेजस्विनी सावंतने पटकावलेले सुवर्णपदक, सिनसिनाटी टेनिस स्पर्धेचे विजेतेपद पटकावल्यामुळे सुपर स्टार रॉजर फेडररला पुन्हा गवसलेला सूर आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनात सुरेश कलमाडी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या अनंत भानगडींवर पडलेला धक्कादायक प्रकाशझोत या गेल्या महिन्यातील काही ठळक क्रीडाविषयक घडामोडी ठरल्या आहेत.

जुलैच्या अखेरीच्या आठवड्यात खेळली गेलेली दुसरी कसोटी अनिर्णित राहिल्यामुळे चालू मालिकेत श्रीलंकेचा संघ १-० ने आघाडीवर होता. ही आघाडी कायम टिकविण्याच्या ईर्षेनेच संगाकारा व त्याचे सहकारी तिसऱ्या अखेरच्या कसोटीसाठी सज्ज झाले होते. ४ ते ८ ऑगस्ट दरम्यान खेळल्या गेलेल्या त्या सामन्याच्या पहिल्या डावात सव्वाचारशे धावा ठोकून त्यांनी सुरुवात तर झकास केली होती. परंतु नंतर सलामीवीर सेहवागचे शतक व रैना लक्ष्मणची अर्धशतके यांच्या बळावर भारताने ४३६ धावा केल्या आणि नंतर यजमान संघाचा डाव २६७ धावांत गुंडाळून विजयासाठी आवश्यक असलेल्या २५६ धावा फक्त पाच गडी गमावून नोंदवित एक छान विजय साकारला. या विजयामुळे कसोटी मालिका बरोबरीत सोडविण्याचे समाधान तर धोनी कंपनीस मिळालेच परंतु जागतिक क्रमवारीत असलेले भारताचे अव्वल स्थानही कायम राहिले. या यशाचे सर्वाधिक श्रेय जाते ते सेहवागकडेच! तीन कसोटीत तीन शतके फटकावून तो मालिकावीर ठरत असतांना जुना-जाणता राहुल द्रविड मात्र साफ फ्लॉप गेला. त्याचे अपयश व युवराजसिंहच्या आक्रमक खेळाची बिघडलेली लय यामुळे या मालिकेने भारतीय संघ आपल्या लौकिकास साजेशी कामगिरी करू शकला नाही परंतु सुरेश रैना, अभिमन्यू मिथुन व प्रग्यान ओझा या युवात्रिकुटाने चमकदार कामगिरी बजावल्यामुळे मालिकेचा शेवट तरी गोड झाला. अर्थात आज जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या भारतीय संघास यापुढे मात्र ते स्थान टिकविण्यासाठी खूप परिश्रम घ्यावे लागणार आहेत, हे निश्चित.

## तिरंगी मालिकेत श्रीलंका अजिंक्य

भारत-श्रीलंका कसोटी मालिका सुरु असतांना एकदिवसीय सामन्यांच्या तिरंगी मालिकेसाठी न्युझीलंडचा संघ कोलंबोत दाखल झालेला होता. नेहमीचा कर्णधार डॅनियन व्हिटोरी आणि यष्टीरक्षक फलंदाज ब्रॅंडन मॅकलम यांच्या अनुपस्थितीत या संघाचे नेतृत्व तडाखेबंद फलंदाज रॉस टेलरकडे सोपविण्यात आले होते. त्याने व त्याच्या सहकाऱ्यांनी मालिकेच्या सलामीच्या लढतीत भारताचा डाव अवघ्या ८८ धावांत उखडला आणि चांगलीच खळबळ माजविली. परंतु हा जोम आणि जोष पुढील सामन्यांमध्ये टिकविणे मात्र त्यांना नेहमीप्रमाणे जमले नाही. या स्पर्धेत त्यांचे स्टायरिस-मिल्स-टफी हे गोलंदाज प्रभावी ठरले परंतु सर्वच फलंदाजांनी निराशा केली. अर्थात हा अनुभव आगामी विश्वकरंडक स्पर्धेत मात्र

त्यांच्या निश्चितच कामी येईल. स्पर्धेच्या अंतिम लढतीत श्रीलंकेने भारतावर तब्बल ७४ धावांनी विजय मिळविला आणि 'मॅक्सवेल करंडक' पटकावला. सलामीवीर दिलशानचे संयमी शतक, त्याने माजी कर्णधार महेला जयवर्धने बरोबर पहिल्या विकेटसाठी केलेली शतकी भागीदारी आणि कर्णधार संगाकाराची पाऊण शतकी खेळी हे या सामन्याचे वैशिष्ठ्य ठरले. त्या बळावर श्रीलंकेने ५० षटकात ८ बाद २९९ धावा केल्या आणि भारताचा सर्व संघ २२५ धावात गारद करुन आपले वर्चस्व निर्विवादपणे सिद्ध केले. कर्णधार धोनीच्या ६७ धावा वगळता या सामन्यातही अन्य एकही भारतीय फलंदाजास चांगला खेळ करुन दाखविता आला नाही. युवराज-कोहली, दिनेश कार्तिक व रोहित शर्मा या भरवशाच्या खेळाडूंप्रमाणे सुरेश रैनाही या स्पर्धेत साफ अपयशी ठरला. खरे पाहाता श्रीलंकेविरुद्धची कसोटी मालिका गाजविल्यानंतर आठवडाभरातच रैनाचा खेळ एवढा उतरणीला लागणे अजिबात अपेक्षित नव्हते. तो व अन्य यंग टर्कस् अपयशी ठरत असतांना मुनाफ पटेल, प्रवीणकुमार व आशिष नेहरा या गोलंदाजांनी मात्र टिच्चून गोलंदाजी केली. त्यांच्यामुळेच या स्पर्धेचे उपविजेतेपद भारताच्या खिशात पडू शकले.

## सैना नेहवालची पिछेहाट

पॅरिस येथे झालेल्या जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत भारताची सर्वोत्तम बॅडमिंटनपटू सैना नेहवाल उपांत्यपूर्व फेरीतच गारद झाली. गेल्या महिन्यात सलग तीन आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकणाऱ्या सैनाला पराभवाचा हा धक्का दिला तो चीनच्या झियांग वांगने अर्थात सैनाचे आव्हान २१-८, २१-१४ असे सहज मोडून काढत तिने सैनाची विजय मालिका खंडित केली असली तरी आगामी राष्ट्रकुल क्रिडा स्पर्धेत सैना पुन्हा चमकेल याबद्दल सारेचजण निःशंक आहेत.

## 'गोल्फर' अटवालची कमाल

भारताचा आघाडीचा गोल्फर अर्जुन अटटवालने नॉर्थ कॅरोलिनात झालेली विंडहॅम चॅम्पियनशीप' जिंकली असून, यु.एस.पीजीए टूर इव्हेंट जिंकणारा तो पहिला भारतीय ठरला आहे. या पराक्रमाबद्दल त्याला तब्बल ९ लाख १८ हजार डॉलर बक्षीस रकमेचा लाभ झाला असून त्यापेक्षा अधिक बक्षीस रक्कम आजवर फक्त आपला महान बुद्धीबळपटू विश्वनाथन आनंदनेच मिळविली आहे. ३७ वर्षीय अटवालच्या नावावर आजअखेर अकरा व्यावसायिक स्पर्धांची विजेतीपदे जमा असून विंडहॅमचे विजेतेपद हे त्यातील सर्वोत्तम मानले जाते.

## राष्ट्रकुलातील भ्रष्टाचार

आगामी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा सध्या गाजत आहे. ती अन्य कोणत्या चांगल्या कारणामुळे नाही तर स्पर्धेचे मुख्य सूत्रधार सुरेश कलमाडी व त्यांच्या कंपुच्या भयानक भ्रष्टाचारामुळे! या स्पर्धेचे मूळ बजेट फक्त अकराशे कोटींचे असतांना आत्तापर्यंत चक्क बारा हजार कोटी रुपयांची बेलगाम उधळपट्टी झाली असून, एवढा अफाट खर्च झाल्यानंतरही स्पर्धेची पूर्वतयारी पूर्ण झालेली नाही. विशेष म्हणजे भ्रष्टाचार सबळ पुराव्यांसह उजेडात येत असतांना केंद्र व दिल्ली सरकारने मात्र 'राष्ट्रीय प्रतिष्ठेचा' मुद्दा उपस्थित करुन स्पर्धा संपल्यानंतर संबंधित संभावितांच्या सर्व गैरव्यवहारांची सखोल चौकशी करण्याचे हास्यास्पद आश्वासन देत सारे प्रकरण बासनात गुंडाळून ठेवले आहे. 'लहरी राजा, प्रजा आंधळी, अधांतरी दरबार' यापेक्षा काही वेगळ्या शब्दात या निलाजरेपणाचे वर्णन करणे निदान आम्हाला तरी शक्य नाही...!

## तेजस्विनीने घडविला नवा इतिहास !

पुण्या-मुंबईच्या तुलनेत अप्रगतच मानाव्या अशा करवीर नगरीच्या एका पराक्रमी कन्येने नुकतीच भारतीय क्रीडा क्षेत्राच्या इतिहासात एका नव्या सुवर्ण पानाची बहुमुल्य भर टाकली. 'तेजस्विनी सावंत' हे नाव धारण करणाऱ्या या नेमबाजपटूने म्युनिक येथे झालेल्या जागतिक नेमबाजी स्पर्धेत ५० मीटर रायफल प्रोन गटाचे सुवर्णपदक पटकावले. असा पराक्रम गाजविणारी ती पहिली मराठीच नाही तर पहिली भारतीय महिला ठरली आहे. यापूर्वी १९९८ मध्ये रशियाच्या मरीना बबकोवाने ६०० पैकी ५९७ गुण नोंदवून विश्वविक्रम केला होता. गेली तब्बल बारा वषे४ अबाधित राहिलेल्या या विक्रमाची बरोबरी करुन आत तेजस्विनीने आपले नाव सर्वार्थाने सार्थ ठरविले आहे असेच म्हटले पाहिजे. अर्थात विश्वविक्रमी म्हणावी अशी कामगिरी तिच्याकडून आत्ता प्रथमच झालेली असली तरी आजवरच्या दीड दशकी वाटचालीत तिने पाऊणशेहून अधिक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धांत पदके पटकावली आहेत, हे विसरुन चालणार नाही.